# मराठी नाट्यसंगीत



संपादक
बाळ सामं

# मराठी नाट्यसंगीत

बाळ सामंत

REFBK-0021772
REFBK-0021772

★

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग पुरस्कृत
संगीत सभा.

१९७५.

प्रथमावृत्ती
जानेवारी १९७५.

सर्व हक्क स्वाधीन
**बाळ सामंत**

प्रकाशक
**म. वा. देसाई**
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
प्रमुख आश्रयदाते, संगीत सभा.
मुंबई ४०० ००१.

मुद्रक
**म. म. कामत**
व्यवस्थापक,
महानगरपालिका मुद्रणालय.
मुंबई ४०० ००१.

मुखपृष्ठ-चित्र
**रघुवीर मुळगावकर**


**मूल्य रु. २५/–**

ज्यांना नाना' म्हणून हाक
मारण्याचे भाग्य मला लाभले
त्या नटसम्राट बालगंधर्व
यांच्या पवित्र स्मृतीस

—बाळ सामंत

# ओं ज ळ

माझे मित्र श्री. बाळ सामंत यांनी संपादित केलेला 'मराठी नाट्यसंगीत' हा ग्रंथ मुंबई महानगरपालिकेच्या संगीत सभेच्या वतीने मराठी नाट्यरसिकांना सादर करण्यास मला आनंद वाटत आहे. नाट्यसंगीत हा महाराष्ट्राचा अमोल ठेवा आहे. कै. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' नाटकापासून सुरू झालेली ही संगीत नाटकांची तेजस्वी परंपरा आधुनिक मराठी नाटककारांनीही जागृत ठेवली आहे. 'शाकुंतल' नाटकापासून तो आजतागायतच्या एकूण १०१ गाजलेल्या संगीत नाटकांतील निवडक पदांचे संकलन करणे हे काम तसे सुलभ नव्हते. पण संपादकानी अत्यंत चोखंदळ आणि रसिक दृष्टीकोनातून हे काम पूर्ण केले आहे, अशी सर्व नाट्य-संगीत रसिकांची खात्री होईल. या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे सामंतांनी लिहिलेली नाट्यसंगीताचा आढावा घेणारी विवेचक आणि विस्तृत प्रस्तावना. याशिवाय प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केलेली पदे कोणत्या गायकांनी म्हटली याचीही जास्तीत जास्त निर्दोष सूची तयार करण्याचे अवघड कार्य त्यांनी पार पाडले आहे. जुन्या ध्वनिमुद्रिका आतां काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. अशा या दुर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा शोध घेऊन सामंतांची ही सूची सर्वतोपरी परिपूर्ण करणे आणि या ध्वनिमुद्रिकांच्या ध्वनिफिती तयार करणे हाहि संगीत सभेचा एक नियोजित कार्यक्रम आहे. संगीत रसिक या आमच्या पहिल्याच प्रकाशनाचे योग्य ते स्वागत करतील अशी मला आशा आहे.



**(म. वा. देसाई)**
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,
आणि
प्रमुख आश्रयदाते, संगीत सभा.

# आ भा र

'मराठी नाट्यसंगीत' या पुस्तकाची कल्पना गेली कित्येक वर्षे माझ्या मनात होती. काही दिवसापूर्वी कोल्हापूरचे रसिक संगीत तज्ञ बाबूराव जोशी यांनी लिहिलेल्या 'संगीताने गाजलेली रंगभूमी' या पुस्तकाचे 'नवशक्ति' दैनिकांत परीक्षण करण्याचा योग आला, तेव्हा त्यातील काही उणीवा पाहून असे पुस्तक तयार करण्याची कल्पना अधिक बळावली. माझे मित्र श्री. म. वा. देसाई यांच्या नी माझ्या बैठकीत या पुस्तकाचा सदैव विषय निघे. पण या संदर्भात जास्त आग्रह धरला 'मॅजेस्टिक' चे तुकाराम कोठावळे यांनीं. हे पुस्तक प्रकाशित करायची त्यांची फार इच्छा होती. पण त्यांचीच परवानगी घेऊन आता हे मी मुंबई महानगरपालिकेच्या संगीत सभेकडे प्रकाशनार्थ दिले. अर्थात् त्याला कारण मित्रवर्य म. वा. देसाई, यांचा आग्रह.

या ग्रंथातील पदांची निवड करण्याचे कामी मला माझे मित्र नटवर्य अनंत दामले, आणि नाट्यसंगीताचे व्यासंगी प्रि. बाबुराव ढेकणे यांची फार मोलाची मदत झाली. मित्रवर्य बाबुराव ढेकणे यांनी तर कामाचा व्याप मागे असता माझी प्रस्तावना वाचून त्यात अनेक विधायक सूचना केल्या.

'हें पुस्तक झालेच पाहिजे' असा हट्ट माझे मित्र नाटककार विद्याधर गोखले यांनी धरला त्याचा या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. या ग्रंथलेखनाच्या कामी पुष्कळ जुनी नाटके मिळवून देण्याचे कामी अनंत दामले, तुकाराम कोठावळे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे श्री. पारायणे आणि वांद्रे येथील नॅशनल लायब्ररीचे ग्रंथपाल श्री. जोग यांची फार मदत झाली.

माझे सर्व नाटककार मित्र आणि अन्य संबंधित नाटककारांचे नातेवाईक यांनी मला आपल्या नाटकातील पदे या ग्रंथात समाविष्ट करण्यास परवानगी दिली या बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अत्यंत अल्पावधीत हे पुस्तक प्रकाशित झाले ते माझे मित्र श्री. रतिलाल भावसार आणि म्युनिसिपल प्रेसचे व्यवस्थापक श्री. म. म. कामत यांच्या चिकाटीमुळे.

ग्रंथातील ज्या काही उणीवा आहेत त्या लक्षात घेऊन ही मराठी रसिक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

— बाळ सामंत

# मराठी नाट्य-संगीताची वाटचाल

मराठी नाटकांची परंपरा ज्ञानेश्वरांच्या काळापासून चालत असली पाहिजे असा विद्वानांचा तर्क आहे. कै. वि. का. राजवाडे यांना तंजावर येथे एका रामदासी मठात इ. स. १६९० च्या सुमारास लिहिलेल्या 'श्रीलक्ष्मी–नारायण कल्याण' या नाटकाची हस्तलिखित प्रत मिळाली. ह्या हस्तलिखिता–वरुन मराठी नाटकाची परंपरा ज्ञानेश्वर कालाइतकी जुनी आहे असा इतिहासाचार्य राजवाडे यांचा दावा. या नाटकाची नांदी पुढीलप्रमाणे

**जय जलधि गंभीर । जय सुरुचिराकार ।।**

**जय शमित अरिजाल । जय भक्तानुकूल**

'श्री लक्ष्मीनारायण कल्याण' या नाटकानंतरच्या दिडशे वर्षांत तमाशे ललित, दशावतारी खेळ, इत्यादि लोककला समाजाचे रंजन करीत होत्या. पण नाटकाचा असा पहिला प्रयोग कै. विष्णुदास भावे यानी १८४३ साली सांगली येथें करून मराठी रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यांच्या 'सीता-स्वयंवर' या नाटकाचा एक प्रयोग मुंबईकरांसमोर झाला आणि त्यांना तो फार आवडला. भाव्यांच्या म्हणण्याप्रमाणे "अशा प्रकारे, मुंबई, पुणे, नगर वगरे ठिकाणी आम्ही चारपाच खेपा १८६१ पर्यंत केल्या व कीर्ति आणि पैसा पुष्कळ मिळविला. पुढें मी नाटक मंडळी सोडल्यावर माझ्या नाटकातील मुख्य मुख्य पात्रानी नाटके केली त्यापासून दुसऱ्यानी, अशी परंपरा होता होता जिकडे तिकडे नाटकेच होऊन गेली. पुढें पुढें तर या कलेकडे लोकांचे लक्ष लागून पुष्कळ लोकानी नवी नाटके रचून छापली व कॉलेजे हायस्कुले वगरेतील मंडळीनी हि नाटके केली."

भाव्यानी रामायण, महाभारत आणि भागवत यातील सुमारे पन्नास लोकप्रिय आख्यानावर पद्यें रचली. त्यांच्या चाली प्रासादिक आणि रसानुकल होत्या. सीतास्वयंवर नाटकातील ही नांदी म्हणजे किर्लोस्कर, देवल खाडिलकर यांच्या नाटकातील नांदीचे स्फूर्तिस्थान. अर्थात भावे त्याला नांदी न म्हणता नमनाचे पद्य म्हणतात.

( गणपतीचे नमनाचे पद्य )

[ राग यमन, ताल धुमाळी ]

**श्री. गजवदना दे मतिहीना करावया नूतन कवना ।। धृ० ।। अष्टदश पुराणे सुरस ही गाऊ करु कैंचे जनरंजना ।। १ ।। सुरस कथानके वेचक घेऊन करु इच्छित नाटके नाना ? ।। २ ।। ईशचरित काय पामर वर्णिल जेथें थकली अहि रसना ।। ३ ।। नाही ज्ञान हा दास विष्णू तव लीन परी करि सज्ञाना ।।४।।**

'सीतास्वयंवर' मधील दशरथाचे हे पद पहा–

[ खमाज, ताल एक्का ]

**एक कैकयी राघव वनी पाठवू नको गे ।। धृ० । सुकुमार बाल लहान ।। वनी क्षुधा लागल्या तहान कोण देईल अन्नपान सांग तरी सखे गे ।। १ ।। न सीता साहे उष्ण ।। कोमल तनु वय लहान मजसी प्रिय प्राणाहून आवडला प्रिये गे ।। २ ।। पुत्र विरहे जाईल प्राण ।। आहे शाप मज लागून काय दुष्ट हेतु धरुनि सांगसी असे गे ।। ३ ।।**

१८४३ पासून १८८५ पर्यंत पौराणिक नाटकांची आणि तशा नाटकमंडळ्यांची चलती होती. पण हे नाटककार आपल्या नाटकात भाव्यांचीच पदे उपयोगात आणत होते. अर्थात पदें म्हणण्याचे काम सर्वस्वी एकट्या सूत्रधारावर अवलंबून असे. सूत्रधार सतत रंगभूमीवर असे. भाव्यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यानंतरच्या काळांत बाबाजी दातार (इचलकरंजीनाटक मंडळी), नाना सोहनी, अनंतबुवा बुधकर (तासगावकर नाटकमंडळी) रावजी शहरकर, (पुणेकर नाटकमंडळी) सखारामबोवा चांबळीकर सरनाईक, (सांगलीकर नाटक मंडळी) आणि गोविंददास (कोल्हापूरकर नाटक मंडळी) या कवीनी पौराणिक आख्यानावर नाटकास योग्य अशी पद्य रचना केली.

**किर्लोस्कर युग**

या पौराणिक नाटकमंडळ्या आणि आर्योद्धारक सारख्या गद्य नाटक मंडळ्या मराठी रसिकांचे रंजन करीत असता मराठी रंगभूमीच्या क्षितिजावर एक महान तारा उदयाला आला आणि तो म्हणजे बलवंत पांडुरंग उर्फ आण्णासाहेब किर्लोस्कर. ३१ मार्च १८४३ रोजी म्हणजे विष्णुदास भाव्यांच्या पहिल्या संगीत नाटकाच्या प्रयोगवर्षी आण्णासाहेबांचा गुर्लासूर येथे जन्म झाला. १८७३ साली आण्णासाहेबांनी 'शांकरदिग्विजय' नांवाचे एक गद्य नाटक प्रसिद्ध केलें. १८८० साली किर्लोस्कर पुण्यात आले असतां त्यांनी काही पारशी नाटके पाहिली व तशा प्रकारचे नाटक मराठीत रचण्याची ईर्षा त्यांच्या मनात निर्माण झाली. आणि त्यातूनच '**सं. शांकुतल**' नाटकाचा जन्म झाला. दि. १३ ऑक्टोबर १८८० मध्ये पुणे येथें तंबाखू गल्लीत विजयादशमीच्या मुहुर्तावर गुळवे यांच्या वाड्यात 'शांकुतल' च्या पहिल्या तीन अंकांची रंगीत तालीम झाली.

**संगीत नाटकाचा पहिला दिवस**

" दिनांक३१ ऑक्टोबर १८८० आश्विन वद्य १३ रविवार शके १८०२ अमृतसिद्धियोग हा संगीत नाटकाचा प्रथम दिवस. बुधवार पेठेतील भांग्या मारुती समोरच्या तांबेकरांच्या वाड्यात असलेल्या आनंदोद्भव नाटकगृहाचे तिन्ही मजले गच्च भरले होते "सकल कला गुणवेत्ते पंडित" या दिवशी जमले होते. प्रत्येकाच्या मुद्रेवर व पात्राच्या अंत:करणात उत्साह दिसत होता. पात्रांची तयारी झाली. सूत्रधार दोन पारिपार्श्वकासह पड्यात

सज्ज होऊन नांदी म्हणण्याकरितां उभे राहिले व आतां नाटचशास्त्र विधी-प्रमाणे पडद्यात--

**'पंचतुंड नररुंड मालधर पार्वतीश आधी नमितो'**

हे मंगलाचरण म्हणण्यास सुरुवात करणार, तों जणु पडदा ओढणाऱ्यासही तेवढा विलंब असह्य होऊन त्याने एकदम पडदा वर केला. त्याबरोबर आण्णासाहेबांनी घेतलेली सूत्रधाराची भव्य मूर्ति प्रगट होऊन त्यांचा गंभीर आवाज व नाटेकर, शेवडे या परिपार्श्वकांचे गंधर्वतुल्य आलाप प्रेक्षकांच्या कर्णद्वारा प्रवेश करु लागले. त्या प्रसंगी अण्णांचा रंगभूमीवरचा हा प्रवेश म्हणजे संगीत कलेच्या विश्वकर्म्याचा अवतार असे लोकांस वाटू लागले." (किर्लोस्कर चरित्र-मुजुमदार).

'संगीत शाकुंतल' नाटकाच्या या पहिल्या प्रयोगाने मराठी रंगभूमीवरील संगीत नाटकाचे युग सुरु झाले. त्यानंतर दोन वर्षांनी पुण्यातील आप्पा बळवंतांच्या वाड्याजवळ त्या वेळी असलेल्या "पूर्णानंद" नाटकगृहात दिनांक १८ नोव्हेंबर १८८२ रोजी 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग करुन आण्णासाहेबांनी संगीत नाटकाचे जनक ही आपली भूमिका मराठी रंगभूमीच्या इतिहासात चिरस्थायी केली. १८८२ ते ९० ह्या आठवर्षाचा कालखंड म्हणजे किर्लो-स्कर संगीताचा काळ असे म्हटले पाहिजे. किर्लोस्करांनी आपल्या नाटकात पदांची रेलचेल केली. पण ही पदें नाटकाच्या अर्थाला आणि कथावस्तूचे अनुसंधान राखण्याच्या दृष्टीने पोषक होती. त्यानी साकी, दिंडी, कामदा या जातिवृत्तांचा सढळ उपयोग केला. तत्कालीन समाजात लोकप्रिय असलेल्या गीतांचा उपयोग करुन आपली पदे लोकप्रिय केली. सौभद्रातील नाटचसंगीत आजतागायत टिकून राहिले याचे कारण त्यातील संगीताचा ताजेपणा. आण्णासाहेबांची सरस प्रासादिक आणि सुबोध पद्य रचना ही सामान्य प्रेक्षकांच्या तोंडी बसली आणि सौभद्रातील गाणी महाराष्ट्राच्या घराघरात पोचली. 'नच सुंदरी,' 'पांडु नृपती' सारख्या पदाच्या चाली मूळातल्या कानडी पदांच्या आहेत. हे वळण खाडिलकरानी (संगीत मानापमान) नाटकात 'देहा ता' सारख्या असामान्य लोकप्रिय पदाला कानडी चालीचा आधार घेऊन गिरविले. यमन, भूप, ललत, जोगीया, पिलु आसावरी, भैरवी सारखे प्रचारातील लोकप्रिय राग तर त्यानीं वापरलेच पण, 'वद जाऊ कुणाला,' 'बलसागर' सारख्या पदांना लावणीची चाल देऊन, लावणीला मराठी कुटुंबात प्रतिष्ठा मिळवून दिली.

**भाऊराव कोल्हटकर.**

सौभद्र नाटकाच्या यशाला खरा हातभार लावला भाऊराव कोल्हट-करानी. मराठी रंगभूमीवरील जे हाताच्या बोटावर मोजण्याइतके असामान्य नटसम्राट झाले त्यात भाऊराव हे आघाडीचे नट. "मुजुमदार (हे शंकरराव) हे रुक्मिणी होऊन कुलवधूस शोभेल असा ठसठशीत कुंकुमतिलक लावून स्त्रीवेषपोशाखही एखाद्या ब्राम्हण संस्थानिकाच्या त्यावेळचे गृहलक्ष्मीबर-हुकूम करीत असत. कै. कोल्हटकर भाऊरावानी पोशाख त्याच धर्तीवर चालू ठेवून आपल्या तडफदार झंकारयुक्त कंठमाधुर्याने सुभद्रेची भूमिका अत्यंत उठावदार अशी शेवटपर्यंत राखल्याने या सं. सौभद्रावर रसिकांच्या उड्या पडत, (त्रिंबकराव साठे, 'सौभद्र नाटक' उपोद्घात, पृष्ठ २० ) नटवर्य

गणपतराव बोडस लिहितात "आवाज अत्यंत पल्लेदार, नाट्यसृष्टीत संगीत नाटके सुरु झाल्यापासून भाऊरावांच्या सारखा चढा, पल्लेदार, सुरेल आवाज आजतागायत रंगभूमीवर ऐकलाच नाहीं. वीर करुण रसांची त्यांची पदे रंगभूमीवर इतकी वठत कीं वीररसाच्या पद्यगायना बरोबर दु:खाचे उसासे थिएटरमध्ये निर्माण होत. सुभद्रेची करुण रसात्मक पदे व मंथरेची वीर-रसात्मक पदे त्यानीं म्हणतांना ऐकले म्हणजे सुभद्रेची गोड पदे म्हणणारे ते हेच का, असा भ्रम ऐकणाराचे मनांत निर्माण होई." (माझी भूमिका, पृष्ठ ४३-४४) भाऊरावांच्या गायनामुळे फैजमहमदखांच्या गाण्याची आठवण येत असे आणि त्यांचा आवाज तार सप्तकांत केवळ पोचत नसे तर तेथें फिरत असे असे गोविंदराव टेंबे सांगत. भाऊरावांचा आवाजाचा हा असा पल्ला होता कीं, खासबागेच्या मैदानांतही त्यांचे गाणें ऐकू येत असे. गोविंदराव टेंब्यानी म्हटले " भाऊरावांच्या गळयात तानेचे चक्र कमी फिरत नसे. पण ते सुदर्शन चक्र असे ते अशा ओजाने आणि अंदाजाने फेकले जात असे की श्रोत्यांच्या टाळयांचा कडकडाट घेऊन ते परत येई. पदातील वर्णोच्चार टिपून घ्यावेत, शोकांचे आंदोलित स्वर लागले तर श्रोत्यांची अंत:करणे गदगदवावीत, स्वर कायम केला तर थिएटरचा कानाकोपरा स्वराने भरुन जावा" (माझा संगीत व्यासंग) सौभद्रातील सुभद्रेची 'किती सांगू तुला', व्यर्थ मी जन्मले', 'माझ्या मनीचे', 'बघुनी उपवना विरहाग्नीची' ही पदे ज्याच्या त्याच्या तोंडी झाली याला कारण भाऊरावांची स्वर्गीय किमया. 'अरसिक किती हा गेला," 'गिरि-वर हा सौदागिर," 'मन्नेत्र गुंतले' 'पांडुनृपती' या पदांची लोकप्रियता वाढली ती भाऊरावांच्या मुळेच.

१८९१ ते १९११ पर्यंतच्या काळात महाराष्ट्रात अनेक संगीत नाटक मंडळ्या उदयाला आल्या. त्यात वाईकर संगीत मंडळी (पांडुरंग गोपाळ गुरव यवतेश्वरकर) यांच्या 'द्यूतविनोद' नाटकात शास्त्रीय चालींचा प्रामुख्याने वापर करण्यात आला तर पाटणकरांच्या नाटकमंडळीत 'विक्रमशशिकला' सारख्या नाटकात पारशी आणि गुजराती नाटकातील चालींचा उपयोग कर-करण्यात आला. हे वळण पुढे कोल्हटकरानी गिरवून मराठी रंगभूमीवर एक आगळाच प्रयोग केला. पाटणकरांनी प्रथम मराठीत द्वंद्वगीत आणले पण पुढें त्यांच्या 'सत्यविजय' सारख्या नाटकाची लोकप्रियता खालच्या थरात वाढली त्यामुळे माधवराव म्हणत " माझी नाटके गिरणबाबूकरितां आहेत " त्यामुळे परळच्या रंगभूमीचे ते प्रणेते म्हणून त्याचा उल्लेख करावयास हरकत नाही. ते अधून मधून "मृच्छकटिक" सारखे नाटक ही बसवीत.

## कोल्हटकर पर्व

मराठी रंगभूमीवर नाट्य आणि नाट्यसंगीत याबाबतींत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी एक नवे पर्व सुरु केले. नाट्यरसिकांना आतां किर्लोस्कर संगीतांतील त्याच त्या साक्या आणि दिंड्या यांचा कंटाळा येऊ लागला होता. संगीतरसिक नव्याच्या शोधांत होते. जुन्या चाली स्वर विस्ताराला अनुकूल नव्हत्या हे त्यांनी जाणून आपल्या नाटकांत वेगळ्या ढंगाची पदे रचली. भाऊरावांच्या अमदानींत त्यांचे 'वीरतनय' हे नाटक किर्लोस्करांच्या रंगभूमीवर आले. या नाटकांत नटी सूत्रधाराचा प्रवेश

नव्हता. भाऊरावांचे पहिलेंच पद 'तुझी अन्यथा ती कराया कृति' हे मालकंस रागातील पद हाही रंगभूमीवरील रागविषयक संकेतांना दिलेला धक्का होता. कोल्हटकरानी पारशी आणि उर्दु रंगभूमीवरील चाली किर्लोस्करांच्या रंगभूमीवर आणल्या. सांधिक गीतांचा वापर केला. त्यांच्या सर्व नाटकात, 'मूकनायक' या नाटकातील पद फारच लोकप्रिय झाली.' "मूक नायकात कोणताही रस उत्कर्षाला पोचलेला नाही. सर्वच रसांचा परिपोष मितस्त व संयमाने केला आहे. मात्र अनेक रसांच्या संमिश्र व सौम्य अवस्था नाटकाच्या प्रांरभापासून तो अखेरपर्यंत ठिकठिकाणी प्रतीत होतात. या प्रकारच्या हळूवार भावनाना अनुरुप अशा चालींची योजना, इतक्या यशस्वी रितीने केली जावी हे योजकाच्या अतितरल दृष्टीचे द्योतक म्हणावे लागेल." (रंगाचार्य–गोविंदराव टेंबे पृष्ट ९५).

## नाटयाचार्य देवल

अण्णासाहेब किर्लोस्करांची थोर परंपरा यशस्वी रितीने चालविणारे महान नाटककार म्हणून मराठी रंगभूमीच्या इतिहासांत देवलांची अवश्य गणना केली पाहिजे. देवलांच्या नाटयसंगीताचा वारसा हा किर्लोस्करांचाच. त्यांची 'शारदा' आणि 'मृच्छकटिक' ही नाटके आजही मराठी रंगभूमीवर टिकून आहेत. नाटयपद्यरचनेत प्रसादपूर्ण, सुबोध, रसाळ, आणि भावपरिपूर्ण अशी पदे रचण्यात देवल किर्लोस्कराच्या पेक्षा कांही बाबतीत काकणभर सरस ठरले. 'शारदा' नाटकात तर मराठी मनाला भुरळ घालणाऱ्या पदांची नुसती रेलचेल आहे 'काय पुरुष चळले बाई', 'कधी करिसी लग्न माझे', 'मूर्तिमंत भीती उभी', 'जो लोककल्याण' या सारख्या अर्थसुलभ पदानीं मराठी मनावर जी मोहिनी घातली ती आजतागायत कायम आहे. शारदेतील 'म्हातारा इतुका,' 'श्रीमंत पतीची राणी' या पदानीं त्या काळात लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता, अर्थात हा वारसा किर्लोस्करांचाच. देवलांच्या 'मृच्छकटिक' या नाटकातही अशी संगीताची चंदेरी बरसात आहे. या नाटकाचे काहीं वळण किर्लोस्करी थाटाचे असले तरी त्यातील 'रजनीनाथ हा', तेचि, पुरुष, 'सार्थचि ते' या रागदारीच्या पदांची मराठी रंगभूमीवरील अविस्मरणीय अशा पदात गणना करावी लागेल. देवलांच्या 'शापसंभ्रम' नाटकांतील पदे आतां विस्मृतप्राय झाली असली तरी भाऊराव कोल्हटकरांच्या जमान्यात या नाटकांतील पदानीही महाराष्ट्राला वेड लावले होते. देवलांच्या नाटयप्रतिमेचा आणखी एक अविष्कार म्हणजे त्यांचे 'संशयकल्लोल' नाटक. गंधर्व नाटकमंडळीच्या रंगभूमीवर आलेले हे नाटक अजूनही हिरव्या चाफ्याच्या फुलासारखे टवटवीत आहे. यातील 'सुकांत चंद्रानना,' 'कर हा करी' संशय का मनि आला,' 'मानिली आपुली,' 'मृगनयना,' ही पदे म्हणजे मराठी नाटयसंगीतातील अविस्मरणीय असा ठेवा. 'शाकुंतल' नाटकातील शकुंतलेची पदे देवलांनी केली आहेत. त्यातील 'वेडया मना तळमळसी' हे पद बालगंधर्वानी तर अमर करून ठेवले आहे.

या वीस वर्षांत भाऊराव कोल्हटकरांची आठवण करुन देणारा आणखी एक नट मराठी रंगभूमीवर आला आणि तो म्हणजे नटवर्य दत्तोपंत हल्याळकर. मंथरा, पुंडरीक, कोंदड, शूरसेन या भाऊरावांच्या भूमिका दत्तोपंतानीं सही

सही भाऊरावांच्या वळणाने साकार केल्या. अर्थात हे वळण गाण्यापुरतेच मर्यादित होते आणि ही कामगिरी कमी मोलाची नव्हे. याच काळांत चिंतोबा गुरव, जनूभाऊ निमकर, केशवराव भोसले (स्वदेश हितचिंतक), रामभाऊ कुंदगोळकर (नाटयकला प्रवर्तक) पुरुषोत्तम वामन शुक्ल (राजापूरकर) हे लहानमोठे नट गायक पुढें आले.

### गंधर्वयुग

भाऊराव कोल्हटकरांची आठवण करुन दिली दत्तोपंत हल्याळकरांनी. पण भाऊरावांची जागा त्यांना भरुन काढता आली नाही. ते अत्यंत अवघड कार्य केले नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांनीं. १९०५ साली बालगंधर्व गुरुद्वादशीच्या मुहुर्तावर किर्लोस्कर मंडळीत येऊन दाखल झाले आणि १९५५ पर्यंत सतत पन्नास वर्षे त्यांनी मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले. बालगंधर्वाच्या संबंधी लिहितांना गोविंदराव टेंबे लिहितात; "संगीताबाबत बालगंधर्वामध्ये अनेक गुण आहेत. जवारीदार स्वरेल आवाज अत्यंत लवचिक गळा, ताल व लय यांचा उपजत पक्केपणा; याशिवाय त्यांच्या गळचांत अशी काहीं लडिवाळ लटक होती जणू काय मुलीच्या कानांतील डूलच! निर्व्याज लीलेने ते केव्हां व कोठे हलतील आणि वेड लावतील याचा नेम नाही! एकंदरीत गाण्यातील संथपणा, संयम (Restraint) त्यांच्या इतका क्वचितच पाहायला मिळेल. गायनाच्या शास्त्रीय प्रमादाचे गालबोट एखाद्या दृष्टीच्या तिटीसारखे शोभादायक ठरते. अगदी सर्वसामान्य रागातील पदात ते एखादा विसंवादी अशास्त्रीय स्वर लावतील, किंवा तो अभावितपणे लागून जाईल, पण तो इतक्या सहजपणे व अशा झोकाने कीं त्या योगे रागाला नाहीं, तरी चालीला नवीनच शोभा यायची. त्यांच्या गळचाला तान म्हणजे तर तळहाताचा मळ. 'नको, नको' म्हणत असता गळचाला लागून जायची आणि तींत पुसटपणा नाही कीं तालसुराला धक्का नाही. या गायनाची जाणत्या नेणत्या आबालवृद्धावर मोहिनी पडावी व ती चाळीस वर्षे अबाधित राहावी या पलीकडे परमेश्वरी प्रसाद तो काय असू शकेल. ('माझा जीवन विहार' पृष्ठ ९०). त्यांच्या गाण्याचे आधीपासून वेध लागत व गाणे नंतरही सारखे डोक्यात राहात असे. त्यांच्या गाण्यांत "चैन" होती " असे मास्तर कृष्णा म्हणत. किर्लोस्करांच्या रंगभूमीवर १९०८ साली 'सौभद्र' नाटक पाहिल्यावर केशवराव भोळयांनीं लिहिले. "माझ्या आजूबाजूला बसलेल्या लोकाना माझ्याप्रमाणे सुभद्रा येईपर्यंत चैन नव्हते.—रंगभूमीवर अंधार होऊन राक्षसाच्या खांद्यावर येणाऱ्या सुभद्रेला पाहताच प्रत्येकजण सावरून बसला व विस्फारित नेत्रांनी रंगभूमीकडे पाहू लागला. माझे डोळे तर सुभद्रेच्या मोहक चेहेऱ्याकडे खिळले. प्रत्येकाने आनंदित अंतःकरणाने आपली प्रत्येक अपेक्षा पूर्ण करणाऱ्या बालगंधर्वाचे मूक स्वागत केले. टाळी देण्याचे कोणाला भानच राहिले नाही. त्यांत सर्वांची भावना टाळयापेक्षा जास्त दिसून आली.—भाऊरावांच्या आवाजांत तेज होते तर नारायणरावांच्या आवाजात नाजूक मंजुळपणा होता. त्याला झार होती व त्यामुळे तो फारच गोड वाटे. ('अंतरा', पृष्ठ ३४)

किर्लोस्करांच्या रंगभूमीवर अवतीर्ण झालेल्या बालगंधर्वाच्या अभिनयाचा आणि संगीताचा परिपक्व अविष्कार गंधर्व नाटक मंडळीत झाला. किर्लोस्कर नाटकमंडळीच्या रंगभूमीवर आलेले नाटयाचार्य खाडिलकर यांचे 'मानापमान' हे संगीत नाटक म्हणजे मराठी रंगभूमीवरील एक अद्‌भुत आहे. गेली सहा तपे ते रसिकांना रिझवीत आहे. बालगंधर्वांनी 'मानापमान' या नाटकाला यथार्थ न्याय दिला आणि मराठी रंगभूमीवर संगीत नाटकाचे एक नवे युग निर्माण केले. भाऊरावांच्या तालमीत तयार झालेला नानासाहेब जोगळेकरासारखा अद्वितीय नट, बालगंधर्वासारखा लोकोत्तर नटसम्राट आणि गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या रसिक संगीत तज्ञाचे अभिजात संगीत दिग्ददर्शन त्यामुळे 'मानापमान' नाटकाने रसिकांच्या मताची पक्कड घेतली. " दुसऱ्या अंकाचा उठाव पहिल्या अंकापेक्षा अधिक होता. गंधर्व लोकप्रिय होते यात संशय नाही. पण कामाचा उठाव अव्याहतपणे जोगळेकराचाच अधिक होता. बोडसांच्या शब्दात सांगायचे म्हणजे "भामिनी-धैर्यधराच्या प्रवेशात जोगळेकरांनी कामाची-विशेषतः गायनाची इतकी बहार केली कीं नारायणाची पदें फिकी पडू लागली. 'चंद्रिका ही जणु', 'या नव नवल,' आणि ' दे हाता' या तीन पदांनी प्रेक्षकांना जोगळेकरांनी रंजवले, डुलवले यांत शंका नाही. बालगंधर्वाची 'नयने लाजवीत', खरा तो प्रेमा ना,' आणि 'मला मदन भासे' ही तीन पदे छान वठली. दुसऱ्या अंकानंतर जे लोक बाहेर आले ते जोगळेकरांच्या गाण्याची आश्चर्यचकित मनाने स्तुति करीत होते. टाळ्या बालगंधर्वाच्या वाट्याला जास्त येत होत्या हेही तितकेच खरे' ('नाटक मंडळीच्या बिन्हाडी पु. रा. लेले पृ. ४७) केशवराव भोळे म्हणतात "चवथ्या अंकातील वनमाले बरोबरचा शृंगारयुक्त प्रसंग नानासाहेब जोगळेकर फारच सुंदर वठवीत. अर्थात बालगंधर्वांच्या सुंदर अभिनयाची त्यांना साथ मिळत असे हेही कबूल केले पाहिजे---या प्रवेशांत 'भाली चंद्र असे, 'प्रेम सेवा,' 'प्रेमभावे', ही पदे ते फारच रसाळ म्हणत असत. त्यांचा आवाज सुरेल व चढा होता सुराच्या व आलापाच्या अंगाने गाणे त्यांना फार आवडे व जमे. वरील पदांमध्ये अशा प्रकारच्या गायकीचा वाव असल्यामुळे त्यांची ती पदे फारच रंगत, ('अंतरा' पृष्ठ ४६)

'मानापमान' नाटकाच्या यशाचे श्रेय खाडिलकर, बालगंधर्व आणि गोविंदराव टेंबे यांच्या असामान्य युतीला आहे. नाटयसंगीतात निर्माण झालेली कोंडी फोडण्याचा कोल्हटकरांचा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही. जे कोल्हटकराना जमले नाही ते टेंब्यानी साधले. महाराष्ट्राच्या नाटयसंगीताचा शिल्पकार असा त्यांचा यथोचित गौरव प्रा. ना. सी. फडके यांनी केला आहे. गाणे पुरव थाटाचे-हलके फुलके परंतु स्वरविलासाला अनुकूल. पण गाण्याची संथा टेंब्यांनी दिली तरी बालगंधर्वाच्या गळयातून जे रसायन बाहेर पडे, त्यामुळे टेंबेही चकित होत. हलक्या फुलक्या चालींना बालगंधर्वांनी एकप्रकारचे वजन दिले. 'मानापमानातील' संगीताच्या बाबतीत स्वतः टेंबे म्हणतात "मानापमानांतील नवीन चालींचा अत्यंत बोलबाला झाला. स्तुति सुमने ऐकतांना मला कसेसे वाटे. रिपन थिएटरमध्ये नवीन नाटक झाले. पहिल्या अंकाच्या पडद्यानंतर प्रेक्षकांची कळी खुलली होती पण ती मुग्ध होती. तरीपण 'हा टकमक पाही', 'वरि गरिबा, या पदांनी

प्रेक्षकांना संगीताचा दर्जा उच्च व नवीन आहे असे वाटले—धैर्यधर भामिनीच्या दुसऱ्या अंकातील पदामुळे संगीताचा दर्जा आणखीन वाढला. तिसऱ्या अंकातील तर भामिनीची पदे तर नाजूक संगीताची लयलूट वाटली—पहिल्याच प्रयोगातील या नाटकाच्या चाली आज तीस पस्तीस वर्षे तितक्याच लोकप्रिय राहिल्या आहेत. आणि संगीत नटाच्या कर्तबगारीच्या निकष ठरल्या आहेत. वास्तविक पाहतां मी स्वतः बनवलेली अशी त्यांत 'प्रेम सेवा' ही एकच चाल होती. बाकी सर्व श्रेय निरनिराळ्या चीजा बांधण्याच्या जुन्या नव्या हिंदी व कर्नाटकी संगीतज्ञ विभूतींना आहे." (माझा जीवन विहार, पृष्ठ १०६)

'मानापमान' नाटक ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील असामान्य घटना होती. त्याकाळचे प्रिन्सिपॉल जठारांसारखे डेक्कन कॉलेजातील विद्यार्थी सांगतात कीं बालगंधर्व श्रेष्ठ कीं जोगळेकर श्रेष्ठ हे सांगणे रसिकांना कठिण होई. डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांत तर या विषयावर अटीतटीचे वाद होत आणि त्यामुळे विद्यार्थ्यात दोन तट पडले होते. जुन्या नाटकात काम करतांना लोक जोगळेकरांची व मागील पिढीतील नटांची तुलना करीत व त्यामुळे जोगळेकरावर अन्याय होई. पण 'मानापमान' नाटकातील धैर्यधराच्या भूमिकेमुळे जोगळेकरांच्या गायनाभिनयाचे अपूर्व दर्शन रसिकांना घडले. बालगंधर्व हे जोगळेकरांचे श्रेष्ठत्व तर मानीतच पण 'मालक' म्हणून त्यांचा आदराने उल्लेख करीत.

किर्लोस्कर रंगभूमीवर 'विद्याहरण' हे खाडीलकरांचे आणखी एक नाटक आले. पण नाट्यसंगीताच्या लोकप्रियतेच्या दृष्टीने ते 'मानापमान'शी स्पर्धा करुं शकले नाही. पण या नाटकांतील शुक्राचार्यांची भूमिका खरीखुरी गाजवली कृष्णराव गोरे यांनीं. रंगभूमीवर किती गावे आणि कसे गावे यांचा गोरे हा एक आदर्श होता. पाठीत कुबड, गरुडासारखे नाक व तेजस्वी डोळे, आवाज मोठा असूनही तेजस्वी व मधुर. विद्याहरण नाटकांत त्यांनी बालगंधर्व आणि टेंबे यांनाही मागे टाकले. असा 'शुक्राचार्य' मराठी रंगभूमीवर झाला नाही असे सर्व जुने रसिक ग्वाही देतात. त्यांचा आवाज स्थिरावला म्हणजे रंगमंदिर भरुन जात असे. त्यांच्या गाण्याची राकट जात नटवर्य लोंढ्यांच्या सारखी होती.

किर्लोस्कर रंगभूमीवर 'मानापमान'शी नुसती स्पर्धा नव्हे तर नाट्य संगीताच्या दृष्टीनें 'मानापमान' लाही मागे टाकणारे 'सं. स्वयंवर' हे खाडिलकरांचे अलौकिक नाटक गंधर्वांच्या रंगभूमीवर आले आणि मराठी रंगभूमीवर खऱ्या अर्थाने गंधर्वयुग निर्माण झाले. नाट्याच्या दृष्टीने 'स्वयंवर' हे मानापमानापेक्षा उजवे आणि ते गंधर्वांच्या रंगभूमीवर आले तेव्हां बालगंधर्वांची अभिनय कला आणि संगीत कला ही पूर्ण आकाराला आली होती. या नाटकांत भास्करबुवांनी अत्यंत दुर्मीळ अशा आकर्षक बांधणीच्या उठावदार चाली दिल्या. आणि त्या चालीबरहुकूम नाट्याचार्यांनी आपली पदे रचली. आपले गुरु अल्लादियाखां यापासून घेतलेली रागदारीची विद्या भास्करबुवांनी स्वयंवर नाटकात मुक्तपणें

उधळली. पण हें करीत असतांना बालगंधर्वांकडून ही गाणी रंगभूमीवर यथोचित रसाविष्कार करीत भावपूर्ण रितीने कशी म्हणावीत यांची कसून तालीम दिली. 'स्वयंवर' नाटकामुळे शास्त्रीय संगीताचे स्वर मराठी माणसांच्या घराघरात गेले. केशवराव भोळे लिहितात "नाटकातील पदे बसविण्यापूर्वी त्याच्या मूळच्या सर्वचिजा बुवांनी नारायणरावांना सहा महिने अगोदर स्वत: शिकविल्या त्यांच्या रागाची तालीम दिली; नंतर पदे झाली. त्यात ख्यालांतल्या सर्व उत्कृष्ट चिजांच्या चाली आहेत. उदाहरणार्थ 'नाथ हा माझा', 'सुजन कसा मन चोरी', 'मम आत्मा गमला' 'स्वकुलतारक सुता', अमृताचि गोपाला 'अजिराधा बाला' ही सर्व पदें उत्कृष्ट घराणेदार चिजांवर आधारलेली आहेत. भास्करबुवांची गायकी या नाटकापासून नारायणरावांच्या गळ्यांत ऐकू यायला लागली. स्वयंवर नाटकातील गायकी जितकी भारदस्त व उठावदार आहे, तितकीच ती अवघड व कठिण आहे. नारायणराव या गाण्यातून ख्याल गायला लागले. त्यांची सर्व पदे अत्यंत लोकप्रिय होऊन महाराष्ट्रीयच काय पण आमच्या गुर्जर, पार्शी, सिंधी बंधूंच्या तोंडी आली. —स्वकुलतारक' या एका गाण्यावर ग्रामोफोन कंपनीने हजारो रुपये मिळविले. त्याकाळी हे पद गातांना नारायणराव विलंबित लयीत सुरवात करुन रागाचे स्वर-व आलाप घेत असत. नंतर ख्यालियांच्या पद्धतीने लय वाढवून स्वरालापांची बढत करुन तानेची फिरत करीत असत. या काळांतील दुसरे लोकप्रिय पद म्हणजे 'नृपकन्या तव जाया' ते सुद्धां नारायणराव उत्तम गात. त्यांत ते शृंगाराची लयलूट करीत," (संगीताचे मानकरी-पृष्ठ २४)

'स्वयंवर' नाटकातील पदे उच्च प्रकारच्या रागदारी संगीतावर आधारलेली होती. त्यामुळे गायक नटाला ते एक आव्हानच होते. एका अर्थाने या नाटकामुळे नाट्यसंगीताचा दर्जा उंचावला आणि दुसऱ्या अर्थाने संगीत नाटकाला नाट्यसंगीताच्या बैठकीच्या गाण्यांचे स्वरुप येऊ लागले. नाट्य व संगीत यातील समतोल ढळला असेही म्हणता येईल. भास्करबुवा बखले व वझेबुवा यांच्यासारखे स्वररचनाकार नाट्यकलेला लाभल्यामुळे महाराष्ट्रीय समाजाला उच्च शास्त्रीय संगीताची ओळख झाली. अप्रचलीत व अनवट रागाचे ज्ञान जनतेला मिळाले. देशी, खोकर, बरवा यासारखे राग प्रथमच महाराष्ट्रात अवतरले.

बालगंधर्वांच्या असामान्य आणि अलौकिक अशा अभिनयाला आणि गायनाला आव्हान देणारे नाटक म्हणजे 'सं. एकच प्याला.' या नाटकातील नितांत मनोहर भावमधुर पदे विठ्ठल सीताराम गुर्जर यांनी रचली. कवाली, गझल, दादरे या प्रकारच्या गायकीच्या अस्सल चिजा सुंदराबाईनी बालगंधर्वांना दिल्या. त्यातल्या 'कशिया त्यजू', 'सत्य वदे', 'प्रभू मजवरि कोपला', या पदानी तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. अर्थात ही पदे गात असतांना बालगंधर्व त्या पदामागील भावनेशी तद्रूप होत असत. गणपतयराव बोडस म्हणतात 'एकच प्याला नाटकाची लोकप्रियता वाढविण्याचे बरेचसे श्रेय श्री. बालगंधर्वांच्या सिंधूच्या भूमिकेला आहे असे म्हटले तर त्यात काही अतिशयोक्ती होईल असे वाटत नाही.—त्यांचे सिंधूचे काम पाहातांना सर्व प्रेक्षकसमुदाय अश्रूमोचन करीत असलेले अनेक वेळा प्रस्तुत लेखकाने आपल्या

अश्रूपूर्ण लोचनांनी पाहिलेले आहेत—सिंधूचे काम पाहुन असे वाटते कीं आज तरी श्री. बालगंधर्वांच्या तोडीचा करुण रस कुशल एकही संगीत वा गद्य नट नाही." (बालगंधर्वांची नाट्यसेवा, रत्नाकर, गंधर्व अंक १९३१)

**काही प्रमुख गायक नट**

गंधर्व नाटक मंडळीत काहीं काल नायकाची भूमिका करुन नंतर स्वतःची शिवराज संगीत मंडळी स्थापन करणाऱ्या गोविंदराव टेंब्यांचे मराठी रंगभूमीवर संगीत दिग्दर्शक आणि पद्यरचनाकार या दृष्टीने झालेली कामगिरी जशी मोलाची आहे त्याप्रमाणे एक श्रेष्ठ गायक नट म्हणन त्यांचे कर्तृत्व सामान्य नव्हे. वसंत शांताराम देसाई, लिहितात "१९२३ साली नाट्यकलेच्या भाटे बुवानी मला सांगितले केशवराव भोसल्यांनी मानापमानामधील पदे गाऊन असामान्य लोकप्रियता मिळविली तरी गोविंदरावांसारखी मूळ चाली बरहुकूम, रसानुकुल, नखऱ्याने ती कोणीच म्हटली नाहींत." (मखमलीचा पडदा पृष्ठ २४) गोविंदराव हे स्वतः उत्कृष्ट पेटीवादक होते. व पेटीवर ते 'उगीच का कांता' किति सांगू तुला 'दे दाता शरणागता', 'खरा तो प्रेमा ना' ही लोकप्रिय पदे वाजवून आपली पेटीवादनाची मैफल रंगवीत असत.

गंधर्व नाटक मंडळीत नायकाची भूमिका काही काळ करणाऱ्या जगन्नाथ बुवा पंढरपूरकरानी आपल्या गोड आणि वजनदार आवाजामुळे 'भीष्मक', 'रामलाल', 'चारूदत्त', आदि भूमिका गाजवल्या. त्याची स्वयंवरातील 'जा भय न मम मना', 'बोल होईल फोल', आणि एकच प्यालातील 'परम गहन ईशकाम' ही पदे फारच गाजली होतीं.

गंधर्व नाटक मंडळीच्या शेवटच्या कालखंडात प्रख्यात गायक विनायकबुवा पटवर्धन हे नायकाची भूमिका करत. त्यांची विशेष गाजलेली भूमिका म्हणजे विश्वामित्राची. "विश्वामित्राची 'तुज होत भास' सारखी पदे विनायकराव इतक्या झोकांत म्हणत की शेजारी उभ्या असलेल्या बालगंधर्वांचे वाहवा देणारे स्वयंस्फूर्त उद्‌गार मी अनेकदा ऐकले आहेत."(मखमलीचा पडदा पृ.१२१) वसंतराव देसाई यांच्या 'विधिलिखित' नाटकात पटवर्धन बुवा महत्वाची भूमिका करीत आणि त्यातली त्याची 'अखिल स्त्री जनांना' सारखी पदे लोकांना आवडली होती. १९३२ साली पटवर्धन बुवांनी गंधर्व नाटकमंडळी सोडली आणि नाट्य व्यवसायाचाहि निरोप घेतला.

गंधर्व नाटकमंडळीतील एक अग्रगण्य नट गणपतराव बोडस हे संगीत नट म्हणन गाजले नसले तरी सौभद्रातील कृष्ण, आणि एकच प्यालातील सुधाकर या भूमिकात त्यांनी नाट्यगानरसिकांचे रंजन केले. सुधाकराच्या भूमिकेतील कांही पदे बोडस ठसक्यात म्हणत. अर्थात या पदांना नंतर रंग आणला नटवर्य लोंढ्यांनी. लोंढ्यांच्या मृत्यूनंतर 'सुधाकर' हा गद्य झाला तो कायमचा

या कालखंडात शिवराजच्या रंगपटावर 'वामनराव सडोलीकर' तसेच ललितकलेच्या, नाटकांत 'नानासाहेब चाफकर' आणि 'गोविंदराव मार्शेलकर' यांनीही कांहीं काळ प्रेक्षकांना आकृष्ट केले होते.

बलवंतच्या रंगभूमीवर, कृष्णराव कोल्हापूरे, हे नायक आणि दिनकर कामण्णा हे विनोदी भूमिका करीत. कृष्णराव हे उत्तम गायक होते पण दिनकर कामण्णाही प्रसंगी कसलेल्या गायक नटांना मागे टाकत. शारदा नाटकांतील त्याचे वल्लरीचे काम आणि गाणे अप्रतीम होत असे सांगतात.

**'ललितकलादर्श'**

नटसम्राट बालगंधर्व ऐन कीर्तिशिखरावर असताना त्या काळांत अन्य काही संगीत नाटकमंडळचा मराठी रसिकांचे रंजन करीत होत्या. त्यात 'ललितकलादर्श' आणि 'बलवंत' यांचा उल्लेख केला पाहिजे. 'ललित कलादर्श' ही केशवराव भोसले या तेजस्वी गायक नटाच्या मालकीची. शारदेमधील 'मूर्तिमंत भीती उभी' या एकाच पदाने स्वदेशहितचिंतकमधील छोटचा केशवाचा जो नावलौकिक झाला तो पुढें एक लोकप्रिय गायक नट म्हणून पुढें साऱ्या महाराष्ट्रभर झाला. वझेबुवांचे शिष्यत्व पत्करुन त्यांनी त्याकाळांत गंधर्व नाटकमंडळीसारख्या समर्थ मंडळीशी टक्कर दिली. केशवरावांच्या गायनाबाबत त्यांचे सहकारी नानासाहेब चाफेकर म्हणतात ' एकदां शकुंतलेची भूमिका करतांना 'वेडचा मना तळमळसी' हे पद मी मध्यमाचा थोडा जास्त म्हणजे काळी पांच सूर ठेवून माझ्याकडून कसून म्हटले. अभिनयही मुद्दाम परिश्रम घेऊन चांगला वठवला. त्या पदाला मला वन्समोअर पडली—ऊंच सुरांत गायल्यामुळे मी थकून गेलो होतो—त्यामुळे पुन्हां ते पद गातांना फक्त दुसरा अंतरा म्हणून ते पद पुरे करुन मी रंगभूमीवरुन आंत गेलो. त्यानंतर दुष्यंताच्या वेषांत केशवरावांनी लतामंडपामध्ये बसून काळी पांच सुरांतले आपले 'काय मला भूल पडली' हे पद सुरु केले. म्हणजे माझा जो मध्यम तो त्यांचा षडज् आणि सुरवातीलाच 'काय मला' मधल्या 'ला' चा 'आ' कार त्यांनी काळी पाचव्या टीपेत इतका जोरकस आणि सुरेल लावला कीं प्रेक्षकांच्यामधून झालेल्या कडकडाटामुळे सारे थिएटर धुंद होऊन गेले. माझ्या 'वेडचा मना' ह्या पदाचा मागमूसही राहिला नसला तरी केशवराव यांच्या गायनाच्या प्रभावामुळे माझ्या डोळचात आनंदाश्रू चमकले. केशवराव यांच्या बरोबर प्रवेश असल्यानंतर त्यांची अत्यंत जोरदार व सुरेल पदे जवळून ऐकायला मिळाल्याचा आनंद अवर्णनीय होता. 'मानापमान' मधली त्यांची 'दे हाता', 'झाले युवतीमना', 'या नव नवल नयनोत्सवा', 'विद्याहरणमधली 'विमल अधर', 'लोळत कच, 'अनाथ नर तापा', 'लांछन दया', 'मृच्छकटिक' मधील 'रजनीनाथ हा,' 'श्रवणि सखिच्या कादंब कुसुम पाहे', ही दिंडी, 'हा सकल देह रक्तचंदने' आणि 'यज्ञ कर्मी विख्यात' ही दिंडी ही आणि अशी अनेक पदे ऐकतांना देहभान आणि भूमिका विसरून चुकून 'वा, वा', असे शब्द बाहेर पडतील की काय अशी मला नेहमी भीती वाटे." (स्मृतिधन, पृष्ठ ४३).

**संयुक्त मानापमान**

केशवराव भोसले आणि बालगंधर्व या असामान्य नटांच्या—युतिचा चमत्कार मराठी रसिकांनी अनुभवला तो 'संयुक्त मानापमान' च्या अलौकिक प्रयोगांत! ७ जुलै १९२१ रोजी बालीवाला थिएटरमध्ये हे अद्भुत मराठी

नाट्यरसिकांनी डोळाभरून पाहिले. "तो पहा धैर्यधर येतो आहे' या वाक्यापासूनच प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटाला जी सुरवात केली ती केशवराव यांनी रंगभूमीवर प्रवेश केल्यानंतर एकदोन मिनिटें टाळ्यांचा कडकडाट थांबला नाही–आणि त्या क्षणापासून प्रयोगाचा रंग बदलला. सुरुवातीच्या थोड्या भाषणानंतर केशवराव यांनी आपल्या दणदणीत सुरेल आणि उंच आवाजाने 'माता दिसली' या पदाला सुरवात केल्यावर सर्व थिएटरांत टाचणी पडली तरी ऐकू येईल इतकी शांतता पसरली होती. सर्व प्रेक्षक आपल्या शरीराचे कान करुन केशवरावांच्या खानदानी गायनाचा आनंद लुटत होते. 'माता दिसली' या पदापासून त्या आणि पुढल्या सर्व अंकातल्या प्रत्येक पदाला वन्समोअरची टाळी देऊन केशवरावांना दोन दोन वेळां तेच पद म्हणायला प्रेक्षकांनी भाग पाडले." (स्मृतिधन-चाफेकर पृष्ठ ७३)

मानापमान नाटकाने केशवरावांच्या गायकीचे आगळे दर्शन महाराष्ट्राला घडले. त्यानंतर झालेल्या 'संगीत सौभद्र' या नाटकाच्या संयुक्त प्रयोगात त्यांनी अर्जुनाचे काम केले. खरे पाहतां या नाटकात अर्जुनाच्या भूमिकेला गायनाच्या दृष्टीने उठाव नव्हता. तरी सुद्धा 'माझ्यासाठी तिने अन्न' या पदाला त्यांनी सांगून वन्समोअर घेतला असे रसिक सांगतात.

संयुक्त मानापमान आणि संयुक्त सौभद्र या नाटकानंतर केशवरावांचे अकाली निधन झाले आणि मराठी रंगभूमीचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. केशवरावांच्या असामान्य गायकीचा प्रत्यय आणून देणारी एकही ध्वनिमुद्रिका आज अस्तित्वांत नाही. ज्या दोनतीन आहेत त्यांत खरे केशवराव दिसत नाहीत. हाहि दैवदुर्विलास. नानासाहेब जोगळेकरांनी स्वतः बालगंधर्वांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका बेका कंपनीकडून करुन घेतल्या पण स्वतःची एकही करून घेतली नाही ही अशीच दुर्दैवाची गोष्ट.

**बलवंत संगीत मंडळी.**

चिंतामणराव कोल्हटकर आणि मा. दीनानाथ यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीतून बाहेर पडल्यावर बलवंत सं. मंडळीची स्थापना केली. बलवंतला खरा आधार दिला गडकऱ्यांच्या 'भावबंधन' नाटकाने. या नाटकातील 'कठीण कठिण किती' हे पद दीनानाथनी फार लोकप्रिय केले. (पुढे गंगाधर नटवर्य लोंढे यांनीं भावबंधनातील 'जरठ बाला' यासारखी पदे फार लोकप्रिय केली). दीनानाथांचे 'रणदुंदुभी' नाटकातील 'परवशता पाश दैवे' हे पद तर अल्पावधीत सर्वतोमुखी झाले. 'उग्रमंगल' नाटकात राणीचे काम करतांना त्यांनी कथ्यकी नृत्याबरोबर कथ्यकी ठुंबरी गायकीची जी तालीम मिळाली त्यामुळे दीनानाथांच्या गायकीचा एक वेगळा असा ढंग निर्माण झाला. पंजाबी ढंगाचे हे संगीत त्या काळांत दीनानाथांनी महाराष्ट्रात आणले. दीनानाथांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांनीं जुन्या पदांना नव्या ढंगाच्या चाली लावल्या. 'शूरा मी वंदिले', 'रवि मी', 'भाली चंद्र असे' धरिला', 'प्रेम सेवा', या मानापमानातील पदांना त्यांनी नव्या ढंगाच्या चाली लावल्या. त्यांनी कित्येक पदांचे तालही बदलले, हा बदल काही रसिकांना रुचला तर काहींना मुळींच आवडला नाही. 'चंद्रिका ही जणु' आणि 'प्रेम सेवा', या पदांच्या चाली बदलून त्यांनी रसहानी केली आहे असे बहुसंख्य रसिकांचे मत आहे. दीनानाथही अकाली मृत्यू पावले हा मराठी रंगभूमीला बसलेला मोठा धक्का.

अभिनय या नावात आपण वडिलांचा कित्ता गिरवित आहोत याची प्रचीती आणून दिली. १९५६ ते आजतागायत ललित कलेने बरीच नाटके रंगभूमीवर आणली पण संगीताच्या दृष्टीने त्याचे गाजलेले नाटक म्हणजे विद्याधर गोखले यांचे 'पंडितराज जगन्नाथ' हे नाटक, गोखल्यांचे 'जयजय गौरीशंकर' हे नाटकही याच कंपनीने रंगभूमीवर आणले.

### विद्याधर गोखले

ललितकलेमुळे मराठी रंगभूमीला मिळालेला एक गुणी नाटककार म्हणजे विद्याधर गोखले, पण गंधर्व नाटक मंडळी म्हणजे नाट्याचार्य खाडिलकर असे जसे समीकरण होते तसा योग गोखले आणि 'ललित कला दर्श' यांच्याबाबतीत घडून आला नाही. त्यामुळे संगीत नाटककार म्हणून गोखल्यांनी जी नंतर कीर्ति मिळविली ती 'ललित कलेच्या' बाहेर, १९६० साली रंगभूमीवर आलेले गोखल्यांचे 'सुवर्णतुला' हे नाटक अण्णासाहेब किर्लोस्करांच्या परंपरेतील एक गुणशाली नाटक. या नाटकाचे किर्लोस्कर वळण आजच्या प्रेक्षकानाहि मुग्ध करणारे आहे. या नाटकामुळे गोखल्यांनी आपण देवल, टेंबे, आणि वसंत शांताराम देसाई आदि श्रेष्ट नाट्य पद्यरचनाकारांच्या तोडीचे पद्यकार आहोत हेही सिद्ध केले त्यामुळे सौभद्रातील 'राधाधर मधु मिलिंद' प्रमाणें या नाटकातले 'तोचि विश्वंभर' हे नारदाच्या तोंडचे पद आजहि लोकप्रिय झाले. गोखल्यांची पद्यरचना रसाळ, प्रासादिक आणि अर्थग्राही आहे. संस्कृत काव्य आणि शायरी यांचा संगम त्यांच्या काव्यार्थात आणि काव्यरचनेत आढळतो. त्यामुळे 'जयोस्तुते' (मंदारमाला) या पदाप्रमाणे 'अय गुलवदन' (मंदारमाला) 'ये मोसम' है (मदनाची मंजिरी) सारखे गायकी ढंगाचे पद ते लिहून जातात. 'सुवर्णतुला' नाटकाचे यश छोटा गंधर्व यांच्या संगीत दिग्दर्शनाला आणि भूमिकेला आहे. आज त्या नाटकातील सौदागरांची भूमिका अनंत दामले तितक्याच तडफेने करतात आणि त्यांतल्या संगीतालाही योग्य तो न्याय देतात. गोखल्यांच्या नाटकांचे भाग्य असे कीं त्यांना, छोटा गंधर्व, राम मराठे, (मंदारमाला, मदनाची मंजिरी), वसंत देसाई, (जय जय गौरीशंकर), स्वरसम्राज्ञी (नीलकंठ अभ्यंकर) असे भिन्न भिन्न प्रकृतीचे संगीत दिग्दर्शक मिळाले. मला वाटते मराठी रंगभूमीवर एकाच संगीत नाटककाराचा हा विक्रम असावा. पण गोखले निव्वळ नाट्यरचना करून थांबले नाहीत. सुवर्णतुलेच्या रुपाने त्यांनी पारंपारिक संगीत रंगभूमीचे तर पुनरूज्जीवन केलेच पण त्याच्या प्रसारार्थ स्वतः रंगशारदा नावाची नाट्यसंस्था काढली आणि या नाट्यसंस्थेमार्फत केवळ स्वतःचीच नाटके नव्हेत तर 'मानापमान', 'विद्याहरण', सारख्या जुन्या नाटकांचे खऱ्या अर्थाने सुविहित प्रयोग करण्याचे श्रेय मिळविले. आणि म्हणून १९७४ सालच्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद देऊन महाराष्ट्राने त्यांचा यथोचित गौरव केला.

### एकांडे शिलेदार.

संगीत रंगभूमीच्या संदर्भात काहीं एकांडे शिलेदार आपल्या मगदुराप्रमाणे मराठी रंगभूमीची सेवा करीत असतात त्यात स्वरराज छोटा गंधर्व यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. स्त्री भूमिकांत पदार्पण करून मराठी

रसिकांना ज्ञात झालेले छोटा गंधर्व बाल मोहन नंतर एका वेगळ्या रूपात मराठी रंगभूमीवर आले. 'मृच्छकटिक' (चारूदत्त), 'मानापमान' (धैर्यधर) आणि सौभद्र (कृष्ण) या सौदागारांच्या हातखंडा भूमिका. थिएटरचा प्लॅन सुरू होताच तासाभरांत तिकिटे संपून जाण्याचा विक्रम संगीत नटांत आता फक्त छोटा गंधर्व करू शकतात. सौभद्रातील, 'कोण तुज सम', 'नच सुंदरी 'प्रिये पहा','लाल शाल जोडी' मानापमानातील 'माली चंद्र असे दे हाता, 'या नवनवल' प्रेम भावे, 'चंद्रिका ही जणूं' आणि मृच्छकटिक नाटकातील 'रजनी-नाथ हा', 'जन सारे मजला', 'जेथ मित्रा', या पदांना त्यानी नवा ढंग चढविला. सौदागरांचा आवाज अत्यंत गोड आणि लवचिक त्यांची तानबाजीही आटोपशीर आणि बोलण्यात आणि गाण्यातही एक प्रकारचा लाडिकपणा. त्यामुळे-शब्दोच्चार सदोष असूनही सौदागर रंगभूमीवर प्रवेश करतात तेव्हा प्रेक्षक कडाडून टाळी देतात. हे भाग्य आज तरी अन्य संगीत नटाला लाभलेले नाही.

जुनी परंपरा सांभाळणारे गायक नट म्हणून अनंत दामले यांच्या जोडीला. मा. भार्गवराम, सुरेश हळदणकर, राम मराठे, जयराम शिलेदार, श्रीपाद नेवरेकर आणि कृष्णराव चोणकर यांचा उल्लेख केला पाहिजे. मा. अनंत दामले हे अजूनही निष्ठेने जुन्या नाटकांतून कामे करतात. विशेषतः सुरेश हळदणकरानंतर सौभद्रातील नारदाचे काम ते ढंगदारपणे करतात. मा. भार्गवराम हे ललित कलेचे गायक नट पुढे लोंढ्याच्या राजाराम संगीत मंडळीत दुय्यम भूमिका करू लागले. नव्या रंगभूमीवरचे यांचे पुनरागमन म्हणजे 'कट्यार काळजात घुसली' या नाटकांतील त्यांची भूमिका. जयराम शिलेदार आता स्वतःच्याच मराठी रंगभूमि या संस्थेत कण्व (शाकुंतल), भीष्मक (स्वयंवर) अशी कामे करतात. राम मराठे यांची गायकी तडफदार आहे आणि त्यांची धैर्यधर आणि कृष्ण या भूमिका लोकांना आवडतात. श्रीपाद नेवरेकर हे गंधर्वाच्या रंगभूमीवर अखेरच्या काळात आलेले नट. रामलाल, भीष्मक, कृष्ण, आदि भूमिका त्यानी तडफदारपणे केल्या. नेवरेकरांच्या या नाटकातील गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका लोकप्रिय झाल्या आहेत. आजच्या लोकप्रिय गायिकांत मीनाक्षी, कान्होपात्रा, कुसुम शेंडे आणि शांता मोडक यांच्यासमोर बालगंधर्वांचा आदर्श आहे. कान्होपात्रा या गुणी नटीने विद्याधर गोखल्यांच्या सुवर्णतुला या नाटकात तडफदार काम करून लोकप्रियता मिळवली. रामदास कामत हा एक गुणी गायक नट तरुण पिढीत फार लोकप्रिय आहे. जुन्या नाटकाप्रमाणे 'मत्स्यगंधा', 'धन्य ते गायनी कळा' या नव्या नाटकातील त्यांचे गायन तरुण पिढीला आवडते. फैय्याज, रजनी जोशी, जयश्री शेजवाडकर, नीलाक्षी जोशी आणि सुहासिनी मुळगावकर या गायिकांचाही या ठिकाणी निर्देश केला पाहिजे. त्यातील जयश्री शेजवाडकर आणि सुहासिनी मुळगावकर जुन्या परंपरेतील गाणें गातात. फैय्याज आणि रजनी जोशी यांचेही गायन कौतुकास्पद आहे. उदयराज गोडबोले, बागुल आणि प्रकाश घांग्रेकर हे नव्या दमाचे गायक नट. आताच त्यांच्या उमेदवारीचा काळ सुरू झाला आहे. बागूल हे जुन्या नाटकातील नायक नटांच्या भूमिका करतात. त्यांचा आवाज खडा आणि पल्लेदार आहे. तान बाजीची त्याना हौस आहे. घांग्रेकर या तरुण गायक नटाचा भविष्य

काळ उज्वल आहे. गायनाची आणि अभिनयाची मेहनत केल्यास जुन्या परंपरा सांभाळणारा एक गायक नट मराठी रंगभूमीचा निश्चित गवसेल अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. प्रसाद सावकार या गायक नटाच्या या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. त्याची भूमिका आणि गायन 'पंडितराज जगन्नाथ' आणि 'सुवर्णतुला' नाटकाद्वारे रसिकांसमोर प्रामुख्याने आले.

### जितेंद्र अभिषेकी.

या संदर्भात नव्या नाटकाच्या संगीत दिग्दर्शनात जितेंद्र अभिषेकी यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. अभिषेकी संगीत दिग्दर्शक म्हणून पुढे आले ते 'मत्स्यगंधा' आणि 'कटयार काळजात घुसली' या नाटकांच्या संगीता-मुळे. जितेंद्र अभिषेकी, हे गायनातील नव प्रयोग करणारे कलाक दिग्दर्शक त्यांनी प्रथमच जुनी चाकोरी सोडली आणि काही नवीन राग आणि रागिण्या यांचे दर्शन मराठी रंगभूमीवर घडले ते अभिषेकीमुळे, नव्या पिढीला त्यांची स्वररचना फार आवडलेली दिसते. मात्र ही स्वररचना आणि पद्य रचना सामान्य रसिकांच्या तोंडी पक्की बसणे अवघड आहे. जितेंद्र अभिषेकीच्या कलाक दिग्दर्शनाला साथ दिली रामदास कामत आणि वसंतराव देशपांडे या गायकानी, त्यातल्या त्यात वसंतराव देशपांड्यांच्या दीनानाथांच्या वळणा-वरच्या ढंगदार गायकीमुळें आणि अभिनयामुळे 'कटयार' हे नाटक फार गाजले. 'मेघमल्हार,' 'वरदान' आणि 'हे बंध रेशमाचे' या नाटकातही वसंतरावानी आपल्या गायनाने रसिकांना मोहविले याच शंकाच नाही.

### संगीत रंगभूमीचे भवितव्य

यापुढे संगीत रंगभूमीचे भवितव्य काय हा प्रश्न रसिकांना पडला आहे. ऐन तारुण्यात बालगंधर्वांना पाहिलेली पिढी आता जवळ जवळ अस्तंगत झालेली आहे. तरीपण संगीत नाटकाना खचून गर्दी होते. आणि जुनी संगीत नाटके प्रयत्नपूर्वक बसविली तर आजही धडाक्याने चालतात. त्याला केवळ जुने लोक येतात असे नव्हे तर नव्या पिढीलाही त्याचे आकर्षण आहे. कारण संगीत नाटक हे आमच्या हाडीमाशी खिळलेले आहे. त्यामुळे गद्य नाटके लिहिणाऱ्या नाटककारांनाहि संगीत नाटकाचे आकर्षण वाटू लागले आहे हे निर्विवाद. त्यामुळे आजच्या रंगभूमीवर गद्य नाटकाकार म्हणून विख्यात झालेल्या वसंत कानेटकर, आणि पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्यासारखे नाटककारही संगीत नाटकाकडे वळले. कानेटकरानी 'लेकुरे उदंड जाहली' या नाटकात तर संगीताचा एक अभिनव प्रयोग केला व रसिकानीही त्यांना योग्य दाद दिली.

पण कानेटकर, कोल्हटकर, हे तसे पूर्णार्थाने संगीत नाटककार नव्हेत. पुरुषोत्तम दारव्हेकरांची 'कटयार' सोडल्यास त्यांनी परत या दिशेने पाउल टाकलेले नाही. कारण आजची संगीत नाटके आणि पूर्वीची संगीत नाटके यांत थोडा फरक आहे. बाबूराव जोशी, याबाबत सत्य पण परखड टीका करताना सांगतात "'सुवर्णतुला' पासून 'स्वरसम्राज्ञी' या गेल्या १२ वर्षातील नाटकाच्या संगीताकडे पाहू. यात संगीताचे प्राबल्य आहे म्हणजे त्याचे यथार्थ वर्णन होत नाही. त्यात संगीताचे काय

नाही? त्यात पदे, उस्तादी ख्याल, गाण्याच्या तालमी, प्रत्यक्ष मैफली आणि जुगलबंद्या आहेत. संगीतातील परिभाषिक शद्बावरील आधारित अशा कोटया आहेत. अनवट रागाची उकल प्रेक्षकांना करून सांगितलेली आहे. नाच आहेत–तात्पर्य ते नाटकाचे संगीत नसून संगीतांचे नाटक आहे आणि ही गोष्ट खुद्द नाटककारांनी आड पडदा न ठेवता कबूल केली आहे.''(पहा–मंदारमाला–प्रस्तावना)''

### संगीत नाटक कसे असावे?

संगीत नाटकाच्या बाबतीत बाबुराव जोशी यानी काहीं सूचना केल्या त्या मोठ्या मौलिक आहेत. ते म्हणतात "सर्वच नाटकातून संगीत नको–तसेच संगीत हा नाटयविषय आतां नको. आजवर राग नाटकांत घुसण्याच्या पद्धतीवर त्यांनी जी टीका केली आहे ती यथार्थ आहे. कारण नाटय संगीत हे अखेर प्रेक्षकांसाठी असते. त्यामुळे त्याची पद्य रचना आणि संगीत रचना सामान्य प्रेक्षकाला स्वतःशी सहज गुणगुणतां येण्यासारखी सोपी आणि प्रासादिक हवी.

### आजचे नाटयसंगीत.

त्यामुळे आजचे 'मराठी नाटय संगीत' हे त्यामुळे शालूला लावलेल्या ठिगळासारखे वाटते. सौभद्र, मृच्छकटिक, शारदा, स्वयंवर, मानापमान, एकच प्याला या नाटकातील पदे मराठी माणसांच्या सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटक झाला याचे कारण तीं ज्या नटांनी गायिली ते नट त्या त्या भूमिकांशी संपूर्ण एकरूप झाले होते. त्यामुळे 'कशि त्यज़ू पदाला' असे शद्ब कानीं आले कीं सुधाकरची विनवणी करणारी कारुण्यमूर्ति सिंधू श्रोत्यांना आठवत असे. 'नाथ हा माझा' असं म्हणताच विदर्भ देशाची राजकन्या रुक्मिणीची ती मूर्ति आणि बाल गंधर्वांचा तो अविस्मरणीय अभिनय डोळयासमोर येई. त्यामुळे कुमारगंधर्व जेव्हा 'दया छाया' हे गीत गातात तेव्हां पतीला दारूचे व्यसन लागल्यामुळे आत झालेल्या सिंधूच्या हृदयाची तळमळ बालगंधर्व, जसे आपल्या स्वरातून साकार करीत तसा अविष्कार कुमारांना करतां आला नाहीं असें बाल गंधर्वांना प्रत्यक्ष पाहिलेल्या रसिकांना वाटले. त्यानी बालगंधर्वांची नक्कल करावी असें त्यांचे म्हणणें नाहीं, पण ते पद गातांना श्रोत्याच्या हृदयाची तार छेडण्याचे नारायणरावांचे कसब त्यांना उमजले नाहीं असें जुन्या पिढीतल्या जाणत्याना वाटलें. कुमार गंधर्व गायले ते म्हणजे निर्मळ शास्त्रोक्त रागदारी गायन, या गायकीत शद्ब होते. पण भूमिकेच्या मागील भावनेचा स्पर्श नव्हता. कुमारानी गायिलेल्या खाडिलकर अथवा गुर्जरांच्या त्या पदामागील ती बाल गंधर्वांसारख्या गानाभिनय सम्राटाच्या एकरूपतेची तपश्चर्या नव्हती. हा कुमार गंधर्वांचा दोष नव्हे. तरीपण त्यांच्या सारख्या श्रेष्ठ ख्याल गायकाने बाल गंधर्वांना अशी आदरांजली व्हावी ही कुमारांची थोरवी बाल गंधर्व भक्तांना मान्य!

आज खरी गरज आहे ती बाबूराव जोशी यानी म्हटल्याप्रमाणें ताकदवान नाटकाची पण नुसते ताकदवान नाटक चालणार नाही तर सामर्थ्यशाली अभिनय कुशल गायकही हवेत बालगंधर्वाची नाटके केवळ गाण्यासाठीं बघायला लोक जात होते असे म्हटले तर खाडिलकरांची 'द्रौपदी', 'मेनका', 'सावित्री', आणि व. शां. देसाई कृत 'विधिलिखित' ही नाटके कां चालली नाहीत. या नाटकातही बालगंधर्वांचे अमाप गाणे होते. पण 'एकच प्याला', 'स्वयंवर' 'सौभद्र' यासारखी नाटके आणि बालगंधर्वा सारखा लोकोत्तर अभिनय कुशल आणि गान कुशल नटसम्राट यांचा अपूर्व अशी जेव्हां युति झाली तेव्हांच नाट्यसंगीताचे ब्रह्म साकार झाले.

भवितव्यतेच्या पोटी असा 'बालगंधर्व' आणि गडकरी, खाडिलकरांसारखे नाटककार असतील तर भरत असाच 'नवनवल नयनोत्सव' मराठी रंगभूमीवर घडेलही, कोणी सांगावे ?

बाळ सामंत.

# गायकांच्या संक्षिप्त नावांचा खुलासा

| | |
|---|---|
| अज्ञम | अज्ञम बाई पिसाळ |
| आगरवाले | कृष्णा आगरवाले |
| आशा | आशा भोसले |
| आशालता | आशालता वाबगावकर |
| इंदिरा | इंदिराबाई खाडिलकर |
| उदय | उदयराज गोडबोले |
| कमल | कमलाबाई बडोदेकर |
| करीम | अबदुल करीम खां |
| कामत | रामदास कामत |
| कान्हो | कान्होपात्रा किणीकर |
| कीर्ति | कीर्ती शिलेदार |
| कुमार | कुमार गंधर्व |
| केत | बापूराव केतकर |
| केशव | केशवराव भोसले |
| कृष्णा | मास्तर कृष्णराव |
| गणेश | गणेश बलवंत |
| गुरव | विठ्ठल गुरव |
| गोदर | गोदर कर्नाटकी |
| चंद्र | भालचंद्र पेंढारकर |
| चितोबा | चितोबा गुरव |
| छोटा | छोटा गंधर्व |
| जय | जयमाला शिलेदार |
| जयश्री | जयश्री शेजवाडकर |
| जितेंद्र | जितेंद्र अभिषेकी |
| जुवेकर | नीलाक्षी जुवेकर |
| जोशी | जी. एन्. जोशी |
| दीना | दीनानाथ मंगेशकर |
| नगर | पंडितराव नगरकर |
| नेवरे | श्रीपाद नेवरेकर |
| पट | विनायकबुवा पटवर्धन |
| पंढर | जगन्नाथ बुवा पंढरपूरकर |
| पिल | अरविंद पिळगावकर |
| पु. ल. | पु. ल. देशपांडे |
| प्रकाश | प्रकाश घांग्रेकर |
| प्रभा | प्रभाकर काटकर |
| प्रभु | प्रभुदेव सरदार |
| बकुल | बकुल पंडित |
| बागूल | विश्वनाथ बागूल |
| बापू | बापू पेंढारकर |
| बाल | बालगंधर्व |
| भावसार | रतिलाल भावसार |
| भीम | भीमसेन जोशी |
| भोळे | ज्योत्स्ना भोळे |
| मनोहर | प्रो. मनोहर |
| माणिक | माणिक वर्मा |
| मालिनी | मालिनी राजूरकर |
| गोविंद | गोविंद माशेलकर |
| माधव | माधवराव वालावलकर |
| माने | सुरेशबाबू माने |
| मीनाक्षी | मीनाक्षी शिरोडकर |
| दामले | अनंत दामले |
| राणे | सरस्वती राणे |
| रानडे | जे. एल्. रानडे |
| राम | राम मराठे |
| लोंढे | गंगाधर लोंढे |
| वसंत | वसंतराव देशपांडे |
| शरद | शरद जांभेकर |
| शंकर | शंकरराव सरनाईक |
| पुरुषोतम | एस्. पुरुषोतम |
| शेंडे | कृष्णराव शेंडे |
| संग स्वर | संगमेस्वर गुरव |
| सुमन | सुमन माटे |
| सुरेश | सुरेश हळदणकर |
| सुशीला | सुशीला टेंबे |
| सुधा | सुधा माडगावकर |
| सुहास | सुहासिनी मुळगावकर |
| द. हल्याळ | दत्तोपंत हल्याळकर |
| हिरा | हिराबाई बडोदेकर |

# पदांची अनुक्रमाणिका

## बलवंत पांडुरंग किर्लोस्कर

### संगीत शाकुंतल नाटक


| | | | |
|---|---|---|---|
| १ | पंचतुंड नररुंड मालधर | .. | |
| २ | किती मधुर रूप | .. | |
| ३ | सखये अनुसूये | .. | |
| ४ | साध्य नसे मुनिकन्या | .. | |
| ५ | मना तळमळसी | .. | बाल, भोळे |
| ६ | काय मला भूल | .. | |
| ७ | जाई परतोनी | .. | बाल, भोळे |
| ८ | अजि शेवटचा | .. | |
| ९ | परक्याचें धन | .. | |


### सौभद्र


| | | | |
|---|---|---|---|
| १० | वैशाखमासि | .. | |
| ११ | होतो द्वारकाभुवनी | .. | पट |
| १२ | नाही झाले षण्मास | .. | |
| १३ | राधाधर मधु मिलिंद | .. | शरद |
| १४ | लग्नाला जातो मी | .. | एस्. पुरुषोत्तम, भार्गव |
| १५ | मी कुमार | .. | |
| १६ | पावना वामना | .. | विष्णु, भार्गव, वसंत |
| १७ | प्रियकर माझे | .. | बाल, सवाई |
| १८ | बलसागर तुम्हि | .. | नीलाक्षी |
| १९ | कांते फार तुला | .. | वसंत |
| २० | तस्करा हाती | .. | |
| २१ | कोण तुजसम सांग | .. | शेंडे, चिंतोबा बागुल, नेवरे, छोटा |
| २२ | व्यर्थ मी जन्मले | .. | बाल, हिरा |
| २३ | वद जाऊ कुणाला | .. | बाल, हिरा, सवाई, सुशीला |
| २४ | अरसिक किती हा | .. | बाल, सुहास |
| २५ | किती सांगु तुला | .. | बाल, सवाई, हिरा, शंकर, बाल राणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | माझ्या मनिचे | .. | बाल, सवाई |
| २७ | लाल शाल जोडी | .. | हल्याळ, छोटा, कामत, शेंडे |
| २८ | बहुत दिन नच | .. | नेवरे, प्रकाश, कामत |
| २९ | नम मेघानी | .. | बागुल, प्रभा |
| ३० | नच सुंदरि | .. | करीम, छोटा, बापू |
| ३१ | प्रिये पहा | .. | छोटा, प्रभा |
| ३२ | असताना यतिसंनिध | .. | |
| ३३ | पुष्पपराग सुगंधित | .. | बाल, हिरा, सुहास, केशव |
| ३४ | पांडुनृपति जनक | .. | बाल, हिरा, सुहास, केशव मालिनी. |
| ३५ | मन्नेत्र गुंतले | .. | बाल, हिरा, |
| ३६ | बहुत छळियले | .. | बाल, केशव, नेवरे |
| ३७ | माझी मातुल कन्यका | .. | |
| ३८ | माझ्यासाठी तिने | .. | |

## सं. रामराज्य वियोग

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | मन माझे भडकुनि | .. | केशव, बाल |
| ४० | कवणे तुज गांजियले | .. | |
| ४१ | शांत दांत | .. | दीना |

## वासुदेव नीलकंठ आगटे

### भक्त दामाजी

| | | |
|---|---|---|
| ४२ | गुन्हेगारी धन्याची | .. |

## वासुदेव नारायण डोंगरे

### इंद्र सभा

| | | |
|---|---|---|
| ४३ | इंद्र करी खरी | .. |
| ४४ | चतुर नार करी | .. |

## गोविंद बल्लाळ देवल

### मृच्छकटिक

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | सार्थचि ते वदती | .. | |
| ४६ | मरण बरे वाटते | .. | शेंडे |
| ४७ | दासी ऐसे मानुनिया | .. | |
| ४८ | काय कळा ही | .. | |
| ४९ | रजनीनाथ हा | .. | छोटा, पट, गोरे, नेवरे |
| ५० | माडिवरी चल ग | .. | बाल, मीनाक्षी |
| ५१ | रमवाया जाऊ | .. | बाल |
| ५२ | त्या मदनमनोरम रूपी | .. | मीनाक्षी |
| ५३ | जन सारे मजला | .. | बापू, नेवरे |
| ५४ | आनंदे नटती | .. | छोटा नेवरे |
| ५५ | बघुनि वाटे या | .. | छोटा |
| ५६ | चपला संगे या | .. | छोटा |
| ५७ | जलधर संघे नभ | .. | छोटा |
| ५८ | मेघा अति | .. | छोटा |
| ५९ | तेचि पुरुष दैवाचे | .. | शेंडे, बाल, प्रभा |
| ६० | जेथ मित्रा | .. | छोटा |
| ६१ | हा सकल देह | .. | बापू |
| ६२ | बाळा घालोनिया गळा | .. | बापू, छोटा |
| ६३ | काय बघिन मी | .. | कामत |
| ६४ | सखे शशिवदने | .. | जितेंद्र |
| ६५ | जो या नगरा | .. | इंदिरा |

### शापसंभ्रम

| | | | |
|---|---|---|---|
| ६६ | नंदनवन देवीने | | |
| ६७ | मित्रा मम जन्म | .. | शेंडे, मनो |
| ६८ | निराकार त्या | .. | |
| ६९ | सज्ज करूनि चाप | .. | |
| ७० | बहुत परिने | .. | बाल |
| ७१ | स्मरतापाच्या | .. | बाल |
| ७२ | त्या तरुणा | .. | |
| ७३ | मधुर किती कुसुमगंध | .. | |

## संशय कल्लोळ

| | | | |
|---|---|---|---|
| ७४ | हृदयि धरा हा बोध | .. | बाल, शरद |
| ७५ | सुकांत चंद्रानना | .. | प्रभा, सुरेश |
| ७६ | साम्य तिळहि | .. | |
| ७७ | निंद्य जीवन क्रम | .. | कामत |
| ७८ | कर हा करी | .. | नेवरे, प्रभा, बापू, वसंत |
| ७९ | धन्य आनंद दिन | .. | नेवरे, प्रभा |
| ८० | ही बहु चपल | .. | बापू, प्रकाश |
| ८१ | लग्नविधीतील खरे | .. | बाल, |
| ८२ | नाट्य गान निपुण | .. | बापू, कामत |
| ८३ | संशय का मनि आला | .. | बाल, कमल, मीनाक्षी |
| ८४ | कुटिल हेतु तुझा | .. | नेवरे, पट |
| ८५ | स्वकर शपथ | .. | पट, कामत |
| ८६ | मानिली आपुली | .. | सुरेश, कृष्ण, बापू, वसंत |
| ८७ | मृगनयना रसिक | .. | बापू, वसंत |
| ८८ | मजवरी तयांचे | .. | बाल, कमल |
| ८९ | हा नाद सोड सोड | .. | बापू, नेवरे, प्रभा |

## शारदा

| | | | |
|---|---|---|---|
| ९० | अजुनि खुळा हा | .. | बाल, मनोहर, गणेश |
| ९१ | काय पुरुष चळले | .. | बाल, |
| ९२ | सुंदर खाशी | .. | |
| ९३ | जठरानल शमवाया | .. | नेवरे. |
| ९४ | स्वार्थी जी प्रीति | .. | कामत, नेवरे |
| ९५ | जागृत ठेवा | .. | नेवरे, मनो, बापू |
| ९६ | कधी करिती लग्न | .. | भार्गव |
| ९७ | तरुण कुलीन गोरा | .. | |
| ९८ | सावळा वर बरा | .. | |
| ९९ | मज गमे ऐसा जनक | .. | बापू, नेवरे |
| १०० | बिंबाधरा मधुरा | .. | नेवरे, शेंडे, गोरे, मनो |

१०१ श्रीमंत पतीची राणी .. गणेश
१०२ म्हातारा इतुका ..
१०३ घेऊनि ये पंखा ..
१०४ मूर्तिमंत भीति उभी .. बाल, केशव मनो
१०५ बघुनि या भयंकर भूता
१०६ जो लोक कल्याण साधाया
१०७ घेई मम वचन

## माधवराव नारायण पाटणकर

### विक्रम शशिकला

१०८ हं मदंगा लावू नका ..

## श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

### वीरतनय

१०९ अंकित पदांबुजाची ..
११० तुझी अन्यथा तो

### प्रेमशोधन

१११ ललित बघुनि
११२ पसरे चोहिकडे
११३ घाली विधि कसा .. इंदिरा
११४ सेव्य संसार .. इंदिरा.
११५ जन असंभवा ..
११६ दावि पंथा अनुसरे ..
११७ हे जिवित सकल ..

### वीरतनय

११८ किती कोमल तनु ..
११९ पुनरपि नयना ..
१२० अशी ही सुगुणखनि ..

| | | | |
|---|---|---|---|
| १२१ | हे प्रभोविभो | .. | |
| १२२ | व्यक्त रदन | .. | गोरे |
| १२३ | मनि खेद न करि | .. | |
| १२४ | आलि कालि | .. | |
| १२५ | सुलभ मनि गणा | .. | बाल |
| १२६ | अवचित गेले किंकरकरि | .. | केशव सुधा |
| १२७ | उगीच का कांता | .. | बाल, केशव, हिरा, करीम, प्रभु |
| १२८ | जलधर घनतर | .. | |
| १२९ | होय संसार | .. | बाल केशव, |

## वधू परीक्षा

### ११-१०-१८२८

| | | | |
|---|---|---|---|
| १३० | सत्पात्र हो ललना | .. | लोंढे |
| १३१ | मानिले पित्याहुनि मी | .. | गोविंद |
| १३२ | जीव बाबरा | .. | लोंढे |
| १३३ | ब्राम्हण्य सारे | .. | बापू |
| १३४ | जीव हा लोपला | .. | गोविंद |
| १३५ | प्रेमा तिच्या नादे | .. | दामले |
| १३६ | हृदय जाळि | .. | बापू |

## भार्गव विठ्ठल वरेरकर

## कुंजविहारी

### १४-४-१९०८

| | | | |
|---|---|---|---|
| १३७ | ही प्रेम विमलतम | .. | |
| १३८ | वाहि तू तें | .. | बापू |
| १३९ | त्यजि भक्तासाठीं लाज | .. | भार्गव |
| १४० | सदा प्रणयविकासिनी | | |
| १४१ | चपलासि मंजुळ बाले | .. | |

## ह्याच मुलाचा बाप


| | | | |
|---|---|---|---|
| १४२ | कविता सुता ललित | .. | दामले |
| १४३ | कमला जनांचे घेई | .. | दामले |
| १४४ | कंपित अति शंकित | .. | बापू |
| १४५ | परिणाम होई सुखाचा | .. | दामले |


## जागती ज्योत


| | | | |
|---|---|---|---|
| १४६ | हासवी नाचवी हृदयाला | .. | हिरा |
| १४७ | जगी आभास हा दाविला | .. | हिरा |


## संन्याशाचा संसार

२५–९–१९१९


| | | | |
|---|---|---|---|
| १४८ | अविरत जगति फिरे | | माधव |
| १४९ | विटला या जगा | .. | बापू |
| १५० | वरिण झाली | .. | गुरव |
| १५१ | वांछिना भावना | .. | बापू दामले |
| १५२ | निराधार जीवे | .. | बापू, दामले |
| १५३ | बारे पांडुरंग | .. | बापू, दामले |
| १५४ | धुलियुता परि | .. | बापू |
| १५५ | का न जागे | .. | गुरव |
| १५६ | वैरी गमली अबला | .. | आगरवाले |
| १५७ | करि विचलित | .. | आगरवाले |
| १५८ | या जिवा जागवाया | .. | दामले |


## लयाचा लय


| | | | |
|---|---|---|---|
| १५९ | पिता मानिता नाथा | .. | |
| १६० | ललना लाडकी रुसली | .. | |
| १६१ | तुला गणिल काय | .. | |
| १६२ | जाणे आई माया | .. | |

## स्वयंसेवक

१६३ निजवश केला .. बापू
१६४ पाहिला देवसखा .. बापू
१६५ गुलामी हृदयगामी .. बापू
१६६ जेथे जातो तेथे .. बापू
१६७ नाहि दयिता मी .. भार्गव
१६८ या प्रणयी ललना मना .. भार्गव
१६९ देवा तुज नाहि दया .. गोविंद
१७० अणुभरि जिव जगला .. गोविंद

## सत्तेचे गुलाम

१७१ त्यागिला थारा .. बापू, दामले
१७२ शठमति सजला .. बापू
१७३ बोधा या न काय .. बापू, दामले, संगमेश्वर
१७४ वार्ता मौनदा हे .. बापू
१७५ तुझे पालनवाला .. बापू
१७६ सदा कलहाविना .. बापू, दामले
१७७ सुघी बालिका .. बापू
१७८ सुखाने रमाया .. दामले
१७९ ही माला विमला .. भार्गव

## तुरुंगाच्या दारात

१८० लांछना उगा जगासि .. बापू, दामले
१८१ निशिदिनी मनि हरिला .. बापू, दामले
१८२ जो का सजला .. बापू
१८३ दिस नसे कमला .. बापू

## सोन्याचा कळस

| | | | |
|---|---|---|---|
| १८४ | म्हाने चाकर | .. | बापू |
| १८५ | मेघपटला व्यापिला | .. | गोविंद |
| १८६ | पथ दिसता परि | .. | बापू |
| १८७ | या घरि असावा | .. | बापू |
| १८८ | तुझ्या वर दाना जीव | .. | बापू, दामले |
| १८९ | प्रिय जाहला का | .. | गोविंद |
| १९० | जगि वंचिता | .. | भार्गव |
| १९१ | फसलो या विरहाने | .. | बापू |
| १९२ | विसावा माझा साचा | .. | भार्गव |
| १९३ | ही जरि वसुधा उदार | .. | बापू |

## भूमिकन्या सीता

| | | | |
|---|---|---|---|
| १९४ | मी पुन्हा वनांत फिरेन | .. | भोळे |
| १९५ | मानसी राजहंस | .. | भोळे |

## बाबाजी दौलत राणे

### संत तुकाराम

### १९११

| | | | |
|---|---|---|---|
| १९६ | त्यजि भक्तासाठी लाज | .. | |
| १९७ | आनंदाचा कंद | .. | |
| १९८ | घ्या मुकुंद | .. | |

## कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

### मानापमान

### १२-३-१९११

| | | | |
|---|---|---|---|
| १९९ | हा टकमक पाही | .. | बाल, प्रभू |
| २०० | वरि गरिबा वीरा | .. | बाल |
| २०१ | माता दिसली | .. | छोटा, घर |
| २०२ | चंद्रिका ही जणु | .. | पट, दीना, शेंडे, करीम, बापू, छोटा, आझम, आशा |
| २०३ | या नव नवल | .. | छोटा, माधव, प्रभा, |
| २०४ | नयने लाजवीत | .. | बाल, माणिक, जय, इंदिरा, प्रभु |

| | | | |
|---|---|---|---|
| २०५ | खरा तो प्रेमा | .. | बाल, जय ,नीलाक्षी |
| २०६ | दे हाता या शरणा | .. | पट, शंकर, शेंडे, बापू, करीम, छोटा |
| २०७ | युवति मना दारुण | .. | पट, शेंडे, बापू, दीन, आशा |
| २०८ | मला मदन भासे | .. | बाल, इंदिरा, कुमार, जुवेकर |
| २०९ | धनराशि दिसता | .. | बाल, माणिक |
| २१० | रामरावणहि रणा जुंपिले | .. | |
| २११ | धिक्कार मन साहिना | .. | बापू |
| २१२ | नाही मी बोलत आतां | .. | बाल, जय |
| २१३ | शूरा मी वंदिले | .. | दीना, छोटा, आशा |
| २१४ | अजि टाकु गडे धनेवणा | .. | बाल |
| २१५ | माली चंद्र असे | .. | दीना, बापू, छोटा, कामत, आशा, प्रभा |
| २१६ | प्रेम भावे जीव जगि | .. | छोटा, शेंडे, माधव, करीम, बापू, प्रभा |
| २१७ | रवि मी | .. | दीना, आशा, प्रभा, सुरेश |
| २१८ | पाही सदा मी | .. | इंदिरा, |
| २१९ | शशिसूर्य प्रभा | .. | बाल, प्रभु |
| २२० | धनी मी पति | .. | बाल |
| २२१ | श्री नव नवरी | .. | बाल |
| २२२ | प्रिया अपराधी | .. | बाल] |
| २२३ | प्रेम सेवा शरण | .. | दीना, बापू, करीम, आशा |
| २२४ | मी अधना | .. | बाल, इंदिरा, जुवेकर. |
| २२५ | दूती नसे ही माला | .. | बाल |

## स्वयंवर

| | | | |
|---|---|---|---|
| २२६ | नच कधी रस | .. | कृष्ण |
| २२७ | नाथ हा माझा | .. | बाल, माणिक, कुमार |
| २२८ | मम आत्मा गमला | .. | बाल, कुमार |
| २२९ | सुजन कसा मन | .. | बाल, कुमार |
| २३० | एकला नयनाला विषय | .. | बाल, इंदिरा |
| २३१ | रमणि मजसि निजधाम | .. | |
| २३२ | रुप बली तो नरशार्दूल | .. | बाल, माणिक |

| | | |
|---|---|---|
| २३३ | कांता मजसि तूच | .. राम |
| २३४ | स्वकुल तारक सुता | .. बाल, माणिक, सुशीला, कुमार |
| २३५ | नरवर कृष्णा समान | .. बाल, इंदिरा, मालिनी |
| २३६ | बोल होईल फोल | .. पंढर, नेवरे |
| २३७ | जा भय न मम | .. पंढर, नेवरे |
| २३८ | अनृतचि गोपाला | .. बाल, इंदिरा, माणिक |
| २३९ | करीन यदुमनि | .. बाल, माणिक, सुशीला |
| २४० | प्रेम नच जाई | .. बाल |
| २४१ | लपविला लाल | .. कृष्ण |
| २४२ | अजि राधा बाला | .. बाल |
| २४३ | नृप कन्या तव जाया | .. बाल, माणिक |
| २४४ | मम सुखाची ठेव | .. बाल, इंदिरा, प्रभु |
| २४५ | सुंदर मुख ललना | .. |
| २४६ | गुरू सुरस गोकुळी | .. राम, नेवरे |
| २४७ | मम मनी कृष्ण सखा | .. बाल, इंदिरा |
| २४८ | वैरी मारायाला | .. बाल |
| २४९ | अचला विचला | .. बाल |
| २५० | त्वरा करा नाथा | .. बाल |

## द्रौपदी

| | | |
|---|---|---|
| २५१ | थाट समरिचा | .. बाल, इंदिरा |
| २५२ | धर्ममय ही काया | .. बाल |
| २५३ | लाजविले वैऱ्याना | .. बाल |
| २५४ | नयनीति ही नाही | .. कृष्ण |
| २५५ | पांडवा सम्राट पदाला | .. बाल, इंदिरा |
| २५६ | पुरुषाशी स्त्री ज्ञानमाला | .. कृष्ण |
| २५७ | विराट ज्ञानी | .. बाल, जुवेकर |
| २५८ | ठरला जणू मत्सर | .. बाल, इंदिरा |
| २५९ | लढवू गुरूला रणी | .. बाल |
| २६० | गमली मना | .. कृष्ण |
| २६१ | न रणूभूमि | .. कृष्ण |

## सावित्री

| | | |
|---|---|---|
| २६२ | असाचि दिसला | .. बाल |
| २६३ | प्रिय जरि हा सहवास | .. लोंढे |

२६४ योग्य न प्रेम वर्णना .. बाल
२६५ लाविना मन हे
२६६ मजला घडावी देवा .. बाल, प्रभु
२६७ सनातन नाद हा .. कृष्ण
२६८ सजला नटला जणु बाल
२६९ नयनीति बहुप्रेमळा .. लोंढे

## विद्याहरण

२७० आला जो मजप्रेमे .. बाल, हिरा.,
२७१ जाण जरि शत्रुला पट
२७२ भास मला झाला .. कृष्ण
२७३ सुरसुखखनि तू .. कृष्ण, पट, सुरेश, दीना, बसंत रानडे.
२७४ डोलत जीव देवकाया .. बाल
२७५ मधु मधुरा .. बाल, इंदिरा हिरा
२७६ मधुकर वन वन .. बाल, कृष्ण
२७७ जननि चला चला .. बाल
२७८ अहंकार माझा .. पट, बापू
२७९ तेजा नमि त्या .. कृष्ण
२८० दिसत न कशी .. हिरा
२८१ लोळत कच मुख .. कृष्ण, बागुल
२८२ विमल अधर .. पट, सुरेश
२८३ अतां राग देई मना .. बाल, इंदिरा, जुवेकर
२८४ लग्न होईना नाथा .. बाल
२८५ मद्य मद चोरी .. बागूल
२८६ तू का वदसि मला .. बागूल
२८७ मद्य वपु घट .. बागूल

## मेनका

२८८ भक्तिभाव हा घ्या सेवा .. बाल
२८९ संनिध जी .. बाल
२९० इथेच थारा पराक्रमाला .. बाल
२९१ भूषण संसारा .. बाल, इंदिरा

२९२ सत्य सत्य नच .. बाल
२९३ प्रियकर वश मजला .. बाल
२९४ अजि पुरवा ही हौस .. बाल
२९५ देहा विसरले नच, .. बाल

## वासुदेव नीलकंठ आगटे

### महानंदा

२९६ शिव शिव जन्मा ..
२९७ नट जन वेध खचित ..
२९८ मी नारि नरांचे ..
२९९ जे जे मी मागू ..

## वासुदेव वामन खरे

### चित्रवंचना

३०० नृपति कन्या का वाटे
३०१ मंजुळ किती मंथर ..

### उग्रमंगल

३०२ मानस का हे ..
३०३ आण तव गडे ..
३०४ चाले वसंत राजा ..
३०५ भाव मला भजकाचा .. दीना

## राम गणेश गडकरी

### पुण्यप्रभाव

३०६ वाजिव रे बाळा .. कमल
३०७ नाचत ना गगनात .. बापू, जितेंद्र
३०८ बोल ब्रिजलाला .. बापू,
३०९ निज बाळा रे .. बापू
३१० रंग अहा भरला ..
३११ चतुरा चातुरी ..

## भावबंधन

| | | |
|---|---|---|
| ३१२ | कठिण कठिण किती | ..दीना, आशा |
| ३१३ | जरठ बाला | ..लोंढे |
| ३१४ | स्त्रिया रणि बद्ध परिकरा | .. |
| ३१५ | सकल चराचरि | ..दीना |

## एकच प्याला

| | | |
|---|---|---|
| ३१६ | लागे हृदयि हुरहुर | .. |
| ३१७ | वेध तुझा लागे | .. |
| ३१८ | परम गहन ईशकाम | ..पंढर |
| ३१९ | छळती या हृदया | ..कृष्ण |
| ३२० | दहति बहु मना | ..बाल, हिरा, प्रभु |
| ३२१ | शंकहि नाही काली | ..बाल, हिरा |
| ३२२ | संसारि विषारी | ..पंढर |
| ३२३ | गुण गंभीरा | ..बाल |
| ३२४ | घास घेरे तान्ह्या बाळा | ..बाल |
| ३२५ | वसुधातल रमणीय | ..पट, नेवरे |
| ३२६ | झणिं दे कर या | ..पट, नेवरे |
| ३२७ | ललना मना | . कृष्ण, राणे |
| ३२८ | दया छाया घे | ..बाल, सुशीला |
| ३२९ | प्रणतनाथ, रक्षिकांत | ..बाल |
| ३३० | मानस कां बधिरावे | ..बाल, सुशीला |
| ३३१ | प्रणय जरि मंगला | .. |
| ३३२ | गणिसि काय खला माते | ..पंढर, नेवरे, पट |
| ३३३ | लोटु नका कांता | ..बाल |
| ३३४ | सत्य वदे वचनाला | ..बाल |
| ३३५ | कशिया त्यजू पदाला | ..बाल |
| ३३६ | जगी हत भागा | ..राणे |
| ३३७ | सोडि नच मजवरी | ..नेवरे |
| ३३८ | मान भंग दाही | ..कृष्ण |
| ३३९ | बघु नको मजकडे | .. बाल |

| | | |
|---|---|---|
| ३४० | असे पति देवचि | बाल |
| ३४१ | मज जन्म देई माता | बाल |
| ३४२ | प्रभु अजि गमला | बाल |

### राज संन्यास

| | | |
|---|---|---|
| ३४३ | साजणि बाई | |
| ३४४ | भासे जनात राया | दीना |
| ३४५ | आजवरि पाहुनि वाट | दीना |

### प्रेम संन्यास

| | | |
|---|---|---|
| ३४६ | प्रणया नवरुचि देता | . . लोंढे |
| ३४७ | सुखमय आशा | . . लोंढे |
| ३४८ | प्रभू प्रकटला | . . लोंढे |
| ३४९ | ऐसा महिमा प्रेमाचा | . . भावसार |
| ३५० | रमवि नयना | . . भावसार |
| ३५१ | सखये विसिरुनि जगताला | . . लोंढे |

## नारायण रामलिंग बामणगावकर

### आत्मतेज

| | | |
|---|---|---|
| ३५२ | लवकरि धाव रे | . |
| ३५३ | ती परम विमल | . . |

## यशवंत नारायण टिपणीस

### शहा शिवाजी

| | | |
|---|---|---|
| ३५४ | सांडुनिया रिपुरुधिरा | . . |
| ३५५ | देवता कामुकता रहिता | . . बापू, दामले |
| ३५६ | हा गगनपति | . . बापू, दामले |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५७ | निरखित सुखविते | .. | |
| ३५८ | अमरपद पावे | .. | |
| ३५९ | खर विषाचा प्याला | .. | |
| ३६० | हा हृदयिचा चेला | .. | |
| ३६१ | जन्मा यावे | .. | |

## आशा निराशा

| | | | |
|---|---|---|---|
| ३६२ | हजरत सलाम घ्यावा | .. | कृष्ण, सुशीला |
| ३६३ | नाचत रसा रसिका | .. | बाल, माधव |
| ३६४ | मान्य कांते वरिला | .. | वाल |
| ३६५ | तात करि दुहिता | .. | बाल, कुमार |
| ३६६ | दिलरूबा हा या जिवाचा | .. | बाल, सुशीला |

## शिक्का कट्यार

| | | | |
|---|---|---|---|
| ३६७ | मधुर हा पिसा | .. | दामले |
| ३६८ | ललना पाणिग्रहणा | .. | बापू |
| ३६९ | मंगल ते प्रियधाम | .. | बापू, दामले, कामत |
| ३७० | माया वचन दे | .. | बापू, दामले, प्रभा |
| ३७१ | तुझ्याविण भाव ना | .. | बापू, दामले, शरद |
| ३७२ | घुमत ध्वनि का | .. | शरद, बापू |
| ३७३ | सुखद जगि राजा | .. | प्रभा |
| ३७४ | स्वार्थी पसारा | .. | प्रभा बापू |
| ३७५ | पाहिन मी सखया | .. | |

## नेकजात मराठा

| | | | |
|---|---|---|---|
| ३७६ | किती अधम गांजी | .. | |
| ३७७ | रति रमणा | | |
| ३७८ | तव काय हा पाश | | |
| ३७९ | या जिवलगा कुणाच्या | | |
| ३८० | ना तुलना तव | | |
| ३८१ | कृतांत का न वांछि | .. | |
| ३८२ | प्रेम माया जयवंत | .. | |
| ३८३ | ही या मानसा | .. | |

## गोविंद सदाशिव टेंबे

### पटवर्धन

| | | | |
|---|---|---|---|
| ३८४ | प्रेम हे नितांत तुझे | .. | |
| ३८५ | तारिणी नव वसन | .. | |
| ३८६ | मितभाषिणी तीच कुलकामिनी | .. | हिरा, माणिक, आझम |
| ३८७ | वैरि भुजंग विषारी | .. | हिरा |
| ३८८ | शांत वा हो मानसा | .. | हिरा |
| ३८९ | मधुसूधदन हे माधवा | .. | |

### तुलसीदास

| | | | |
|---|---|---|---|
| ३९० | नच पार नाद | .. | कुमार |
| ३९१ | राम रंगिले मन | .. | भीम, नगर |
| ३९२ | प्रभुपद पंकजलीन. | .. | |
| ३९३ | परमगहन पाशा | .. | |

### वरवंचना

| | | | |
|---|---|---|---|
| ३९४ | काया नमविली | .. | |

## विठ्ठल सीताराम गुर्जर

### नंदकुमार

| | | | |
|---|---|---|---|
| ३९५ | वरित हा देवाच्या | .. | बाल |
| ३९६ | कुसुमा विधि चारुकांत | .. | कृष्ण |
| ३९७ | भाग्यवती भुवनात | .. | कृष्ण |
| ३९८ | तिमिर पटल भार | .. | बाल |
| ३९९ | मानसा या देहा | .. | |
| ४०० | तारावथा जन | .. | कृष्ण |
| ४०१ | अवधि न भाग्य | .. | कृष्ण |
| ४०२ | नच मानसा | .. | बाल |

## सदाशिव अनंत शुक्ल

### सत्याग्रही

| | | | |
|---|---|---|---|
| ४०३ | आनंदे विश्व रंगले | .. | शंकर |
| ४०४ | बाळा का रुचला | .. | शंकर |
| ४०५ | कुठे गुंतला | .. | जोशी, दामले |
| ४०६ | ॐ नमो भगवते | .. | दामले |

### सिंहाचा छावा

| | | | |
|---|---|---|---|
| ४०७ | चतुरे बोल ना | .. | |
| ४०८ | आई गे प्रशांत मने | .. | |

### सौभाग्यलक्ष्मी

| | | | |
|---|---|---|---|
| ४०९ | गोजिऱ्या कळ्यानो | .. | |
| ४१० | बोल हांसरे | .. | नगर |

### साध्वी मिराबाई

| | | | |
|---|---|---|---|
| ४११ | रुचिरुचि हा | .. | हिरा |
| ४१२ | त्राता प्रभु सकलांचा | .. | हिरा |
| ४१३ | ब्रिजलाला गडे | .. | हिरा |
| ४१४ | असार पसारा | .. | हिरा |

## वामन गोपाळ जोशी

### राक्षसी महत्वाकांक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| ४१५ | मी नवबाला जोगिण | .. | बापू |
| ४१६ | लावि चटक | .. | बापू |
| ४१७ | भान हरी हा | .. | बापू, दामले |
| ४१८ | सुख विलया जाय | .. | |
| ४१९ | प्रेमगानी सतत | .. | बापू |

## रणदुंदुभि

| | | |
|---|---|---|
| ४२० | परवशता पाश दैवे .. | दीना, आशा |
| ४२१ | आपदा राज पदा .. | दीना |
| ४२२ | जगि हा खास वेड्यांचा .. | दीना, आशा |
| ४२३ | वितरि प्रखर तेजोबल .. | दीना |
| ४२४ | दिव्य स्वातंत्र्य रवि .. | दीना, कामत |

# न. चि. केळकर

## कृष्णार्जुन युद्ध

| | | |
|---|---|---|
| ४२५ | गाढ झोप घेसी .. | बापू, दामले |
| ४२६ | हे अति नवल होत .. | बापू |
| ४२७ | हरिला झणि वरा .. | बापू |
| ४२८ | अंत न लागे .. | बापू, दामले |

# नरहर गणेश कमतनूरकर

| | | |
|---|---|---|
| ४२९ | सखि मुखचंद्र .. | बापू, दामले, गुरव |
| ४३० | पाणि दानी प्रेरणा .. | बापू |
| ४३१ | दैव देत नवा .. | बापू |
| ४३२ | मम बंधु सखा .. | बापू, दामले |
| ४३३ | आधार संसारि .. | गोविंद |
| ४३४ | पशुमात्र खचित गमला .. | बापू, दामले, शरद |
| ४३५ | कठिण कठिण जीवमान .. | गोविंद |
| ४३६ | आशा हासे .. | बापू |
| ४३७ | महिरत जिवाला .. | बापू |

## सज्जन

| | | |
|---|---|---|
| ४३८ | निशामय कालिया .. | बापू |
| ४३९ | तमांध झाला .. | बापू |
| ४४० | नच लघुता .. | भार्गव |
| ४४१ | उदित नवतारा .. | बापू |
| ४४२ | साडिला प्रखर .. | लोंढे |
| ४४३ | सुमती ग्रहण .. | |
| ४४४ | पाश तुटे हा .. | बापू |

## नारायण सीताराम फडके

### युगांतर

| | | | |
|---|---|---|---|
| ४४५ | जनमानस मंदिरात | .. | हिरा |
| ४४६ | ललना दिसे | .. | राणे |
| ४४७ | अधिर मन बावरे | .. | हिरा |
| ४४८ | किती सुखकर हा | .. | हिरा |
| ४४९ | घेई विहगसम | .. | हिरा |
| ४५० | पदपंकजाते प्रभुच्या | .. | हिरा |

## विनायक दामोदर सावरकर

### सन्यस्त खड्ग

| | | | |
|---|---|---|---|
| ४५१ | समयी सखा न | .. | दीना |
| ४५२ | शत जन्म शोधिताना | .. | दीना, वसंत |
| ४५३ | सुकतातचि जगि | .. | दीना, वसंत |
| ४५४ | मर्म बंधातली ठव | .. | दीना, वसंत, आशा, प्रभा |
| ४५५ | रति रंगी रंगे ध्यान | .. | दीना, जितेंद्र |

## ना. वि. कुळकर्णी

### कान्होपात्रा

| | | | |
|---|---|---|---|
| ४५६ | जोहार मायबाप | .. | |
| ४५७ | धाव घाली विठू | .. | नेवरे, गोहर |
| ४५८ | पति तो का नावडे | .. | पट |
| ४५९ | अवघाचि संसार | .. | गोहर, माधव |
| ४६० | नुरले मानस उदास | .. | बाल , राम |
| ४६१ | अशी नटे ही चारुता | .. | |
| ४६२ | शर लागला तुझा | .. | लोंढे |
| ४६३ | देवा धरिले चरण | .. | बाल, राम |
| ४६४ | पतित तू पावना | .. | बाल , हिरा, गोहर |
| ४६५ | दीन पतित तू | .. | नेवरे, गोहर |
| ४६६ | अगा वैकुंठीच्या | .. | नेवरे, गोहर, कृष्ण |

## वसंत शांताराम देसाई

### विधिलिखित

| | | |
|---|---|---|
| ४६७ | कोकिला रमवी | .. |
| ४६८ | ताराया दीन | .. कृष्ण |
| ४६९ | प्रेम भाव बोल | .. |
| ४७० | धरि धवल यशचि | .. पट |
| ४७१ | सांप्रत मज त्यजिले | .. |
| ४७२ | नंदनवन फुलले | .. |
| ४७३ | अखिल स्त्री जनांना | .. पट |

### अमृतसिद्धि

| | | |
|---|---|---|
| ४७४ | तूचि दिव्यांगना | .. लोंढे |
| ४७५ | गांजिसि वाया | .. लोंढे |
| ४७६ | तुमबिन मेरी कौन | .. बाल |
| ४७७ | पायोरी मैने | .. बाल |
| ४७८ | कटु योजना ही | .. लोंढे |
| ४७९ | गमते सदा मजला | .. बाल |
| ४८० | धन्य तूंचि कांता | .. लोंढे |
| ४८१ | धावत येई सख्या | .. बाल |
| ४८२ | प्रगट भयो भगवान | .. बाल |
| ४८३ | धवल लौकिका | .. लोंढे |
| ४८४ | लहरी लता | .. लोंढे |
| ४८५ | ही समज तव कुटिल | .. बाल |
| ४८६ | कांता वंचिता | .. लोंढे, प्रकाश |

## प्रल्हाद केशव अत्रे

### उद्याचा संसार

| | | |
|---|---|---|
| ४८७ | वेड लावी ती | .. छोटा |
| ४८८ | जगाचे बंध कोणाला | .. छोटा |

### लग्नाची बेडी

| | | |
|---|---|---|
| ४८९ | ती पाहताच बाला | .. छोटा, नगर |
| ४९० | चकोरा मीच तव | .. नगर |
| ४९१ | प्रिय न कवण | .. प्रसाद |
| ४९२ | भाग्यसूर्य नाशूनि | .. प्रसाद |

### वंदे मातरम्

४९३ वाजे नभी चौघडा .. नगर

### जग काय म्हणेल

४९४ हासरा चंद्रमा .. सुरेश
४९५ ललना देवता .. सुरेश

### पाणिग्रहण

४९६ उगवला चंद्र पुनवेचा .. वकुल

### प्रीतीसंगम

४९७ किती पांडुरंगा .. मोहिले
४९८ देह देवाचे मंदिर .. उदय
४९९ कृष्ण माझी माता .. उदय

## श्रीधर विनायक वर्तक

### आंधळ्याची शाळा

५०० तू माझी अन् तुझा मीच .. भोळे
५०१ एकलेपणाची आग लागली .. भोळे

## विश्वनाथ चिंतामण बेडेकर

### ब्रम्हकुमारी

५०२ विलोपले मधु .. प्रभु, आशा

## मोतीराम गजानन रांगणेकर

### कुलवधु

५०३ क्षण आला भाग्याचा .. भोळे
५०४ मन रमणा .. भोळे
५०५ बोला, अमृत बोला .. भोळे

### अलंकार

५०६ मधुर वचना .. भोळे
५०७ अधनाही शोभेना .. भोळे

## वहिनी

५०८ पाखरा , जा .. पुल
५०९ ललना कुसुम कोमल .. पुल

## तुझं नी माझं जमेना

५१० रुसली राधा .. भोळे

## एक होता म्हातारा

५११ ये आणि ये रे .. भोळे
५१२ छंद तुझा .. भोळे
५१३ नाच हृदया आनंदे .. भोळे
५१४ हांस हांस रे .. भोळे

## कोणे एके काळी

५१५ दे मज देवा .. भोळे
५१६ का रे ऐसी माया .. भोळे

## नागेश जोशी

## देवमाणूस

५१७ सुखवीत या .. छोटा
५१८ छळी जीवा .. छोटा
५१९ चांद माझा .. छोटा
५२० दिलरुबा मधुर .. छोटा

## ह. वि. देसाई

## अर्ध्या वाटेवर

५२१ रंग उधळले .. केसर
५२२ मानसीच्या या मंदिरी .. केसर

## गो. ल. आपटे

## सं. देहू रोड

५२३ सखि भावगीत माझे .. नगर
५२४ गातो नाचतो आनंदे .. नगर

## विद्याधर संभाजी गोखले

### सुवर्णतुला

| | | | |
|---|---|---|---|
| ५२५ | उजळित जग | .. | कान्हो |
| ५२६ | पारिजात फुलला | .. | जय |
| ५२७ | रागिणी मुखचंद्रमा | .. | प्रसाद |
| ५२८ | येतिल कधी यदुवर | .. | जय |
| ५२९ | तुजला वंचियले | .. | |
| ५३० | रतिहुति सुंदर | .. | प्रसाद |
| ५३१ | गगनमणि सूर्य हा | .. | |
| ५३२ | फुलला मनी वसंतबहार | .. | कान्हो |
| ५३३ | नारायण नारायण | .. | छोटा |
| ५३४ | धीर धरी भामिनी | .. | |

### पंडितराज जगन्नाथ

| | | | |
|---|---|---|---|
| ५३५ | सावन घन गरजे | .. | प्रसाद |
| ५३६ | मदनाचि मंजिरी | .. | चंदू |
| ५३७ | नयन तुझे जादुगार | .. | चंदू |
| ५३८ | जय गंगे भागीरथी | .. | प्रसाद |

### मंदारमाला

| | | | |
|---|---|---|---|
| ५३९ | जय शंकरा | .. | राम |
| ५४० | जयोऽस्तुते | .. | राम |
| ५४१ | सोड हम हर डमरु | .. | राम, मोहिले |
| ५४२ | तारे नही ये तो | .. | प्रसाद |
| ५४३ | बुझावो दीप ऐ सजनी | .. | प्रसाद |
| ५४४ | बसंतकी बहार आयी | .. | राम, प्रसाद |
| ५४५ | हरि मेरे जिवन प्राण | .. | राम |
| ५४६ | कोण असति तू | .. | राम |
| ५४७ | तारिल हा तुज | .. | राम |

### मदनाची मंजिरी

| | | | |
|---|---|---|---|
| ५४८ | मजला कुठे न थारा | .. | कामत |
| ५४९ | मानिनी, सोड तुझा | .. | प्रकाश |
| ५५० | तारिल तुज अंबिका | .. | शरद |

५५१ अंग अंग तव .. सुमन
५५२ ये मौसम है ..
५५३ ऋतुराज आज मनि ..

## जय जय गौरी शंकर

५५४ सप्त सूर झंकारित .. राम, चंदु, प्रसाद
५५५ मरे मनात सुंदरा .. प्रसाद
५५६ निराकार ओंकार .. राम
५५७ नारायणा रमा रमणा .. प्रसाद
५५८ सावज माझं गवसल .. जयश्री
५५९ छंद नसे हा मला .. जयश्री
५६० कशि नाचे छमाछम .. राम

## मेघमल्हार

५६१ गुलजार नार ही .. वसंत
५६२ धनसंपदा न लगे .. राम
५६३ रंग रंग उधळित ..
५६४ दुनियेच्या अंधेर नगरिचा .. राम
५६५ धीर धरी .. वसंत

## स्वरसम्राज्ञी

५६६ टुमदार कुणाची छान .. बागुल
५६७ कशि केलीस माझी दैना .. कीर्ति
५६८ गुन सागर गंभीर .. बागुल
५६९ एकलीच दीपकळी .. कीर्ति
५७० रे तुझ्यावाचून काही .. कीर्ति

## चमकला ध्रुवाचा तारा

५७१ कोपलास का .. जय
५७२ उधळीत प्रलयाचा .. लता
५७३ ओम् नमो भगवते .. बागूल

## वसंत शंकर कानेटकर

### मत्स्यगंधा

| | | | |
|---|---|---|---|
| ५७४ | देवाघरचे ज्ञात कुणाला | .. | कामत |
| ५७५ | गुंतता हृदय हे | .. | कामत |
| ५७६ | साद देती हिमशिखरे | .. | कामत |
| ५७७ | नको विसरू संकेत | .. | कामत |
| ५७८ | तव भास अंतरा | .. | आशालता |
| ५७९ | गर्द सभोती रानसाजणी | .. | आशालता |
| ५८० | अर्थशून्य भासे मजला | .. | आशालता |

### मीरामधुरा

| | | | |
|---|---|---|---|
| ५८१ | अशी सखी सहचरी | .. | कामत |
| ५८२ | चंद्र हवा धनविहित | .. | कामत |
| ५८३ | स्वप्नात पाहिले जे | .. | कामत |
| ५८४ | आनंद सुधा वरसे | .. | कामत |

## पुरुषोत्तम दारव्हेकर

### धनःश्याम नयनी आला

| | | | |
|---|---|---|---|
| ५८५ | सुखवितो मधुमास | .. | प्रसाद |
| ५८६ | ही कोण कनकांगी | .. | प्रसाद |

### कट्यार काळजांत घुसली

| | | | |
|---|---|---|---|
| ५८७ | तेजोनिधि लोहगोल | .. | वसंत |
| ५८८ | या भवनातिल कवन | .. | वसंत |
| ५८९ | घेई छंद मकरंद | .. | वसंत, प्रसाद, जितेंद्र |
| ५९० | दिन गेले भजनाविण | .. | भार्गव |
| ५९१ | हे नंदलाल | .. | प्रसाद |
| ५९२ | सुरत पियाकी | .. | वसं। |

## विष्णु वामन शिरवाडकर

### ययाति देवयानी

| | | | |
|---|---|---|---|
| ५९३ | यतिमम मानित या | .. | कामत |
| ५९४ | मी मानापमाना | .. | कामत |
| ५९५ | प्रेम वरदान | .. | कामत |
| ५९६ | सर्वात्मका सर्वेश्वरा | .. | जितेंद्र |
| ५९७ | तम निशेचा सरला | .. | कामत |

## बाळ कोल्हटकर

### दुरितांचे तिमिर जावो

| | | | |
|---|---|---|---|
| ५९८ | आई तुझी आठवण | .. | चंदु |
| ५९९ | तू जपून टाक पाऊल | .. | चंदु |

### देव दीनाघरी धावला

| | | | |
|---|---|---|---|
| ६०० | ऋणानुबंधाच्या जिथून | .. | कुमार |

### वाहतो ही दुर्वांची जुडी

| | | | |
|---|---|---|---|
| ६०१ | निघाले आज तिकडच्या घरी | .. | माणिक |

## चि. य. मराठे

### होनाजी बाळा

| | | | |
|---|---|---|---|
| ६०२ | श्रीरंगा कमलाकांता | .. | सुरेश |

## गोपाळकृष्ण भोबे

### धन्य ते गायनी कळा

| | | | |
|---|---|---|---|
| ६०३ | हे करुणाकरा | .. | कामत |
| ६०४ | दान करी रे | .. | कामत |
| ६०५ | चिरंजीव राहो | .. | कामत |

### योगिनी जोगळेकर

### रंगात रंगला श्रीरंग


६०६ मधुर स्वरलहरी .. राम
६०७ हे सागरा .. राम


### रणजित देसाई

### हे बंध रेशमाचे


६०८ छेडियल्या तारा .. वसत
६०९ आज सुगंध आला .. वसंत
६१० विकल मन आज .. बकुल
६११ कां धरिला परदेश .. बकुल
६१२ काटा रुते कुणाला .. जितेंद्र
६१३ पंथ जात धर्म .. जितेंद्र
६१४ संगीत रस, सुरस .. कामत
६१५ दैव किती अविचारी .. कामत


'एकच प्याला' नाटकांतील पदे विठ्ठल सीताराम गुर्जर यांची,
'प्रेमसंन्यास' नाटकांतील पदे वसंत शांताराम देसाई यांची,
'हे बंध रेशमाचे' नाटकांतील पदे शांता शेळके यांची.

—★—



संशय कल्लोळ–रेवती (बालगंधर्व)



नानासाहेब जोगळेकर.

'असा धैर्यधर परत झाला नाही'.



'संशय कल्लोळ' नाटकांत बालगंधर्व आणि पेटकर.



'मानापमान' नाटकांत जोगळेकर आणि बालगंधर्व.



'संयुक्त मानापमान' मधील नटवर्ग.



'मानापमान' नाटकांत बालगंधर्व.



विनायक बुवा पटवर्धन (अर्जुन) आणि बालगंधर्व (सुभद्रा).



'सौभद्र' नाटकांत बालगंधर्व.




'संशय कल्लोळ'–रानडे आणि गणपतराव बोडस.



'विद्याहरण'–बालगंधर्व आणि गोविंदराव टेंबे.



'आशा निराशा' (बालगंधर्व)



'स्वयंवर' (बालगंधर्व)-१९१३



'माडिवरी चल ग गडे' (मृच्छकटिक)



'आजि टाकू गडे धनवेषा' (मानापमान)



'एकच प्याला' नाटकांत बालगंधर्व आणि बोडस



सौभद्र नाटकांत कृष्ण (बोडस),



शापसंभ्रम, बोडस (कपिंजल)



'आशा निराशा' (बालगंधर्व)



'स्वयंवर' (बालगंधर्व)-१९१३



'माडिवरी चल ग गडे' (मृच्छकटिक)



'आजि टाकू गडे धनवेषा' (मानापमान)



'एकच प्याला' नाटकांत बालगंधर्व आणि बोडस



सौभद्र नाटकांत कृष्ण (बोडस), बालगंधर्व (सुभद्रा)



शापसंभ्रम, बोडस (कपिंजल)



'कान्होपात्रा' नाटकांत बालगंधर्व.



'सिंधू' (बालगंधर्व)



द्रौपदी--१९२० (बालगंधर्व)

# बळवंत पांडुरंग किर्लोस्कर

## संगीत शाकुंतल नाटक
(३१–१०–१८८०)

### नांदी

१

(राग खमाज, ताल–धुमाळी, चाल–जय श्री रमणा भवहरणा)

पंचतुंड नररुंड मालधर पार्वतीश आधी नमितो ॥ विघ्नवर्गनग भग्न कराया विघ्नेश्वर गणपति मग तो ॥ पंच० ॥ धृ० ॥ कालिदास कविराज विरचित हें, गाती शाकुंतल रचितों ॥ जाणुनिया अवसान नसोनि महत्कृत्य भर शिरिं घेतो । ईशवराचा लेश मिळे तरि मूढ यत्न शेवटि जातो ॥ या न्याये बलवत्कवि निजवाक्यपुष्पी रसिकार्चन करितो ॥ पंचतुंड नर० ॥

२

(राग लीलांबरी, ताल–धुमाळी, चाल–बाळा म्हणसी पाणी रे पाणी)

किती मधुर रुप तरि यांचे । मम नेत्र धन्य अजि साचे ॥
नृपमंदिरी यापरि कैचें । वन हरि सत्व बागेचें ॥ किती वर्णु
येईना वाचे । त्या बघता कामि न वांचे । हळुं हळुं चमकति
बागेतुनिया । विद्युलता तशा या ऋषिजा । भाग्योदय माझा ॥

३

(राग पिलू ताल–धुमाळी)

सखये अनुसूये थांबकि बाई । येते मी अशि का घाई ॥
रुतला दर्भांकुर माझ्या पांई । मजला तो दुस्सह होई ।
साडी कोरांटीस गुंतून जाई । सोडविते तोंवरी राही ।

४

(राग काफी, ताल दीपचंद, चाल–भोलानाथ दिगंबर)

साध्य नसे मुनिकन्या । मज ही, परिवेडे मन ऐकत नाही ॥ धृ० ॥
पाहुनि सखिच्या विविध विलासा ॥ मन घेई हे बहु विश्वसा ॥
स्मर जरि तुष्ट न होई ॥ मी परि बहु सुख यांतच घेई ॥१ ॥

५

(राग पिलू, ताल त्रिताल, चाल–सदाशिव धुंदी)

मना तळमळसि, उगिच का असा हळहळसी, प्रथम फसलेंसी ॥ धृ० ॥

ऐन सुखाच्या समयी भीति धरुनि कसें बसलेंसी ॥ १ ॥

लता मंडपा सुख सेवाया, येईन पुनः तुजपासीं ॥ २ ॥

६

[राग आनंदभैरवी, ताल–दादरा]

(नको नको स्त्रीसंग नामग्रहण, या चालीवर)

काय मला भूल पडलि, भान हरपलें ।

ते मुख वर केलें परी नाहीं चुंबिलें ॥ काय० ॥

सुंदरिने अंगुलिनी ओठ झांकिलें ॥

नको नको ऐसे म्हणत तोंड फिरविलें ॥

प्रेमभरे तिने अर्ध नेत्र मिटियले ॥

ऐशा त्या ऐन रंगि व्यंग जाहले ॥ १ ॥

७

[राग असावरी, ताल त्रिताल]

(गंगेत लोटा हो, या चालीवर)

जाई परतोनी बाळा, जाई परतोनी । निष्ठुर मी तुज टाकुनि जातें

येशि कशाला माझ्या मागोनी ॥धृ० ॥ जन्मताच तव जननी

गेली सोडनि तुज या तपोवनी ॥ मीच पाळिले लाड करोनी,

कांहि न अडलें कीं तुझें गेलें जरी मी, काय उणें तुज,

साभाळिती बाबा तुज लागुनि ॥ जाई० ॥ १ ॥

८

(राग पिलु–ताल धुमाळी चाल– अजि अक्रुर हा)

अजि शेवटचा, लाभचि हा ममतेचा, मज होय तुमच्या करिंचा ।

बहु दावियले प्रेम निरंतर अपुलें, कधी नाही अंतर पडलें ॥ प्रति

दिवशी कोमल करिंची वेणी फणी आता कैची ॥ त्या आशेचा

लेश न उरला साचा, शोक न आवरे मनिंचा ॥ १॥

[साकी– राग जोगी, ताल–घुमाळी]

परक्याचे धन कन्या ते द्या देउनि आज मि सुटलो ॥
ठेव जशी मालकासि अर्पुनि आज ऋणांतूनि फिटलो ॥
म्लिनो या आता, गेली लाडकि मम दुहिता ॥ १ ॥

---

## सौभद्र

(१८-११-१८८२)

१०

(दिल छीनलिये, या चालीवर.)

वैशाखमासिं वासंतिक समय शोभला । आम्रासव पिउनि गान करिति कोकिला ॥धृ०॥ या जाइजुई मोगरिला बहर तो अला । गुंजारव करण्यांत गुंग मधुप जाहला । नव पल्लव ते फुटति सकल वृक्षगणांला । कुसुमगंधयुक्त मंद वात सूटला । वै०॥ १ ॥ अति थंडगार चंदनाचि उटी लावुनी । वर जातिपुष्प-धवल हार कंठि घालुनी । रमतात युवति चांदण्यांत पतिस घेउनी ॥ लोकां शीतोपचार इष्ट वाटला ।वै० ॥ २ ॥ नगरांत लग्नमंडपांचि दाटि जाहली । नरनारि नटुनि वीथित मिरवित चाललीं । बहु वाद्यगजर दुमदुमुनी गर्दि उसळली । दक्षिणार्थ भिक्षुकगण पळत सूटला ।वै०॥ ३ ॥

११

[राग झिंजोटी– ताल दादरा]

नाहीं झाले षण्मास मला राज्य सोडुनी । तोच विपरीत हे काय ऐकण्यांत ये जनीं । नाहि. ॥धृ० । काय माझा तो भाग अंधपुत्र सेवितो । काय देवकिचा तनय कृष्ण वचन मोडितो काय हलधर नवरत्न मर्कटासि अर्पितो । नवल हेचि मन्मनीं । नाहीं०॥१॥

१२

(विठाई माउली, या चालीवर)

राधाधरमधुमिलिंद । जयजय रमारमण हरि गोविंद ॥धृ०॥
कालिंदी–तट–पुलिंद–लांछित सुरनुतपादारविंद । जय ०॥ १ ॥
उद्धृतनग मध्वरिदमानघ सत्यपांडपटकुविंद । जय ०॥२ ।
गोपसदनगुर्वालिदखेलन बलवत्स्तुतितें न निंद । जय०॥ ३ ।

## १३

(कर्पुरधवलांगा, या कर्नाटकी चालीवर.)

होतों द्वारकाभुवनीं । पाहिली प्रिया नयनीं । पूर्ण होती मला वशिनी । कसा शठ ती वरिल कामिनी । होतों ॥धृ०॥ ती तरुणी मजला निरखुनि वर शशिकर–विकसित कुमुदिनीपरि हरिखुनि किंचित मुरडुनि मधुर स्मित करि करिगमनि । होतों० ॥१॥

## १४

[राग विहाग– ताल दादरा.]

लग्नाला जातों मी द्वारकापुरा । देतो निज भगिनि राम कौरवेश्वरा ॥ धृ० ॥ उत्सव बहु थोर होत । मिळतिल भूपाल अमित । सुर नर मुनि सर्व येत । नट नर्तक सकल जमत । न मिळे अशि मौज पुन्हा पाहण्या नरा ॥१ ॥

## १५

(उद्धवा शांतवन कर जा, या चालीवर.)

मी कुमार तीहि कुमारी असतांना जागी एका । वाढलों खेळलों प्रेमें प्रिय झालों एकामेकां । वरिल ती सुभद्रा मजला हा निश्चय सर्वां लोकां । (चाल) तैशांत रामकृष्णांनीं । वडिलांचें मत घेवोनी । मज दिधली ऐसें म्हणुनी । शेवट मग केला हा कां (चाल) जो प्रीतितरू वाढविला । त्यांनींच कसा तोडविला ॥१॥

## १६

(गर्भाच्या चालीवर.)

पावना वामना या मना । दे तव भजनीं निरंतर वासना ॥ धृ० ॥ श्रीवत्सांकित कौस्तुभधारिन् ॥ योगिजनांतररंजना ॥१ ॥ भो प्रल्हादपरा हरिरूपा । मत्तनिशाचरकंदना ॥२ ॥ नवतुलसीदलमालाभूषो । बलवद्भवभयभंजना ॥ ३ ।.

## १७

(पडतां वेणुरव कानीं, या चालीवर)

प्रियकर माझे भ्राते मजवरी निष्ठुरता हृदयीं धरिती । कर्मगति
अशी कैशी झाली आप्त सर्व वैरी होती ।।धृ०।। आशा बहु
कृष्णावरती । होती निष्फळ झाली ती । मातातताची गणती ।
वृद्ध म्हणुनि कोणी न करिती । सर्वही दादाच्या हातीं ।
त्याला कोणी नच वदती । अंधसुतानें वरण्याहुनि मज मृत्यु
बरा वाटे चित्तीं । प्रि० ।।१ ।।

## १८

[राग पिलू– ताल धुमाळी]

बलसागर तुम्हि वीर शिरोमणी कोठेतरी रमलां । आश्वासन
जिस दिले तिला का विसरुनिया गेला ।। धृ०।। पेरियलें जें
प्रीतितरुन्नें बीज हृदयिं त्याला । अंकुर येउनि सुदृढ
तयाचा वृक्ष असे झाला । सुंदर तुम्ही मूर्तिमान तच्छायेला बसलां ।
चित्र असे हृदयांत कोंदता ठाव न अन्याला ।।

## १९

[राग कर्नाटकी– ताल दीपचंदी]

कांते फार तुला मजसाठीं श्रम सखये पडले । योग्य नसुनि मी
प्रेमाला तव व्यर्थ सखे मजवरि तें जडले ।। धृ० ।। जरि वरिला
असता दुर्योधन । पाहिली तरि असती नेत्रांनीं । काय करूं
तुज शोधूं कोठें । धैर्य पहा सर्वहि तें खचलें ।। कांते० ।। १ ।।

## २०

(समज धर गड्या, या चालीवर.)

तस्कराहातीं । द्विजगोधन हरिलें । तयां पार्थासि शरण
आणिलें । आयुधागारीं धर्मा निजविलें । द्रौपदीसह त्या
दावियलें । मुनीच्या दंडा । पात्र त्यास केलें । तीर्थाटना
पाठविलें । नारदातें मीं । त्यासि भेटवीलें । इकडचें वृत्त जाणविलें ।।१ ।।

## २१

(धन्य दिवस आज वर्णू, या चालीवर.)

कोण तुजसम सांग मज गुरुराया । कैवारी सदया । पाहिजे तें अंगी स्वीकाराया । भवदुःख हराया । कोण० ॥धृ० ॥
तूंचि विष्णु, तूंचि शिव, तूं धाता । तूं विश्वंभरता । तूंचि व्यापक-याप्यातें प्रसवीता । तूं मायेपरता । कोण० ॥१ ॥
तूंचि शिष्या पोसणारी माता । तूं विद्यादाता । तूंचि देशी तत्त्वनिधी निजह्राता । तारक बलवंता ॥ कोण० ॥

## २२

(शिव शिव फसलों साजणि येउनि, या चालीवर)

व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं । लागला सर्वदा फांस गळीं ॥ व्यर्थ० ॥धृ०।
नच ठावें स्वातंत्र्य कसें तें । बंदित वास मुळीं ॥ व्यर्थ० ॥ १ ।
गरिबापोटीं येतें तरि ते । मज नच देते बळी ॥ व्यर्थ० ॥२ ॥

## २३

(जो चिदानंदकंद, या चालीवर.)

वद जाउं कुणाला शरण करी जो हरण संकटाचें । मी धरिन चरण त्याचे । अग सखये । मी धरिन० ॥धृ० ॥ बहु आप्त बंधु बांधवां प्रार्थिलें कथुनि दुःख मनिंचें । तें होय विफल साचें । अग सखये । तें होय वि० । मम तात जननि मात्र तीं बघुनि कष्टती हाल ईचे । न चलेंचि कांहिं त्यांचें । अग सखये ॥ न चले० ॥ जे कर जोडुनि मजपुढे नाचले थवे यादवांचे । प्रतिकूल होति साचे । अग सखये ॥प्रति० ॥

## २४

(अहा हे कृष्णा मुकुंदा, या चालीवर)

अरसिक किति हा शेला । त्या सुंदर तनुला सोडूनि आला । अर० ॥ धृ० ॥ प्रेमे प्राणपतीला । मी संतोषें हा अर्पण केला । दुर्मिळ जें स्थळ मजला । तें सहज मिळुनि या दुर्भाग्याला । तेथुनि कां हा ढळला । त्या सत्संगतिला कैसा विटला । कोंडून ठेविन याला । मज दृष्टीस नलगे निष्ठुर मेला । अर० ॥१ ॥

## २५

[रागिणी आनंदभैरवी, ताल धुमाळी.]

किती सांगुं तुला मज चैन नसे ।। धृ० ।। हें दुःख तरी मी साहुं कसें । या समयिं मला नच कोणी पुसे । हा विरह सखे मज भाजितसे (चाल) मन कसें आवरूं । किती धीर धरूं । कस करूं । कि० ।। १ ।। हे बंधु नव्हत मम वैरी खरे । दावीती कसें वरि प्रेम बरें । बोलोनी पाडीती हृदयासी घरें । (चाल) नको नको मला जिव । विष तरि पाजिव । सखे सोडिव । कि० । २।।

## २६

[राग जोगी— धुमाळी]

माझ्या मनिचे हितगुज सारे ठाऊक कृष्णाला ।
ऐसे असुनी दुःखावरती देतो डागाला ।। धृ ० ।।
अर्जुनजीला मज द्यावी हे आपणची वदला ।
आशा मज बहु दावुनि ऐसा घात करुं सजला ।
जैसा वरती दिसतो काळा आंतुनही झाला ।
तारिल म्हणुनी धरिलें ज्याला तुडवी तो मजला ।।१ ।।

## २७

(दक्ष वदे हा देव कशाचा, या चालीवर.)

लाल शालजोडी जरतारी झोकदार शिरिं बांधोनी । नाचत चाले जैसा येतो रंगभूमिवर नट सजुनी । वाजे कडकड छाटि गुलाबी माळ जपाची करिं धरुनि । ध्यान धरुनि बैसतां दिसे मज दांभिकपण वर ये फुटुनि । सर्वांगावर भस्माचे ते पुंड्र लावि किति रेखोनी । त्य वरि रुद्राक्षांच्या माळा घालितसे तरि किती जपुनी । स्फटिकाची तीं सुबक कुंडलें डुलतांना हलती कानीं । पायिं खडावा चटचट करिती दंड शोभती करिं तीन्ही ।।१ ।।

## २८

दिंडी

बहुत दिन नच भेटलों सुंदरीला । म्हणुनि धरुनि बैसेल रुष्टतेला ।।
करिन जेव्हां मी बहुत आर्जवाला । पात्र होईन मग मधुर सुहास्याला ।

२९

[राग मल्हार, ताल–त्रिताल.]

नभ मेघांनीं आक्रमिलें। तारांगण सर्वहि झांकुनि गेले ॥ धृ० ॥
कड कड कड कड शब्द करोनि। लखलखतां सौदामिनी।
जातातचि नेत्र दिपोनि। अति विरहि जन ते व्याकुल झाले ॥
नभ० ॥ १ ॥

३०

(बिडोरंगा ह्यरळू, या कर्नाटकी चालीवर. ताल– दादरा.)

नच सुंदरि करूं कोपा। मजवरि धरिं अनुकंपा। रागानें तव तनु ही पावत कशि कंपा। नच० ॥ धृ० ॥ नारी मज बहु असती। प्रीती परि तुजवरती। जाणसि हें तूं चित्तीं। मग कां ही अशि रीती। करिं मी कोठें वसती। परि तव मूर्ती दिसती (चाल) प्रेमा तो मजवरिचा नेउं नको लोपा ॥
॥ नच० ॥ १ ॥ कर पाशी या तनुला।
बांधुनि करि शिक्षेला। धरुनियां केशाला।
दंतव्रण करि गाला। कुचभल्ली वक्षाला।
टोचुनि दुखवीं मजला (चाल) हाचि दंड योग्य असे
सखये मत्पापा ॥ नच० ॥ २ ॥

३१

[राग भूपाळी. ताल– दादरा.]

प्रिये पहा रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हा ॥ धृ० ॥
थंडगार वात सुटत। दीपतेज मंद होत। दिग्वदनें स्वच्छ करित। अरुण पसरि निज महा ॥ प्रिये० ॥ १ ॥ पक्षि मधुर शब्द करिति। गुंजारव मधुप वरिति। विरलपर्ण शाखि होति विकसन ये जलरुहा ॥ प्रिये० ॥ २ ॥ सुखदुःखा विसरुनियां। गेले जें विश्व लया। स्थिति निज ती सेवाया।
उठलें कीं तेंच अहा ॥ प्रिये० ॥ ३ ॥

३२

(राग जिल्हा. ताल–धुमाळी. आवडली हरिला, या चालीवर.)

असतांना यतिसंनिध किंचित सुख वाटतें। परि एकटी बसतां हाय दुःखें मन दाटते। (चाल) चार मास जाऊनियां आतां येइल तो दिन शेवटचा। ऐसें मानीं येउनि शयनीं तळमळतें निशि सारि। मग हें चित्त फाटते ॥ अस० ॥

## ३३

(कोणी जाये व्रिजमों दधिवेचन, या चालीवर.)

पुष्पपरागसुगंधित शीतल अतिमंद चरे वनवायु हा । निखिल
तरूंतिल पक्षि उठोनि शब्द करिति किति मंजु हा ॥ पुष्प० ॥धृ० ॥
निबिडकुंजमुखिं मोर मयूरी नटुनि थटुनि नाचति हे । हरिण
उडति बहु शशक धांवति गिरिवरि डोलत नाग हा ॥ ॥ पुष्प० ॥ १ ॥

## ३४

(श्रीसागर नम्मनी, या कर्नाटकी चालीवर.)

पांडुनृपति जनक जया । माता कुंति यदुतनया । धर्म भीम
बांधव जया । नामें विजय जो ॥ १ ॥ अर्पियलें या शरिरा ।
तया लोकधनुर्धरा । न फिरे जरि चराचरा । कंठ चिरियला ॥ २ ॥

## ३५

(मंजुळ बोले, या चालीवर.)

मन्नेत्र गुंतले । लुब्ध झाले । ज्यांवरी असे ॥ चित्तांत सांचले ।
तेचि आले । बाहेरी तसे । (चाल) नरवर हे काय बाई ।
शुद्ध मन हें । साक्ष देई ॥ १ ॥

## ३६

(जिनी केसरीलो, या गर्भ्याच्या चालीवर. ताल– दादरा.)

बहुत छळियलें नाथा व्यर्थ शिणविलें ॥ धृ० ॥
लावियलें तुम्हां ध्यायाला । यतिवेषा ऐशा
वीरा आणिलें निंदास्पदतेला । तें सारेंही विसरुनी
शेवटीं सौख्य दाविलें । बहुत० ॥ १ ॥

## ३७

माझि मातुल कन्यका रुपशीला
तिचा माझा बहु लोभ जुळुन गेला
मान्य पूर्वी तद्बंधु असुनि त्याला
पुढें नीचानी वचनभंग केला ॥ १ ॥

३८

[राग-देस, ताल दादरा]

माझ्या साठी तीनें । अन्न वर्जियेले । रक्त शोषविले ।
विरहा तीन । वेडी ठरवोनी । कोंडुनि ठेविलें ।
ऐसे छळ केले बंधूनींहि । परि तिने नाही ।
मन बदलीले । निर्मळ राखिले ।
माझ्या ठाई ॥ १ ॥

---

## सं. रामराज्यवियोग

(२०-१०-१८८४)

३९

(झाली अहो राजेंद्रा हरिश्चंद्रा, या चालीवर.)

मन माझे भडकुनि गेले आली भ्रांति चित्तासी
म्हणोनिया दैवा झालें ऐसी कारागृहवासी
रामाच्या अभिषेकाने होइल भरत उदासी ॥
मग कौसल्येची सत्ता न पुसे कोणी कैकयिसी ॥
गणती मग माझी कोठे आश्रयहीन ही दासी ॥
जरि सुटले आजचि येथुनि साधिन कार्यासि ॥ १ ॥

४०

(अभिमन्यु मधु लोलुप, या चालीवर)

कवणे तुज गांजियले सांग सुंदरी ॥
त्यजुनि शेज लोळसि कां ऐसि भूवरि ॥ कवणें० ॥
प्रिय नाही तुजविण मज अन्य कामिनी ॥
इच्छिशि तरी दास्य करिल 'इंदूकामिनी
चाल ॥ रंकाते राव करिन ॥ रावाते करीन दीन
वध्याते प्राणदान ॥ निर्वध्या खचित वधिन ॥
(चाल) रामाची शपथ सर्व सत्य मी करी ॥ कवणे० ॥

४१

(काय सान मानसा)

शांत दात कालिक ही
चारुगात्री देवताही ॥ धृ० ।
त्रस्त जगा शांत करी वधोनि रिपुमत्ता ही सदाही ॥ १ ॥

## वासुदेव नीळकंठ आगटे

### दामाजी

४२

(अदा अदा बकावलि)

गुन्हेगारी धन्याची काई न्हाई जी।। काळामुंदी परजा आपुली मरुं लागली फार।। कोटारीचं धान्य लुटविल करुन ह्यो इचार।। लकोटया मंदी लिवलय समदं इनवुन वारंवार।। भरपाइच दाम दिल्याती मोजुनी घ्या कलदार।। अन्याव नसता धरल त्यांना सोडून द्या सरकार। जोहार जोहार मायबापा जोहार जी जोहार।।

## वासुदेव नारायण डोंगरे

### इंद्रसभा

४३

इंद्र करी खरी प्रीती मजवरी।।
इंद्रा सुख जरी मिळे बहुत परि।। धृ०।।
अंतरी चैन नसे मज मंदिरी।।
प्राणप्रिय जरी भेट न लवकरी।।
प्राण कसा हा राही शरीरी।।धृ०।।

४४

(वसंत, दादरा)

चतुर नार करी शृंगार
चपल नयन हाव भाव दावि फार।।धृ०।।
वाट पाहात मी द्वारी उभी मदनमस्त
सोडून मी। प्रियचिंतनत्य ग्रधी भानरहित कामातुर।। १.

# गोविंद बल्लाळ देवल

## मृच्छकटिक

४५

(त्रिताल)

सार्थचि ते वदति ॥ लोकीं ॥ प्रारब्धाची गति न कळे ती ॥ धृ० ॥
सारसारि जे बलि भक्षुनिया ॥ क्रीडत होते सदनांगणि या ॥
वाढे सांप्रत तृण त्या ठाया ॥ पुण्यबली हा कीटक खाती ॥

४६

(ठुंबरी, चाल-वैरागी मोरे राम)

मरण बरें वाटतें॥ दारिद्र्याहुनि मित्रा तें ॥ धृ० ॥
दुःख एकदां त्या मरणाचें ॥ परि होतें जें दारिद्र्याचें ॥
सततचि तें जाळितें ॥१॥

४७

(चाल–आले वनमाळी रात्रीं)

दासी ऐसें मानुनियां कार्य मला सांगतसे ॥
सुदिन काय उगवला आज मनीं वाटतसे ॥ धृ० ॥
मधुर जातिसुमनांचा वास यास येत असे ॥
यौवनभर म्हणुनि याचा खास अजुनि पूर्ण असे ॥१॥

४८

(चाल–आज रहो मेरे प्यारे)

काय कळा ही सदना आली ॥धृ०॥ सपरिवार ती लक्ष्मी जातां ॥ कुदशा भेसुरि आंत रिघाली ॥१॥ मित्र परिजनी पूर्ण असावें ॥ उदास दिसतें तें या कालीं ॥२॥ जैसी तरुची पालवि गळतां ॥ उरे शुष्कता ती स्थिती झाली ॥३॥

[राग कानडा : त्रिताल]

रजनिनाथ हा नभी उगवला ।। राजपथीं जणुं दीपचि गमला ।।धृ०।। नवयुवतीच्या निटिलासम किति ।। विमल दिसे हा ग्रहगण भोवतीं ।। शुभ्रकिरण घन तिमिरी पडतीं ।। पंकी जेंवि पयाच्या धारा ।।१।।

५०

माडिवरी चल ग गडे जाउं झडकरी ।।
पाहु सदय दानशूर मूर्ति ती बरी ।।धृ०।।
मी अधीर दर्शनासि फार अंतरी ।।
होईल सुख मजसि तया पाहिल्यावरी ।।१।।

५१

(ठुंबरी, चाल-व्यर्थ अम्ही अबला)

रमवाया जाऊं ।। प्रियासी ।। रमवाया जाऊं ।।धृ०।।
मेघ असो कीं रात्र असो ही ।। पर्जन्याची वृष्टी पडो ही ।।
भीति तयाची मजला नाहीं ।। विघ्न कांही येऊं ।।

५२

(चाल—उभि जवळ खरी ती)

त्या मदनमनोरम रुपी, मन माझें गुंतुनि गेले ।।
कधि वाहिन काया त्यासी, प्रेमें ही ऐसें झाले ।।
दिवस तो पूर्ण सौख्याचा, येईल मज कवण्या काळी ।
।।चाल ।। गुणरुपचिंतनी पाही ।। झोंप मज नाहीं ।।
शयनिं मी निजलें ।। किति तरंग हृदयीं उठले ।।१।।

५३

(राग—तोडी : त्रिताल)

जन सारे मजला म्हणतील कीं ।।धृ०।। दारिद्र्याने बहुतचि छळिलें ।। धन त्याजवळी कांहि न उरलें ।। म्हणुनि कर्म हें अनुचित केलें ।।
ऐसें दूषण देतिल कीं ।।१।।

५४

[मल्हरि : त्रिताल]

आनंदे नटती। पाहुनि ज्य गृह मयुर पंक्ति॥धृ०॥
गमनोत्सुक हे हंस असुनिया॥ धैर्य नसे त्या गमन कराया कामुक
गगनासम रोधाया॥ मेघ पहा फिरती १॥

५५

(दिंडी)

बघुनि वाटे या नील पयोदातें।
हरिच दुसरा कीं आक्रमी नभातें॥
बलाकांची शंखसी करी माला।
तडित्पीतांबर बांधिला कटीला॥१॥

५६

(त्रिताल)

चपलासंगे या जलधारा॥ दिसति विमल रजताच्या तारा॥
सौदामिनिच्या स्फुरणें होती॥ नष्ट परीक्षण दृष्य मागुती॥
भासे जणुं भूमीवरि पडती॥ गगनपटाच्या दशा झरारा॥१॥

५७

(वसंत बहार : त्रिताल)

जलधरसंघें नभ भरलें तें॥ वासित झालें सौरभवात।धृ०॥
कांता जैसी प्रियतम पतिला। आलिंगन दे तशि ही
चपला॥ धांवुनि ॱगें या मेघाला॥ प्रेमें आलिंगन बघ देते।

५८

(साकी)

मेघा अति गंभीर रवानें करी गर्जना आतां॥
स्पर्शे रोमांचित मी झालों आलिंगी मज कांता॥
मन्मथ संचरला॥ कदंबसुमता ये तनुला ॥१॥

५९

[राग—मालकंस : त्रिताल]

तेचि पुरुष दैवाचे।। धन्य धन्य जागिं साचे ।।धृ०।।
अंगे भिजली जलधारांनी।। ऐशा ललना स्वयें येऊनी।।
देती आलिंगन ज्यां धांवुनि।। थोर भाग्य त्यांचें।।१।।

६०

(दिंडी)

जेथें मित्रा तत्त्वार्थ पहायाला।
शक्ति नसते भूपाललोचनांला।।
तिथें वदयाला दैन्य रोकडें तें।
समज अथवा बहु निंद्य मरण येतें।।१।।

६१

(चाल—रमाकांत न ये आजि सये)

हा सकल देह रक्तचंदनें विलेपिला ।। यज्ञपशूसम यांनीं
सजविलें मला ।। धृ० ।। कुदशा ही ऐसि बघुनि ।। ढाळिति जन
अश्रुनयनिं ।। दोष देति धिक्कारुनि ।। मनुजयोनिला ।। १ ।।
रक्षाया बल न म्हणुनि ।। वदती हे कर जोडुनि । दीर्घकाल
सुरभुवनीं ।। होउं सुख तुला । २ ।।

६२

(चाल—पांडुनृपति जनक जया)

बाळा घालोनिया गळां ।। रक्तसुमनांच्या माळा ।।
स्कंधावरि स्थापियला ।। लोहशूल हा ।। १ ।।
ऐसें वत्सा नेति मला ।। कंठ माझा चिरायला ।।
यज्ञकालिं जैसें पशुला ।। नेति ओढुनि ।। २ ।।

६३

(असावरी—त्रिताल)

काय वधिन मी ती सुमती । नवयुवती अवला साश्रुलोचना
धरुनि कुरलकुंतल या हातीं ।। धृ० ।। कोमल कुसुमित लता
कधी ही ।। लववुनि कुसुमे खुडिली नाहीं ।। आजवरी तीं ।। १ ।।

६४

(पद—ललत, त्रिताल)

सखे शशिवदने ॥ किति रुचिर, बिंबसम अधर
परम सुकुमार ॥ धृ० ॥ अधरसुधा तव पिउनि कसें गे ॥
अयशोविष मी सेविन सांगे ॥ विधुकर शुचि वदने ॥ १ ॥

६५

(जो मम नयन चकोरा इंदू, या चालीवर)

जो या नगरा भूषण खरा ॥ जैसा भाळी शोभे हिरा
ज्याच्या सद्‌गुणगानी गिरा ॥ रंगली सुजनांची
निर्धन असतां धनदापरी ॥ औदार्याने अंगी धरी ॥
दुर्दैवाने छळिले तरी ॥ शील न सोडी जो ॥ २ ॥
करि जो दीनावरती दया ॥ लोकी वागे पाहुनि नया
वाहिलि ही मी काया तया ॥ निर्मळ भावाने

---

## शापसंभ्रम नाटक

१८९३

६६

(चाल—ठाऊक मजला असे ऋषीचे, धुमाळी)

नंदनवनदेवीने माझा आदर बहु करूनी प्रशंसिले मम रुप
किती हे गौरव वचनानी ॥१॥ कोमल हस्ते नवमंजिरी ही
मजला अर्पोनी ॥ वदे करावा प्रसाद, ठेवा भूषण हे कानी ॥२॥
परिचय नव्हता अशा स्तुतीचा यास्तव तेथोनी ॥
अधोवदन मी पुढे चालल्लो लज्जित होवोनी ॥३॥

६७

(चाल—काय मला भूल पडली, दादरा)

मित्रा मम जन्मकथा पुशिली कां तिने ॥
श्रवण करी सर्व कशी तृषितशा मनें ॥धृ०॥
एकलि मजजवळि उभी केंवी राहिली ॥
कर गाला लागतांचि मधुर हासली ॥
निघता मजवरूनि बळे दृष्टि काढिली ॥
प्रकट करी आत्मभाव अन्य रीतिने ॥१॥

## ६८

(साकी)

निराकार त्या निर्गुण रुपा बहुदिन धुंडित होतो ।।
सगुण अशी साकार सुंदरी दिसता छंद सुटे तो ।।
लाभे जरि मजला ।। मानिन मुक्तिलाभ घडला ।।१।।

## ६९

(नोहे हा पवन जवन वारु–दादरा)

सज्ज करूनि चाप मदत येत मागुनि ।। मार्ग दावि इंदु मला
तम निवारुनी ।।धृ०।। जरि चंचल पद चुकते ।। प्रीति तया
सावरिते ।। अग्रभागी मन पळते ।। करूनि दूर शंकेते ।।
उत्कंठा नेत पुढे धीर देऊनी ।।१।।

## ७०

(दिंडी)

बहुत परिने उपदेश तुवा केला ।। परी कामांधे म्या न आदरिला ।।
तुझ्या स्नेहा पात्र मी नसे आता ।। व्यर्थ माझी वाहसी मनी चिंता ।।

## ७१

(चाल–धन्य उषा ही बाण कन्या, धुमाळी)

स्मरतापाच्या धर्मजलाने स्नान सचैलाचि सारोनी ।।
कोमल कमलाचे चित्रासन रचुनि बैसलो या विपिनी ।।१।।
चंदन चर्चा, त्रिपुंड भाळी, मृणाल सूत्रा घालोनी ।।
कदलीदल अतिसूक्ष्म वसन हें पांघरलो स्कंधावरूनी ।।२।।
मुक्तावलिची जपमाला ही लक्ष लाविले त्वद्ध्यानी ।।
अन्य गति मी शरण रिघालो इच्छा पुरवी येवोनी ।।३।।

(चाल वृक्षवेल या दोहोंची–पंजाबी)

त्या तरुणा तांबूल द्यावया लाज वाटते ॥धृ०॥
अल्पहि नाही परिचय त्याचा, प्रथम आजचि पाहिला ॥
म्हणुनि मना धीर होई; तूच गडे दे हा त्याते ॥१॥

७३

(व्यर्थ आम्ही अबला–पंजाबी)

मधुर किती ॥ कुसुम गंध सुटला ॥धृ०॥
त्या लोभे हे मधुकर पळती। गुंजारव उठला ॥१॥
सकल फुलांचा परिमल सारा ॥ काय एकवटला
साच असावा सुरलोकीचा ॥ भू वरि हा कुठला ॥३॥

## संशय कल्लोळ

(३०–१०–१९१६)

७४

हृदयिं धरा हा बोध खरा ॥ संसारीं शांतिचा झरा ॥धृ०॥
संशय खट झोंटिंग महा ॥ देउ नका त्या ठाव जरा ॥१॥
निशाचरी कल्पना खुळी ॥ कवटाळिल ही भीति धरा ॥२॥
बहुरूपा ती जनवाणी ॥ खरी मानितां घात पुरा ॥३॥

७५

(लावणीची चाल)

सुकांत चंद्रानना पातली भ्रुधनु सरसावुनी ॥
कटाक्ष खरशर सोडुनि भेदित हृदयचि गजगामिनी ॥
रदन दिसति जणु शशिबिंबाचे खंड मुखीं खोंविले ॥
कुरळ केश शिरिं सरळ नासिका नेत्र कमलिनीदलें ॥

७६

(जाव मोरे वैया)

साम्य तिळहि नच दिसत मुखाचें ॥ नाम तरी कोरवा शिरावरि ॥
ओळखु येईल चित्र कुणाचें ॥धृ०॥ मजजवळी असे याहुनि
सुंदर प्रीतिचितारिणि करिचें प्रतिबिंब सुबक या मूर्तीचें ॥१॥

७७

(ढोलन मेढें घर आवे)

निंद्य जीवनक्रम अमुचा ॥ आमरणांत निशिदिनिं सततचि एकरुप पालट ना त्याचा ॥ धृ०॥ स्मित सोंगी स्तुति लटकी आर्जव ॥ तोषरोष दांभिक वरवरचा ॥१॥

७८

(भय हें नवें)

कर हा करीं धरिला शुभांगी ॥ सुदिनीं रमाकांतासमोरी ॥धृ०॥ सुखदा सदा मत्स्वामिनी तूं ॥ गृहसंपदा उपभोगि सारी ॥१॥

७९

(आज अंजन)

धन्य आनंददिन पूर्ण मम कामना ॥
मुदित कुलदेवता सफल आराधना ॥धृ०॥
लाभ व्हावा जिचा लोभ धरिला महा ॥
प्राप्त मज होय ती युवती मधुरानना ॥१॥

८०

(कोयलियाकोकु)

ही बहु चपल वारांगना ॥ साहस, दंभ, लोभ, कपटानृत भाषण टाकिल कशि या स्वगुणा ॥धृ०॥ प्रेमचित्रिका दिधली तीतें ॥ अर्पी परि ती प्रिय पुरुषातें ॥ कुललीला या तिच्या देति संताप मना ॥११॥

८१

लग्नविधींतील खरें मर्म काय । ठाऊक तें मुळिंहि तुज नसे ॥धृ०॥ वैवाहिक होममंत्र अंतः पट अक्षतादि ॥ पोषक हे विधी, मिळणी जीव जिवा सार हें असें ॥१॥

८२

(ठुमक चलत.)

नाट्यगाननिपुण कलावतिची ही माया ॥धृ० ॥ अंतरिचा भाव एक ॥ दाखवि वरपांगीं एक ॥ बाह्यांतर वृत्ति देख ॥ भिन्न भिन्न छाया ॥१॥

## ८३

('शाम घुंगट पट खोलो' या चालीवर)

संशय कां मनिं आला ॥ कळेना ॥ कारण काय तयाला ॥धृ०॥
आळ वृथा कीं, चित्र दिले मीं ॥ कोण्या पर-पुरुषाला ॥ १ ॥
कोपुनि गेले, ही मज लागे ॥ हळहळ थोर मनाला ॥ २ ॥

## ८४

('कर नुले जाये' या चालीवर.)

कुटिल हेतु तुझा फसला ॥ निजपाशीं मज बांधायाचा ॥धृ०॥
महा घोर मरणांतुनि सुटलों ॥ उरीं विषारी नेत्र भल्ल हा होता घसला ॥१॥

## ८५

(नगरी मोरी)

स्वकर शपथ वचनिं वाहिला ॥ उगाच कां तुवां ? ॥ निजतनु दिधली मला, तो काय, पोरखेळ नवा ॥धृ०॥ पसरिली माया लटकिच कां तो ॥ वरिलें मग कां धरूनि साक्षी त्या माधवा ॥ १ ॥

## ८६

(एक क्षण जो)

मानिली आपुली तुजसि मीं एकदां ॥ दुःख शोक न कदा शिवुत तुजलागिं ते ॥धृ०॥ वंचिलें त्वां जरी हितचि तव वांछितों । वरुनि सन्मार्ग तो धरिं सुमति सदा ते ॥ १ ॥ कष्ट जरी सोडितां वच नये मोडितां ॥ म्हणुनी जातों अतां गाळि नयनाश्रु ते ॥ २ ॥

## ८७

(बंधन वा बाधो.)

मृगनयना रसिक मोहिनी ॥ कामिनी होति ती मंजुळ मधुरालापिनी ॥
नवयौवनसंपन्न रम्य गतिविलासिनी ॥ धृ० ॥
आल्हादक मुखचंद्रहि होता ॥ होती दृष्टि ती प्रेम-रस-वहिनी ॥

## ८८

(मेरा चित्त)

मजवरी तयांचें प्रेम खरें ॥ जें पहिलें जडलें तें उरे ॥ धृ० ॥
कसास लावुनि अंत पाहिला ॥ परि न जराही ओसरे ॥ १ ॥
संशय–पटला दूर सारितां ॥ प्रकाशेल कीं मग पुरें ॥ २ ॥

## ८९

(ये गरज धाय धाय)

हा नाद सोड सोड ॥ अहिताची न करि जोड ॥ मित्र करिति बोध गोड ॥ धृ० ॥ नायकिलें त्या बोधा ॥ होतो मी धुंद तदा ॥ अंध मंद मोडलि परी पुरति खोड ॥ १ ॥

# शारदा

(१३-१-१८१९)

## ९०

(राग–झिंजोटी : त्रिताल)

अजुनी खुळा हा नाद पुरेसा कैसा होइना ॥ धृ० ॥
नाटक झाले जन्माचे, मनि का हो येइना ॥ १ ॥
व्यसने जडली नवी नवी, कुणि तिकडे पाहिना ॥ २ ॥
नाव बुडविले वडिलांचे, कीर्ति जगी माइना ॥ ३ ॥

## ९१

(राग पिलु, त्रिताल)

काय पुरुष चळले बाई ॥ ताळ मुळी उरला नाही ॥
धर्म नीति शास्त्रे पायी ॥ तुडविती कसे हो ॥ धृ० ॥
साठ अधिक वर्ष भरली ॥ नातवास पोरे झाली ॥
तरिही नव्या स्त्रीची मेली ॥ हौस कशि असे हो ॥
काहि दुजी त्यांच्या नाशा ॥ युक्ति का नसे हो ॥ २ ॥
शास्त्रकुशल मोठे मोठे ॥ धर्म गुरुहि गेले कोठे ॥
काय कर्म असले खोटे ॥ त्यास नच दिसे हो ॥ ३ ॥

९२

(मंदस्मित अरविंद, चालीवर)

सुंदर खाशी सुबक ठेंगणी स्थूल न कृशहि न, वय चवदाची ॥ धृ० ॥
नयन मनोहर वन हरिणीचे; नाक सरळ जशि कळी चांफ्याची ॥ १ ॥
भृकुटि वांकड्या; केस सडक मृदु, दंतपंक्ति ती कुंद कळ्यांची ॥ २ ॥
ओंठ पोंवळी, हनु चिंचोळीं, लालि गुलाबी गालांवरची ॥ ३ ॥

९३

(राग अडाणा, ताल त्रिताल)

जठरानल शमवाया नीचा। कां न भक्षिसी गोमय ताजें ॥ धृ० ॥
धनलोभानें वद आजवरी । किती नेणत्या मूक कुमारी
त्वां दिधल्या रे वृद्धवरकरीं । खाटिकही तव कृतिला लाजे ॥ १ ॥

९४

(रंगैया मनिगे वारानो)

स्वार्थी जी प्रीति मनुजाची सहज ती ॥ धृ० ॥
परि साधे जो स्वार्थ परार्थी, उत्तम तो गणिती ॥ १ ॥
स्वार्थ परार्था इतुका असता, मध्यम त्या म्हणती ॥ २ ॥
ज्यात न जनहित त्या स्वार्थाला साधु अधम वदती ॥ ३ ॥

९५

(आवो आवो रंगेला, दादरा)

जागृत ठेवा, लग्नाची ही स्मृति सारी ॥ धृ० ॥
व्हालचि माता दुहितांच्या कधितरि संसारीं ॥
होऊं न द्यावा तुम्हीं त्यांचा विक्रय बाजारीं ॥ १ ॥

९६

(सखयानो दाखवागे)

कधि करिती लग्न माझे तुझ ठावे ईश्वरा ॥ धृ० ॥
वाढली उंच ही किती । हसुनी बोलती ॥
नाक मुरडिती । स्त्रिया परभारा ॥ १ ॥
मैत्रिणी वदति टोचुनि ॥ शद्ब ते मनी ॥
जाति भेदुनि ॥ सुरीच्या धारा ॥ २ ॥
जनक तो नाव काढिना ॥ माय सुचविना ॥
हौस मग कुणा ॥ कोण म्हटणार ? ॥ ३ ॥

## ९७

(माळिण नवतरणी)

तरूण कुलिन गोरा, हसतमुख, तरुण कुलिन गोरा ॥
पाहिजे मुलीला चतुर सद्‌गुणी सुंदरसा नवरा ॥ धृ० ॥
( चाल ) पुरवील तिची जो हौस सदा बहुपरी ॥
घालील शाल जो मायेची तिजवरी ॥
तिळमात्र तिला जो दुःख न देइल घरी
विद्वानात हिरा, चकाकत विद्वानांत हिरा ॥ १ ॥

## ९८

(असा कोण रे मदन तो)

सावळा वर बरा गौर वधुला । नियम देवादिकी हाचि परि
पाळिला ॥ गौर तनु जानकी राम घननीळ तो ॥
रूक्मिणी गोरटी कृष्ण काळा । शुभ्र गंगा नदी सागराला
वरी, वीज मेघास ती घाली माळा ॥ १ ॥

## ९९

(करि दळो बारो कामिनी)

मज गमे ऐसा जनक तो ॥ मांग साचा ॥ धृ० ॥
मुख सुरकुतलें, मस्तक पिकलें ॥ शरीर रोगांनी पोखरिलें ॥
स्मशान ज्यानें सन्निध केलें ॥ त्या प्रेताला दुहिता विकतो ॥ १ ॥
क्रूराधम हा जनक कशाचा ॥ अपत्यभक्षी व्याघ्र मुखाचा ॥
वास नसावा जगीं अशाचा ॥ नवल हेंच यम यास विसरतो ॥ २ ॥

## १००

(आनंद सागरम)

बिंबाधरा, मधुरा विनयादिगुणीं मनोहरा मधुरा ॥ धृ० ॥
ती सुंदरा ॥ विगुणा वरा ॥ घटिता विधि पी काय सुरा ॥

## १०१

(जरि गंध गजाचा)

श्रीमंत पतीची राणी, मग थाट काय तो पुसतां ! ॥ धृ० ॥
बंगला नवा नवकोनी, फुलबाग बगीचा भवतां ॥
किती दासी जोडुनि पाणी, "जी" म्हणतिल कामाकरितां ॥
ही जात्या चतुर शहाणी, पति मुठींत ठेविल पुरता ॥
सुग्रास बसुनि खायाला, मऊ शय्या लोळायाला ॥
गुजगोष्टी काळ जायाला, ना काम धाम, ना चिंता ॥
ही फुगेल बघतां बघतां ॥ १ ॥

## १०२

(शांति धरा नृपराज)

म्हातारा इतका न अवघें पाऊणशें वयमान
लग्ना अजुनी लहान ! ॥ धृ० ॥
दंताजीचें ठाणें उठलें, फुटले दोन्ही कान
डोळे रुसले कांहीं न बघती, नन्ना म्हणते मान ! ॥ १ ॥
तुरळक कोठें केंस रुपेरी, डोईस टक्कल छान
भार वयाचा वाहुनि वाहुनि, कंबर होय कमान ! ॥ २ ॥
काठीवांचुनि नेट न पाया, परि मोठें अवसान
उसनी घेउनी ऐट चालतां, काय तें दिसे ध्यान ! ॥ ३ ॥

## १०३

(लेगवोचिर वनमालि)

घेउनि ये पंखा वाळ्याचा जा जा जा झणीं ॥ धृ० ॥
नाजुक ही राणी घाबरि होय उन्हानें, उमटेना बघ वाणी ॥
मधुर सुवासाचें सुंदर झारि भरोनी, आण गडे, तू पाणी ॥ १ ॥

## १०४

(बात हारकीजे जवानसे)

मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली ॥ धृ० ॥
वाटतें दुजा सुदाम मज दिसेल त्या स्थळीं ॥
दाखवावयास मला तात नेत त्याकडे ॥
राक्षसा रुचेल का पहावया जसा बली ॥ १ ॥

## १०५

### (जळो ग याचं स्नान)

बघुनि त्या भयंकर भूता फोडिली तिनें किंकाळीं ।।
या हृदया चरका बसला, कळवळे मनहि त्या काळीं ।।
परि बाप तिचा तो कसला चांडाळ पूर्विचा वैरी ।।
तिळभरही द्रवला नाही उलट त्या बिचारीस मारी ।।
ती दीन भयाकुल मुद्रा रात्रंदिन दिसते बाई ।।
रडविलें तिनें मज कितिदा दचकतें भिउनि शयनींहि ।। १ ।।

## १०६

### (राधा मनोहर)

जो लोक कल्याण ।। साधावया जाण ।। घेई करी प्राण ।।
त्या सौख्य कैंचे ।। ध्रु० ।। बहु कष्ट जीवास ।। दुष्टान्न उपवास
कारागृही वास ।। दे भोग त्याचे ।। निंदा जनी त्रास ।।
अपमान उपहास ।। अर्थी विपर्यास ।। हे व्हावयाचे ।।

## १०७

### (जयति जय सुरसरित)

घेई मम वचन हे सगुणमणिमंजिरी ।। ध्रु० ।। साच तुज वरिन मी भंगुनीहि
मन्नियम ।। साक्षि अरुणासि, तो विश्वसाक्षी करी ।। १ ।।

## माधवराव नारायण पाटणकर

### विक्रम शशिकला

### (१८९५)

### १०८

(जा हरीला शरण मानवा, या चालीवर)

हूं मदंगा लावु नका कर दूर 'करू' तुम्ही दूर सरा ॥
खराच नसतो धीर नरा ॥ कर ॥ अंत्रा ॥

विक्रम – जीवन केवळ तुझ्या करींगे ॥ असुनी कांही करिसी ढोंगे ॥
दाउं नको पुढती सोंगें ॥

शशिकला – काहि तरी मनि न्याय धरा । स्वकुलास स्मरा ॥
कर ॥ खराच ॥

विक्रम – सुरा सुरांही अंत नसे गे ॥ सुकीर्ति ही तव कधी न भंगे ।
नाम जगत्रयिं गाजतसेगे ॥

शशिकला – धुंदी अतां किमपी उतरा । नय हा न बरा ॥
कर ॥ खराच ॥

विक्रम – नरास भाग्यें भूषण येतें ॥ स्त्रीचारित्र्या पुढति न चढतें ॥
स्मरव्यथेने धुंदी चढते ॥

शशिकला – जीभ जरा अवरूनि धरा ॥ मज हा नटवरा ॥
गमतो न खरा ॥ खराच ॥

विक्रम – उपवन सोडुनि वन सेवाया ॥ इच्छि न कोणी कामी वाया ॥
अजून कशि तुज येइ न माया ॥ जाहली वरा गौरोहरा ॥
अनुरूप वरा ॥ १ ॥

शशिकला – परि ते विसरा ॥ खराच ॥

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

## वीरतनय

(१८९६)

१०९

[राग झिंजोटी, ताल धुमाळी]

अंकित पदांबुजाची दासी । गुण गणी लुब्ध मृगीसी ॥ धृ० ॥
ज्या दुष्टाने कारागृहि वा कष्टविले देहासि
नरवेषाने येउनि तीने । वंचियले तुम्हासी ॥ १ ॥

११०

[राग मालकंस – ताल दीपचंदी]

तुझी अन्यथा तो कराया कृती । अम्हा मानवांची मुळी ना गती
अनंता अहोरात्र तारारती ॥ त्वदाज्ञेसि नमी शिरी मानिती ॥ १ ॥
दयाळा, सुविश्वास तुझ्यावर ॥ सदा ठेउनि साधु ते राहती ॥ २ ॥

## प्रेमशोधन

(१९२०)

१११

(चाल, सखये अनसूये थांब)

ललित बघुनि तनुस काम । करिते सकल गुण विराम
पुण्यधाम नटललाम ॥ धृ० ॥ कुसुमि खचित जणुं तरुवर
उडु विराचित गगन रुचिर । चरित तेंवि सुकृत दाम ॥ १ ॥

११२

पसरे चोहिकडे गंध तरूंचा । गंध न ज्या मनुज करांचा।
मनजोच्छवासाचे ज्या नच वारे । स्वच्छंदे वाहति वारे ॥
परकी असती जे मनुज रवाना । पक्षी ते गाती गानां ॥
धरणी मनुजाच्या स्पष्ट न पायीं । नभ सौधीं खंडित नाहीं ॥
वन हे पांचूंचे रत्न धरेचे । संस्कारे भ्रष्ट न साचें ॥ १ ॥

## ११३

(चाल–वाली उमरिया)

घाली विधि कसा दारुण घाला । सेवित असता चित्त सुखाला ।। धृ० ।।
दृष्टिने लता तुष्टचि होता। वीज पडुनि अवचित जणू जाळि तियेला ।।
कांता समागम सुख न मिळे तो। सकल मनोरथ माझे जाति विलयाला ।। १ ।।

## ११४

(बागेश्री झंपा)

सेव्य संसार हा स्वमतिरंजना । विषय सुख लालसा
हृदयि जरि राहिना ।। धृ० ।। पौत्रमुख दर्शनी। कामना जनकामनि।
युवराजपद नलिनी शिर धराया जना ।।

## ११५

(जडशिले जली न्हाणिले)

जन असंभवा मानिती। परि सुसंभवा नच आदरिती ।। १ ।।
गदी गुटिका मणी योजिती। स्तविती हि तरि मणी प्रती।
अगद अपाय तरि निंदिती ।। १ ।।

## ११६

(वाहि तू ते)

दावि पंथा अनुसरे तया अचल भावे अंतरच न जणु ।। धृ० ।।
प्रेम भूतांवरी। बोधिसी मम जरी। क्षुद्र जीवार्थ तरि। ही त्यजिन
तनु ।। १ ।। आत्म संयमनि निज। योजिसी जरिहि मज। होई रामधन
समज । तो शुक्रचि जणू ।। २ ।।

## ११७

(राष्ट्रोन्नति अवनति)

हे जीवित सकल तुझ्या करीं। प्राण तुझा मम तोंवरी
अंत तुझा तो मम सुंदरि ।। धृ० ।। रविसम उज्वल तव मुख ज्या लोकीं
राहात वितरी प्रकाश तयास। जाई सोडूनी तरि त्या काळी पडे महविभावरी
तयावरी ।। १ ।।

## वीरतनय

(१८९६)

### ११८

(चाल–जो नेक होके कोइ दिल आजार.)

किति कोमल तनु तनुलतिका याचि मोहिका ।
दर्शन किति याचे हे देतसे सुखा ।। धृ० ।।
वक्षस्थलि हे रुळती । केश घन स्वैरगति ।।
मन मोहे निष्कपटा पाहुनी मुखा ।। १ ।।
कंप सुगात्रांसि सुटत । खिन्न मुख स्विन्न होत ।।
स्थिति दीना झालि याचि भीति मूलिका ।। १ ।।

### ११९

(चाल–बारि कर तुं मोघे रहेम)

पुनरपि नयना ती तनुलतिका । गोचर होइल का
मंजुवचे रंजवील मन का ।। धृ० ।।
तच्चिंतनि जे नयनांतरि या अंबु निघे ते
चुंबुनिया का देइल सुदति सुखा ।। १ ।।

### १२०

(नजरिया मिलाये जावो)

अशि ही सुगुण खनी देह त्यजोनी ।। जगि या
दिसोनि न येइल कोणी ।। धृ० ।। शरश्चंद्र अति
निर्मल जैसे शोभवि तारागार ।। विमल देही शुद्ध
आत्मा तेंवि करित सुविहार । निरखोनी विदेही
आत्महीन होई ।। १ ।।

—:<>:<>:—

## मूकनायक

(१९०१)

### १२१

(चलो गंदेरी हार, या चालीवर)

हे प्रभोविभो अगाध तव किती करणी ।। मन चिंतुनि हो रत चरणी ।। धृ० ।।
चांदवा नभाचा केला । रवि चंद्र लटकती त्याला । जणु झुंबर सुबक छताला ।।
मग अंथरली ही धरणी ।। १ ।। बाहुली मनुष्ये केली ।। त्या अनेक रुपे दिधली ।।
परि सूत्रें त्यांची सगळीं ।। नाचविसी हस्ती धरुनी ।। २ ।।

## १२२

(शेषशयन कमलनयन, या चालीवर)

व्यक्त रदन बघुनि वदन भगिनीचे स्वता ।। दीपोत्सव वाटतसे मंद पाहता ।।धृ०।।
आश्चर्योत्थित भ्रुकुटि पुढती तोरणे ।। बालिशता होईलचि शुभ उभारणे ।।
मोद होतसे त्वदीय अश्रुसिंचने ।। संमार्जन यानंतर होतसे वृथा ।। १ ।।

## १२३

(मोरा अलम न करियो, या चालीवर)

मनि खेद न करि भगिनी ।। हे वच मानी ।। कष्टि बघुनि तुज
जाई श्रमुनि ।। धृ० ।। प्रयत्न करणे मनुजा हाती ।। सिद्धि असे ईशेच्छेवरती ।।
दूरी होईल चिंता अंती ।। धीर धरीं प्रभु आठवोनि मनिं ।। १ ।।

## १२४

(पायी पायी तोरी यारी की, या चालीवर)

आलि कालि या मज तरुण दशा ।। धृ० ।। निशंकपणे रमणे गेले
प्रणयकेलि मज सुचती ऐशा ।। १ ।। धात्री पूर्वी निधि वाटे
ती सांप्रत गमती तरुणी प्रियशा ।। २ ।।

## १२५

(एजि हो तुम आये जो चारो जवान, या चालीवर)

सुलभ मनिं गणा न भूप सुता ।। करूं बघतां कशि ती वनिता ।। धृ० ।।
पडले धरणीपालहि चरणीं ।। प्रयत्न जाति वृथा ।। सकलही ।। १ ।।
वीरहि आले परतुनि गेले मुळी यश न मिळतां । तयाप्रति ।। २ ।।
राजकुमारी उभि सामोरी ।। त्यजा न किंकरता ।। विसरुनी ।। ३ ।।

## १२६

(अब कित जाऊं मैं बिहरन– या चालीवर)

अविचत गेले किंकरकरि ।। हृदयिं शिरुनि सिंहासनिं
बैसुनि शासन मज करि ।। धृ० ।। वटें आज्ञा त्या नच करिता
त्यांची आज्ञा मान्य करावी ।। कृत्रिम अंतर दूर करुनि
निकटचि बसवुनि करिं ।।१।।

१२७

(इडू इडू इडू करुणा नारायणा, या चालीवर)

उगिच का कांता गांजितां दासी दीना ॥ धृ० ॥ व्यापुनिया सारी धरणी ॥ मूर्ति आपुली या नयनी ॥ खेळते पहा दिनरजनी ॥ तेवि हृदयमंचकि लीना ॥ १ ॥

१२८

(गिरिधर ब्रिजधर, या चालीवर)

जलधर घनतर फिरति गगनभर दाहि दिशा करिति बहु धूसर कृष्ण भयंकर पडति महीवर ॥ धृ० ॥ अमरलोकिंचे गूढ लाभ पर म्हणूनि तुंग शिर पुराण तरुवर पडति क्षितिवर दंड भरिती खर ॥ १ ॥ इतकें बघुनि श्रवणाक्षि स्थिर राहती तरि त्यां करित सुजर्जर खेचर चपलादीप अचिरकर ॥ २ ॥

१२९

(आज नंद लाल सखि, या चालीवर)

होय संसार तरु मुग्ध कोरक भुवनि । रम्य ते बालपण देइ देवा फिरुनि ॥ धृ० ॥ कोप सुख हेतुविण ॥ शांत निश्चित मन ॥ शोक निमिषाहून ॥ नुरत मनि पद भवनि ॥ १ ॥ निकटच्या वस्तुतति ॥ वरि अभिनया पुरति ॥ ठेवी नटतुल्य रति ॥ अल्पपरिचय म्हणुनि ॥ २ ॥

## वधू परीक्षा

११-१०-१९२८

१३०

(देस-त्रिवट)

सत्पात्र हा ललना कपोल । अरसिक नर । वरि चढविन नग बहुमोल ॥ धृ० ॥
स्मित चतुर करित परिसुनी सुकन्या ।
करि वर्णविकारिच भाव खुला अबोल ॥ १ ॥
करूण हृदय शमवित नरपिपासा ।
वितरोनि सुधो पम चुंबन हर्षलोल ॥ २ ॥

## १३१

(मांड– केरवा)

मानिले पित्याहुनि मी । आपणांसि भावे । हे काय न ठावे ॥धृ० ॥
गणियले सुतेला । ही तशीच बाला । अदया मतिला अजि कां करावे ॥

## १३२

(कानडी– त्रिवट)

जिव बावरा । स्थिर ना जरा । नच आसरा । आता खरा ॥ धृ० ॥
अनुकूल कार्या । नृप होई का या । भीति माझ्या छळि अंतरा ॥ १ ॥

## १३३

(सिंधुरा काफी– दीपचंदी)

ब्राम्हण्य सारें । रमले तुझे ठायि । धरुनि मधुर रुप ।
अतितोषदायी ॥ धृ० ॥
ज्ञानार्कतेजा शमचंद्रिकाही ।
सह नांदवाया । धरिसि स्वदेहीं ।
सत्यसिधाराव्रत तेवि पाही ।
मृदु हृदय नवनीत । तव मूर्ति वाही ॥ २ ॥

## १३४

(जिता केरवा)

जिव हा तोषला । परिसुनि सुधोपमा बोला ॥ धृ० ॥
धन्य मी लोकि बाला । सुदिन उदेला ।
हर्षे हा आत्मा न्हाला । पुलके देह हा दाटला
मन भ्रांतचि हो या काला ॥ १ ॥

## १३५

(मालकंस त्रिवट)

प्रेमा तिच्या उपमा नोहे । भूमीमाजी हेमाविना ॥ धृ० ॥
ते प्रेम साच चमके संकटि । अग्नित हेमहि तपतांना ॥ १ ॥

## १३६

(भैरवी – एक्का)

हृदय जाळि तीव्र घोर चिंता । आतां ।
लागे या मनि तळमळ ॥ धृ० ॥
मानीना नेत्र असुनि । आप्त मला नृप म्हणोनि ।
न्याय अंध का मानिल ॥ १ ॥



माधवराव वालावलकर 'कान्होपात्रा नाटकांत' 'चोखामेळा'च्या भूमिकेंत.



'शाकुंतल–टेंबे (दुष्यंत), बालगंधर्व (शकुंतला)






'मेनका'–(बालगंधर्व)



मा. कृष्णराव



'श्री' नाटकांत–देशमुख, गुरव, पेंढारकर आणि जोगळेकर



बापू पेंढारकर आणि गायनाचार्य वझेबुवा.



'हाव मुलाचा बाप' नाटकांत साने, पेंढारकर आणि माशेलकर.



'सोन्याचा कळस' मध्ये मा. भार्गवराम



सोळसकर (मॅनेजर), वरेरकर, कमतनूरकर आणि गणपतराव बोडस, 'ललितकले' च्या बिऱ्हाडी



पेंढारकर 'प्रेमशोधन' मध्ये कंदनाच्या भूमिकेंत.



'स्वयंसेवक' नाटकांत भार्गवराम, काळे आणि पेंढारकर.



गोविंदराव माशेलकर
ललित कलेतील एक लोकप्रिय नट.



यशवंत संगीत मंडळी, वरवंचना नाटकांत 'रघुवीर सावकार'

## भार्गव विठ्ठल वरेरकर

### कुंजविहारी

१४-४-१९०८

१३७

(राष्ट्रोन्नति अवनति-सारखी)

ही प्रेम विमलतम माधुरी । सदा शुद्धतम राहते । लय
होइ न जरि जठर विकल ।। धृ० ।।
उगम पावते तरुणांच्या हृदयीं ।। परिणत समयी विकास ।
तियेस । मूक होइ वय निदाघकालीं । असे सदा चिर
स्थली चिरस्थली ।। १ ।

१३८

(ऊन आई बदरिया)

वाहि तूं तें हृदय हे सदा इतर ठायीं जाइ नच कधिहि
।। धृ० ।। प्रणयपर सतत मी । स्मरण तव करितसे ।।
मज इतर विषयि नच । हो सुख हृदयि ।। १ ।।

१३९

त्याजि भक्तासाठी लाज जगि दास होउनि आलों ।। धृ० ।।
निजमुखांतलीं बोरें । दे मज शबरी स्वकरे ।।
ती सेवूनी निर्धारि । अतितुष्ट मानसी झालो ।। १ ।।
करि रळी बळी छळिला । करि तुष्ट दानि मजला ।।
जरि धरातळी नेला । तरी दास होऊनि ठेलो ।। २ ।।
करितसे अतां चोरी । कुणी गवळण मज मारी ।।
जरी करी मल दूरी । तरी पय चुरनी धालों ।। ३ ।।

१४०

सदा प्रणयाविकासिनी । सुखदा रमणी ।।
हृदयी धरली । हृदय जहाली । सकल कालीं ।। धृ० ।।
गहन तिमिरि चपला चंचला । होय पथिक जन विराम ।।
सोडी भरमा । विकल हृदय पतिला भवतमी हो दामिनी । १ ।

१४१

चपलासी मंजुल बाले । कां मुख ग्लान हे तव झाले ।। धृ० ।।
सदाही विधुसम । कदा न उपरम । यदा करित शम
द्दवा नलिनी मम । केवी या मम बोले ।। १ ।

## ह्याच मुलाचा बाप

७–९–१९१८

१४२

[ मिया मल्हार, एकताल (काहे लडकी) ]

कवितासुता ललित झाली क्षणकाल तरी सुफलित परिगणना
कविमना ।। धृ० ।। अरसिक जरि कुणी काव्या गुण दोष दे
फार अनुदार मनानें । परि मग होई अतीतर कविहृदया वेदना ।। १ ।।

१४३

[ शुद्ध कल्याण– झपताल (धनवान तेरो) ]

कमला जनांचे घेई बलिदान । विभवानुभूता जगि जरि दिसे मान ।।धृ०. ।।
मांगल्य आहे नरकी धनाचें । गति खोल चांचल्य योगे मिळे जाण । १ ।।

१४४

(जिवनपुरी त्रिवट)

कंपित अति शंकित गति सुंदर कर हा । उभयाते । निजकंकणाहि
वेदासम बोले ।। धृ० ।। या गोड हृदयांतलि डंका निनादे ।
जलकण निटिली जमले मंत्राक्षत झाले ।। १ ।।

१४५

(बिलावल – त्रिवट)

परिणाम होई सुखाचा अपमानिता । रीती सतत ।। धृ० ।।
क्षणकाल ज्याला । जय लाभ झाला ।। अपमान त्या येई अंती ।।
विजय.रिवता ।। १ ।।

## जागती ज्योत

८-४-१९३३

१४६

(मांड, धुमाळी)

हासवी नाचवी हृदयाला । हा हृदयनाथ टाकुनि गेला ॥धृ०॥
भासवि हा रवि रजनीला । का रजनीकांत हा दिवसाला
हा काय रंजविल ललना सुमना । स्वानंदे आनंदे धाला ॥१॥

१४७

(कर्नाटक तोडी त्रिताल)

जगि आभास हा दाविला । वीतराग तो क्षणि मालविला
उगाचि विकास दुरावला । धादांतं वेदांतं खुळावला ॥ धृ० ॥
करगत हरविलि झळकत मिरविलि अविरत दिपविलि
प्रतिभा अमला ॥ १ ॥

---

## संन्याशाचा संसार

२५-९-१९१९

१४८

(उदतन धितलि तन, या चालीवर)

अविरत जगांत फिरे कालमान । शशि रवि तारकाही ।
अडवि त्याते कोणी ऐसा नाही ॥ धृ० ॥ सदवनासि सदाभिमान
दे उगम धी निगम । सज्जनमन दुर्जन गण धिक्कारित
जग सन्मनि शान्त- दान्त व्हाया ॥ १ ॥

१४९

(दारादी दारादी, या चालीवर)

विटला या जगा विपलाश परधामि । निजलोक सहवास मुकला ।
स्वानुगामि ॥ धृ० ॥ निजधर्म निजनाम । फिरुनि वरि स्वधाम ।
स्वजनि रति तयासि अनुताप सान्कामि ॥ १ ॥

१५०

(चाल, बेरन ठाडी)

वैरिण झाली । फसवी कशी मला । चोरुनि माझ्या प्रिया
आज ही ॥ ध्रु० ॥ जरि मज तोडी । जोडि मुकुटा शिरीं ।
अनुगत विभवीं प्रियाला । देउनि झोला । करी त्याग हो ॥ १ ॥

१५१

(चाल–जानकीराम राजाकी)

वांछिता भावना झाली हिमकणशी उगम येता ॥ ध्रु० ॥
सदा मुकुलिता दिसली । काळि जरि कोमल आतां ।
कुठे रात्री विराजता ॥ १ ।

१५२

(चाल–हनुमंतजीने हरखो)

निराधार जीवे जगतां बुडालो बिचारा ।
बुडे बिचारा गगनीं तारा नाच नाचता हांसविती मजला ।
रडवा मेघ सावरिल त्यांना नाना । उदासीन त्या झाल्या आधारा ।
सारा निशेचा पसारा ॥ १ ॥
स्वर्गंगा गगनांगणि डोले चंद्र बिंबिचा रंग फिका झाला
सूर्य निमाला काळोखाचा, नाचा । तुफानात वाऱ्याचा आवारा
सारा तमाचा फवारा ॥२॥

१५३

(अभंग)

बारे पांडुरंगा केव्हा भेट देशी । झालो मी परदेशी तुजविण
ओव ळावी काया चरणावरोनी । केव्हा चक्रपाणि भेटतील ॥१॥
तुका म्हणे माझी पुरवावी आवडी । वेगे घाली उडी नारायणा ॥२॥

१५४

(आर्मी, दादरा)

धूलियुता पदि तुझ्या पापनाश या जनास ॥ ध्रु० ॥
नाहि दुजी कांहि वासना । ठाव चरणि विभव मजसि
दैवहता हीच भावना । देव दिसलि सदय रमणी ॥ २ ।

## १५५

(चाल–लागि लागि मोरी विंदिया)

कां न जागे अता मनि ममता तळमळ लागे ॥ ध्रु० ॥
शैलसम शिला हृदया बांधिता । यौवनकण कसला जगे ॥ १ ॥
स्वैरकरा प्रभा प्रणया जाळिता । त्यागचि रविसमय हा तगे ॥ २ ॥

## १५६

वैरी गमली अबला बाला । सम्मुदित हृदयाला काय ॥ ध्रु० ॥
रवि करमाला । वाहि धरेला । उषा विरहि वरिता त्याला ॥ ध्रु० ॥
तळपत चपला । बघुनि घनाला । लोटि अदय तिजला काळा ॥ ३ ॥

## १५७

(चाल–पनघटपर हो गई)

करि विचलित लोचनि नीर । प्रेमरवि समागमे अविकारी ॥ ध्रु० ॥
कार झळकत आरंभा । त्या गुणे हृदयकमल दल खुलवी
तो हंस वत काल तमाल । दवलिता तारा धांवत पळती ।
मृदु सुव सि डुलवि जगता । मधु सुहास्य वदनी रुळतां ।
आनंद गानि आकाशा रडवी धाई ॥१ ॥

## १५८

(चाल–हो मिया जानेवाले)

या जिवा जगवाया । ये माया । प्रखर कठिना वागुरा
बांधि काया ॥ ध्रु० ॥ नयनिंचा तारा उलटा झाला । मिटे कसला।
जळे मजला अबला रडवाया ॥ १ ॥

---

# लयाचा लय

१५–१०–१९२०

## १५९

(विहार–एकताल)

पिता मानिता नाथा । वरिलें या पदा ।
मिटवा आता वाद हा ॥ध्रु०॥ सुखभागी
तुम्हा संगी । अमुहीन तनुजा पितयाला ॥
आपुल्या गृहा न्या तिला ॥ १ ॥

१६०

(लहु आखोसे हम अपना)

ललना लाडकी रुसली, रडालना? बोला ॥धृ०॥
चंद्रिका खिन्न पाहे । चंद्र मणीही शोके हा ।
हांसत नाही शोके ॥ भागला हांसता । हंसणार
कुणाला बोला ॥ १ ॥

१६१

(पिया मिलन हम जाय)

तुला गणिल पति काय ? बावरे ॥धृ०॥ माया ममता तया ।
निज सुखी वाटे । जननि परकी सदा अपाय ।

१६२

(माने नाहो सैंया)

जाणे आई माया । सुता तिची काया ॥धृ०॥
भिन्ना जरी देहे आहे । जगाला दिसाया ॥ १ ॥
तोडी कुणी ऐसा मोहा । सुखाच्या रडाया

स्वयंसेवक
५-८-१९३४

१६३

(घन घन बाजे)

निजवश केला चेला । करिन चरणि प्राणदान जनकजननी
तुम्ही मजला ॥धृ॥ नाहि काहि आधार या भावे ।
जो भावें तो भयकर विपट मिटे कृति अतुला ॥ १ ॥

१६४

(देशी– एकताल)

पाहिला देवसखा सजला । तोचि एकमात्र निकट राहिला ॥धृ०॥
दे शरणा दीन जना आप्तकाम भावना । देवपणा नाहि उणा, राहे
अनुगत जरि जनि तया दयामया सतत ॥ १ ॥

१६५

(बागेश्री, एकताल)

गुलामी हृदयगामी मला गृहममता परिहरिता हे पशुता
मनुज बसला ।।धृ०।। विषाद झाला तुटली प्रणय वीणा
सुखाला निरखिता । निकट दिसत कवळित करि मरणगति ।। १ ।।

१६६

(अभंग)

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हातीं धरोनियां
चालो वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवे माझा ।। १ ।

१६७

(हिंडोल–एकताल)

नाहि दयिता मी ।। नच कुणा पतिची कांता
विधियुता ।।धृ०।। तुटलि सकल माया ।
हटलि विकल काया । दिगंता वरिन मी आतां ।। १ ।।

१६८

(सूरमल्हार – त्रिताल)

या प्रणयी ललना मना । ये परकामना ।
आभास दे भयभावना ।।धृ०।।
मानमया हृदया अवलेच्या । कटुता ये हताश दीन ।। १ ।।

१६९

(बरवा – त्रिताल)

देवा तुज नाहि दया । किती देसि धाय
सरल शांत हृदया ।।धृ०।। खोटा धरावा
दावा । तया देसि का थारा । मानी जनांच्या
हरिसी विभवा ।। १ ।

[ देसकार – त्रिताल ]

अणुभरि जिव जगला माझा । आस
विफलता जाळि हृदय जरि
कठिण शांत मनि विरह साहिला ॥धृ०॥
दिसत विषमया विषम छाया
घोर कालगति नाश निरखिला ॥ १ ॥

---

## सत्तेचे गुलाम

१५–१–१९२२

१७१

( सिंदुरा—ते बुलाओरे माई. )

त्यागिला थारा नाहीं भीति मातें सतत रमे सुखि जन वन सम
मज वाटे आधारा ॥ धृ० ॥ विलासिता मला पाप जहाली ।
धन नरक मानी । वैरि मज न कुणी ॥ जन वन० ॥

१७२

( खमाज—त्रिवट—उदतन देरेना. )

शठमति सजला आपुलें यश गाया । झाला बुध विसरला
विधीला तो पुरजन फसवाया ॥ धृ० ॥ चतुर वाणि मधुर
मानि तो विकसित धी विलसित स्ववेश विधानि । हो
अपचय गुणनिर्वाणि ॥ १ ॥

१७३

( बागेसरी–त्रिवट–लेवो बायेबाये. )

बोधा या न काय मन लागे । कृति हे विषमा ।
या प्रेमागमा ॥ धृ० ॥ बलाबल काल ध्यानि आणुनि ।
वरिली रीति रमणिच्या ममा ॥ १ ॥

# १७४

( जीवनपुरी–त्रिवट–हरदम मौला तेरो. )

वार्ता मौनवा हे झाली । मी हतभागी कां न रडावें ॥ ध्रु० ॥
नसे सुखाला स्थल पल मातें । मी हसें मोही रडें ॥ १ ॥

# १७५

[ मांड—केरवा. ]

तुझे पालनेवाला हैं गिरीधर गोपाला ॥ ध्रु० ॥
ब्रिंदाबनमें गौवे चरावे सावलो प्यारा ॥ १ ॥
मोर मुकुट पीतांबर सोहे काली कामलवाला ॥ २ ॥

# १७६

( देसकार–त्रिवट–एरी सजनबिना. )

सदा कलहाविना । मना न ये नेम सुनें गमे प्रेम ॥ ध्रु० ॥
सुधा सुधाकर मुखावरि रूसे । नदीसि सागर सदा हंसतसे ॥
प्रभा रविलागिं हास्यनिधाना ॥ १ ॥

# १७७

( त्रिवट–मारा–घेर काम. )

सुधी बालिका । प्रेमी । विलासी वचा भ्रमे
फसे भाविका ॥ ध्रु० ॥ जना अनुगता बनता
विधाता । कुणी नोळखे वाटे नरा दांभिका ॥ १ ॥

# १७८

( अडाणा, त्रिताल–धगरि मुरक गाये )

सुखानें रमाया जरि सांडि न विभवा । रीत अभिनवा समदशा
धना गमते वासना ही धन दाही ॥ ध्रु० ॥ सदा कामना जवळी विलय
आणि । आस करी नाश ही धनदाही ॥ १ ॥

# १७९

( विहाग, त्रिताल–देखोरी बबरेको. )

ही माला विमला का जोडी त्या अनुरागाला अनुगता मला ॥ ध्रु० ॥
लगबग हृदया । कर करि जाया । जो भाळला त्याला ॥ १ ॥

## तुरूंगाच्या दारात

(१-२-१९२३)

१८०

(दरबारी-एकताल-नैनसो नैनैं मिला)

लांछना उगा जगासि। जनता दीना दाहि दिशाला पाहि न काला ॥ धृ० ॥
विविध रीति। भिन्न जाती। अवगणिता नच पाहाती। कुण नच धनि सांत्वनासि ॥ १ ॥

१८१

(भैरवी, त्रिवट-आयो पिया मनरसीया)

निशिदिनी मनि धरिला हरिला विसर न पडला या सुहृदांचा।
त्रिकाल कालगत भेद निमाला ॥ धृ० ॥ प्रेमपुनीता मधुमती गीता।
हृदय कुसुमिता परभयभीता। स्वाराज्ये परिमल भरला ॥ १ ॥

१८२

( भीमपलास-त्रिताल-गोरे मुखसो मोरे )

जो कां सजला लोकां मिळावया। अगतिक जरि मनि
वचनि ही वाया ॥ धृ० ॥ वचनि चतुक पटुता विगुणा।
विरली कुटिल ति सदा भासमयी। नाशि माया ॥ १ ॥

१८३

( शंकरा, त्रिताल-बन बन धुंडू )

विसे वसे कमला गुणशीला। नाथपद चुरिता विरागभये ॥ धृ० ॥
राहिली माथा भागीरथी ती। ना सांडि गौरी हराला। तो तिजला ॥ १ ॥

---

## सोन्याचा कळस

(२४-१-१९३२)

१८४

म्हांने चाकर राखोजी ॥ धृ० ॥
चाकर रहसूं बाग लगासूं नित उठ दरसन पासूं
बिंद्राबनके कुंजगलिनमों त्हारी लीला गासूं ॥ १ ॥
मीरां के प्रभु गहन गंभीरा हृदे रहो जी धीरा।
आधि रात प्रभु दरसन दीन्हो जमुनाजी के तीरा ॥ २ ॥

१८५

[ मांड—केरवा ]

मेघपटला व्यापिला जो जगती भरुनी राहिला ।
मुरलिवाला या जिवाचा गरिबघरिंचा पाहिला
॥ धृ० ॥ करित लीला या सदा बन्सी मुखिची
वाजतां । सकल गोपां बांधलेल्या मुक्त करिता
एकला ॥ १ ॥

१८६

[ आनंदभैरवी—त्रिवट ]

पथ दिसतां परि स्वतां विसरतां । चुकति रमतां
या जगमय सदनिं ॥ धृ० ॥ नयनिं राहि स्मृति-
वितान तारा । विजनिं विपिनिं पद न चलित तरि
करि । अचुक शिरतां या मधुमय भुवनिं ॥ १ ॥

१८७

[ जयंत—मल्हार—एकताल ]

या घरिं असावा दावा निशिदिनिंचा । ती दयिता
जरि कांता । कलह हरघडि व्हावा ॥ धृ० ॥
कठिण हृदयिं धरुनि कांत । हाणुनियां शांत
करिल । धरिल गाल करिल हाल । चुरडि तरि
जिव जावा ॥ १ ॥

१८८

[ मारू विहाग—जिल्हा—त्रिताल ]

तुझ्या वरदाना जीव भुकेला । योग जहाला
तुजसह माझा । तेचि सुधेची धारा झाली ॥ धृ० ॥
जो निवाला तुजविण फिरला । विसरुनि भाव जिवाला ।
तोंचि निराशा नाशा आली ॥ १ ॥

१८९

[ भैरवी—त्रिवट ]

प्रिय जाहला कां हा प्रेमा । कुटिल कुमति—रति
लाविल कैसी मोला ॥ धृ० ॥ केवि परजना ॥
जोड धरावी । निजजन पारखि कैसा केला ॥ १ ॥

## १९०

[ बिलावल–त्रिवट ]

जगिं वंचिता विषसंचिता । हरपलि हृदयशांति ।
नाहिं सुहृद कुणि । प्रणयनाश करि जिवास
हृतबल, मधुर गति दिसतां ॥ धृ० ॥
मोहकभाव क्षणाला दिसला । अशान्त मनांत
उपजवि सुखभर । विफल परि सकल पुरुष-
कुरुचि पाहतां ॥ १ ॥

## १९१

[ जोगी–झपताल ]

फसलो या विरहानें । आतां । जीवा उदासकालिं
रमणींच्या दानें ॥ धृ० ॥ पुरुषगुण हा सरे । मन
मरुनि बावरें । झाला विनाश हाय ॥ हृदयिच्या गानें ॥ १ ॥

## १९२

[ राग–जिल्हा केरवा ]

विसावा माझा साचा व्हावा । पती हा असा असावा ॥ धृ० ॥
उगाचि राहि घरी मानापमान सांडुनिया ।
कसाहि साहि कुणा प्रेमभाव मांडुनिया ।
उदास नाहि कदा देई साद बोलविता ।
विषाद नाश करी त्याची साची सेवा ॥ १ ॥

## १९३

[ सुगराई – त्रिवट ]

ही जरि वसुधा उदार । प्रबल होई हे जनता ।
विरति नरा निराधार ॥ धृ० ॥ धनमद भरला
पाहुनि भडकत । लावित कर नशिबाला । उदासीन
करित धनभार ॥ १ ॥

# भूमिकन्या सीता

(२८-२-१९५८)

१९४

मी पुन्हां वनांतरी फिरेन हरिणीवाणी
ओठांत घोळविन रामप्रीतीचीं गाणीं ॥ धृ० ॥
पुसतील कुशल मज लता, कर्दली, केळी
मोगरा, मालती फुलतिल भलत्या वेळीं
देईल साद मज दुरुनि श्यामाराणी ॥ १ ॥
देतील ओंजळी भरून जांभळी बोरी
येतील पाडसें दबत हळुं शेजारीं
चुंबीन त्यांस मी भरविन चारापाणी ॥ २ ॥
पाहीन दुरुन मी यज्ञधुमाची रेखा
जाईन तपोवनि अवचित कोण्या एका
तरुतळीं बसुनिया ऐकिन मुनीची वाणी
मुनिची वाणी ॥ ३ ॥

१९५

मानसी राजहंस पोहतो । दल दल
उघडित नवनवलानें कमलवृंद पाहतो ॥ मानसीं ॥ धृ० ॥
नील जलावर धवल विहग तो
जलवलयांसह खेळ खेळतो
श्रीरामाच्या वक्ष स्थळीं जणुं
मौक्तिकमणि डोलतो ॥ १ ॥
दिवास्वप्न कीं भास म्हणुं का
वनवासाचा ध्यास जणूं हा
मनीं वसे तें नयनांपुढतीं सजिवपणें रेखितो ॥ २ ॥

# बाबाजी दौलत राणे

## संत तुकाराम

(१९११)

१९६

त्यजि भक्तासाठी लाज जगी दास होऊनि आलों ।। ध्रु० ।।
निजमुखांतलीं बोरें । दे मज शबरी स्वकरें ।।
तीं सेवुनि निर्धारें । अति तुष्ट मानसीं झालों ।। १ ।।

१९७

आनंदाचा कंद हरी हा देवकिनंदन पाहिला ।। ध्रु० ।।
भक्तांसाठीं । ठेउनी कर कटिं । भीमानिकटीं राहिला ।।
कंसभयानें । वसुदेवानें नंदयशोदें वाहिला ।।
यज्ञ–याग–जप तपासि न भुले । ध्यान धारणें ना कळे ।।
निश्चल साचा । परि तुकयाच्या । भक्तिगुणासीं मोहिला ।। १ ।।

१९८

ध्या मुकुंद मुरारि गोविंद ।। अ नंद कंद ध्या हा छंद ।
ध्या मुकुंद ।। ध्या मुरारि । ध्या गोविंद । ध्या मुकुंद ।। गोपाळा
करूनि गोळा मांडि काला सावळा । अंत नाही त्या सुखाला
होय सकला आनंद ।। ध्या० ।। वाजवि कान्हा वाद्ये नाना गति तनानां
बजललना ।। हाक ठुंबरी फुगडचा टिपरी खेळती नारी नरवृंद
।।ध्या०।। रामभजन सब सार मिठाई सुधारसोका सिंध
कहत तुका और छोटके भजो भाई गोविंद ।। ध्या० ।

# कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## मानापमान

(१२-३-१९११)

१९९

[ ४—राग यमनकल्याण, ताल त्रिवट. ]

( "पिअरवा ते हारी" या चालीवर. )

हा टकमक पाही सूर्य रजनिमुख, लाल लाल, परी ती नच जाई जवळि, म्हणत हा काळ काळ ॥ धृ० ॥ तनुवरी तारालंकार, त्यांत भर फार इंदु होत, त्यासि घालित माळ ॥ १ ॥

२००

[ राग—झिंजोटी, ताल—केरवा. ]

( "मेर गलि आ जाव" या चालीवर. )

वरि गरिबा वीरा जी अबला, सुख संसारीं तें कोंवि तिला ॥ धृ० ॥
राघव तोडित धनु ऋषिवेषें, मग जाई वना सीता बाला ॥ १ ॥
अधन धनंजय मीनवधा करी, वनीं वास मग पांचालीला ॥ २ ॥

२०१

[ राग—सिंधुरा, ताल—त्रिवट. ]

( "आयेरी सन गोपी बनवन" या चालीवर. )

माता दिसली समरीं विरहत, नेत सकल नरवीर रणासि ॥ धृ० ॥ मस्तकमाला गुंफित कालमहेश्वरपतिसेवेसि ॥ रणासि ॥ १ ॥ शिकवित भक्ता ही लीला जणुं भीषणयुद्धकलेसि ॥ रणासि ॥ २ ॥

## २०२

[ ताल दादरा. ]

( "मनुजा सुगुणा" या चालीवर. )

चंद्रिका ही जणुं ठेवि या स्नेहें कमलांगणीं । कुमुदबांधव श्यामला मेघा तस्कर मानोनी ॥ धृ० ॥ चंद्रसदननभमंडला मेघांनीं वेढियलें । शोभाघन विपुल तें लपवितां कोपे भरलें । शोधित वेगें दशदिशा भूवरी सकल आलें । आतां निकरें सरसावलें, दिसत ही या क्षणीं ॥ १ ॥

## २०३

[ राग—खमाज, ताल—त्रिताल. ]

( "या तव वघुनी" या चालीवर. )

या नव नवल नयनोत्सवा । बघुनी मानस हें अनुभवत अभिनवा मोहन कोमल भावा ॥ धृ० ॥ रणस्नेहाची, सुंदर यवती । आतां करी समाप्ती । वाटे अस्त्रचि हें रिपुहार्ती । जिंकाया मम जीवा ॥ १ ॥

## २०४

[ राग—झिंझोटी, ताल—झपा. ]

( "इतना संदेसा मोरा" या चालीवर. )

नयने लाजवीत बहुमोल रत्ना । जणु धैर्यधर धरित धनदासम धना ॥ धृ० ॥ नमवी पहा भूमि हा चालतांना । सुचवित तिज तूंचि मजपुढें निर्धना ॥ १ ॥

## २०५

[ राग—पहाडी, ताल—केरवा. ]

( "सखेरी मैंका पिया बिन" या चालीवर. )

खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनीं ॥ धृ० ॥ नभिं जनहितरत भास्कर तापत, विकसत पहा नलिनी ॥ ना धरि ॥ पीडित जन देखतां, स्वसुखा त्यागी दया । जनभयहरण हेंचि सुख, सदया देवराया । दर्शन गुणवंताचें नाचवी प्रेमलहरी गुणरसपान हेंचि सुख, प्रेम तया नांव जनीं ॥ १ ॥

[ ताल–त्रिवट. ]

( "येरानासामी" या कानडी चालीवर. )

दे हाता या शरणागता ॥ धृ० ॥ मदविलसितनदगता पंकयुता मुखमलिना धना हो त्राता ॥ या ॥ १ ॥ चा० ॥ संपदा चपलचरणा । आपदा भोगि नाना । परत ये पद्मसदना ॥ चा० ॥ कुवलय तव मुख तिला; अजि कमला विनवि तुला, मला घे आतां ॥ या ॥ ॥ २ ॥

२०७

[ ताल–दादरा. ]

( "मनसुकरक" या कानडी चालीवर. )

युवतिमना दारुण रण रुचिर प्रेमसें झालें । रणभजना संसारी असें अमर मीं केलें ॥ धृ० ॥ रमणीमनहंसा नर साहस सरसीं रमवी; शूर तोचि, विजय तोचि; हें शुभ यश मज आलें ॥ १ ॥

२०८

[ ताल–केरवा. ]

( "तुमसे बचन दे" या चालीवर. )

मला मदन भासे हा मोही मना । मानी या जना भामामना ॥ धृ० ॥ करी सनाथा मज; तुडवी हा चरणरजासम मानी मना ॥ १ ॥ प्रीतचि पाया रणप्रासादा; दे पदसेवा प्रेमी जना ॥ २ ॥

२०९

[ ताल–झुमाळी. ]

( "परदेशी सैंया" या चालीवर. )

धनराशी दिसतां मूढापाशीं, सुखवी तुला, दुखवी मला ॥ धृ० ॥ शस्त्र जसें अबलाकराला, रूप जसें तें जोगिणीला, सत्ता सुखरत अधमाला, धन जड जना मदत पतना ॥ १ ॥

## २१०

[ राग–पिलू, ताल–दादरा. ]

( "रामको आधार" या चालीवर. )

रामरावणाहि रणा जुंपिलें कसें । कामिनीधर्नेचि तया मोहिलें दिसे ॥ धृ० ॥ कामुका हिरा चमकत बहुत कनक सारें, अमररत्नसकलतेज सुंदरी धरीतसे ॥ १ ॥

## २११

[ राग–अडाणा; ताल–झंपा. ]

( "दुःखी जन्म दवडिसी" या चालीवर. )

धिक्कार मन साहिना ॥ धृ० ॥ अपमानशल्य तें । विषसमचि जीवना ॥ अजर जणु भासते । कुवचनें ताडना ॥ १ ॥ चढवीन विभवा । अवनाची ललना । हा मार्ग बरवा । मातापमाना ॥ २ ॥

## २१२

[ राग–खमाज; ताल–दादरा. ]

( "हमसे ना बोलो राजा" या चालीवर. )

विनयहीन वदतां, नाथा, नाहीं मी बोलत आतां ॥ धृ० ॥ रणरुचिरा रीती, ना शोभे प्रेमा ती । विनयवती मी कांता नाथा ॥ १ ॥

## २१३

[ताल–त्रिवट.]

( "दुःखी मी जन्मलो" या चालीवर. )

शूरा मी वंदिले; धारातीर्थी तप ते आचरती; सेनापतियश याचि बलें । धृ० ॥ शिरकमला समरीं अर्पिती; जनहितपूजन वीरा सुखशांती; राज्य सुखी या साधुमुळें; शूरा मी वंदिले ॥ १ ॥

## २१४

[ राग—जोगी मांड; ताल—दीपचंदी. ]

( "चलो डाकुरमा" या चालीवर. )

अजि टाकुं गडे धनवेषा । मग तोडूं अलंकारा या पाशा ।
।। ध्रु० ।। धनसुख कार्यनाश करी; त्या वनवासा मी स्वीकारीं ।
कार्या तनमनधन करि अर्पण, या योगेचि जयाशा ।। १ ।।

## २१५

[ राग—जिल्हा जंगला; ताल—दीपचंदी. ]

( "हूं तो करोंगी" या चालीवर. )

भाली चंद्र असे धरिला, नाचे स्मरसागरवेला ।। ध्रु० ।।
बोला चतुरा बोलवी चंद्रकला कसें मदनबळें मंजुमंजुला ।
वनमाला बाला दावी लज्जा ग.ला स्मरलीला ।। १ ।।

## २१६

[ राग—जिवनपुरी, ताल—त्रिवट. ]

( हू तो जय्ये" या चालीवर. )

प्रेमभावे जीव जगि या नटला । एकचि रस प्याला ।। ध्रु० ।
नसती भिन्न रस हे, शृंगार राजा नवबल त्याला ।। १ ।।
सकला किरण रंगा दावी इंद्रधनुषी जननयनाला ।। २ ।।

## २१७

[ राग—तिलककामोद, ताल—दीपचंदी. ]

( "माईपीतमबीन" या चालीवर. )

रवि मी, हा चंद्र कसा मग मिरवितसे लावीत पिसें ।। ध्रु० ।।
त्या जें न साधे गगनी; गमे तें साधेचि तव या वदनीं ।
अबलाबल नव हें भासे ।। १ ।।

ग्रं
2399
296

## २१८

[ ताल—दादरा. ]

("पानी भरेली कोन" या चालीवर.)

पाही सदा मी परि केविनाथ मासे मला नवोनव ।। ध्रु० ।।
स्वरूपगर्वा करि अदय घावा । दे भूषण सहाय्या
हृतबल हृदया, डाव हा मांडिला ।। १ ।।

## २१९

[ राग-पहाडी—मांड, ताल-धुमाळी. ]

( "हट छोड सखे" या चालीवर. )

शशिसूर्यप्रभा गगनाची; ही दासी भूमितलावरिची ॥ धृ० ॥
मुखभानुवरा भालहिमकरा स्पर्शाया न धजे ही काया ॥ १ ॥
हे चरण मला रविचंद्रकला, सेवा योग्य गमे यांची ॥ २ ॥

## २२०

[ राग-भूप ताल-त्रिवट. ]

( "प्रभू उगडुण गिनत" या चालीवर. )

धनी मी, पति वरिन कशी अधना । पति जरि अधन, निधनसम;
मानी भामा विफल इतर सुगुणा ॥ धृ० ॥ प्रखर पराक्रम
वीर भानु भुलवित उषा रक्तवदना । तोचि निकट मग जातां
जाळी तिजला; ऐशी भीति मना ॥ १ ॥

## २२१

[ राग-जिल्हा, कवाली. ]

( "कालि बदरीया" या चालीवर. )

श्री नव नवरी भासे ॥ श्री ॥ ॥ धृ० ॥ स्वपति बुडविला शयनी
सागरीं । कामा कशी ये पतितानारी ॥ १ ॥ फिरवित सकला
चपला भिंगरी । कोणा कधीं तो नच वरी नवरी ॥ २ ॥

## २२२

[ राग-भैरवी, ताल-केरवा. ]

( "पियाको मिलनवा" या चालीवर. )

प्रिया अपराधी मी ती भामिनी ॥ धृ० ॥ व्याहो पदरी सदया
मजला, विमला सुसमागमें समजुनी ॥ १ ॥

## २२३

[ राग-भीमपलास, ताल-झंपा ]

प्रेम सेवाशरण सहज जिंकी मला । मीच
चुरिन चरण, दास मी हो तुला ॥ धृ० ॥ मन तोडि
रणबंध, लागे तुझा छंद । कीर्ति हा
मज चांद तव पदीं वाहिला

२२४

[ राग–पिलू, ताल–दादरा. ]

( शाम तोरे नयन – या चालीवर )

मी अधना, न शिवे भीति मना; योग्याधना चौरचिंतना ॥ धृ० ॥
रवि हिमकरहि भययुत ग्रहणीं, भय नच तें दीपमना,
समयीं त्या दीपमना ॥ धृ० ॥

२२५

[ राग–जिल्हा, ताल–दादरा. ]

( 'दर्सन मैं ना मई' या चालीवर. )

सवतचि भासे मला । इतो नसे ही माला ॥ धृ० ॥
नच एकांती सोडी नाथा, भेटूं न दे हृदयाला ॥ १ ॥

---

## स्वयंवर

(१०–१२–१९१६)

२२६

[ राग–पिलू–जिल्हा, ताल–पंजाबी ]

( 'सावरिया मन भायरे' या चालीवर )

नच कधीं रस सेवाया, सोडा स्थान ॥ धृ० ॥ जरि प्रेम नसे
गुण–रस विरसे; पर–गृह–वासें अपमानें जाई प्राण ॥ १ ॥

२२७

( राग–यमन, ताल–त्रिवट, 'हावरा मोरा' या चालीवर. )

नाथ हा माझा मोही खला; शिशुपाला भारी झाला वीर रुक्मी
शिशुसम आणिला ॥ धृ० ॥ वीरा लोळवि, मग हळु धरुनी,
कर–रत्नाला जणु हा ल्याला ॥ १ ॥

२२८

[ राग–बिहाग ताल–त्रिवट ]

( 'प्रभु लीला गमते ही' या चालीवर )

मम आत्मा गमला हा, नकळत नवळत हृदय तळमळत, भेटाया
ज्या देहा ॥ धृ० ॥ एकचि वेळ जरी मज भेटला, जीव कसा
वश झाला, भाव दुजा मिटला, वाटे प्राणसखा आला परतुनी
गेहा ॥ १ ॥

## २२९

( राग–भूप, ताल–त्रिवट. 'फुलवनसेज सवारू' या चालीवर. )

सुजन कसा ? मन चोरी ! अग हा—चोरी–यदुकुलनंदन ॥ धृ० ॥ सहज नेत्र भिडे, सहज मोह पडे सहजचि करी मम हृदय हें वेडें; विलीन–लोचन–मार्गे शिरत घरी; मन चोरी ॥ १ ॥

## २३०

(राग–पहाडी, ताल–झुमाळी, 'बोरिदा चित लागो' या चालीवर)

एकला नयनाला विषय तो झाला ॥ धृ० ॥ सकलहि स्थानी अवघा भरला, न बघत इतरा डोळा ॥ १ ॥ अवयव सगळे नयनी जमले, यदुवर दिसतां मजला ॥ २ ॥

## २३१

( राग–पूर्वी, ताल–त्रिवट, 'मथुरा न जावो मेरा कान्ह' या चालीवर)

रमणि मजसि निजधाम, सन्मुख रुक्मिणी ॥ धृ० ॥ नयनें बोले स्वागत केलें; नरवरा, करा आराम ॥ १ ॥

## २३२

( राग-काफी, ताल–त्रिवट, 'कोन तऱ्हासे तुम फेकत' या चालीवर.)

रूप–बली तो नरशार्दुल साचा, क्षणीं विनाशित रिपुभाव मनिचा ॥ धृ० ॥ खला देखी, मग भूल फेंकी, नयन–भाषण मनासि जिंकी, क्षणीं विनाशित स्वभाव रिपुचा ॥ १ ॥

## २३३

( राग–सारंगा, ताल–त्रिवट, 'साचि कतयाकि' या चालीवर. )

कांता मजसि तूंचि, गुरुहि तूंचि; तुजसि निर्मी नेता विधाता ॥ धृ० ॥ बिकट रणीं मज शास्ता आतां तुझें भाषण; कधि न आप्ता रणीं वधिन; तूंचि रणाला नियंता ॥ १ ॥

## २३४

( राग–भीमपलास, ताल–त्रिवट, 'तेंडेरे नालमेलगी' या चालीवर )

स्वकुलतारक सुता; सुवरा वरूनी वाढवी वंश वनिता ॥ धृ० ॥ सुखविला नच जनक, न माता, ऐशी कांतां नरकरता ॥ १ ॥

## २३५

( राग–पहाडी, ताल–कवाली, 'चल गये' या चालीवर. )

नरवर कृष्णासमान घेतसे जन्मा, भाग्य उदेलें हें, शिकवी सुकर्मा ॥ ध्रु० ॥ बहुत नृपति ते आले गेले, परि मनाला यदुवर झाला मंत्र महान ॥ १ ॥

## २३६

( राग–पिलू, ताल–पंजाबी. 'पीकि बोलिना बोल' या चालीवर. )

बोल होईल फोल, अनुभवानें ॥ ध्रु० ॥ यदु गेला अजि निज द्वारकेला, करि बंध सिंधू विलोल ॥ १ ॥

## २३७

( राग–मालकंस, ताल–झपताल, 'सा सुंदर बदन' या चालीवर. )

जा, भय न मम मना; मंडप सबल, समरानल–महाज्वालें जळेना ॥ ध्रु० ॥ शिशुपाल–वैराग्नि पेटला, भेटला जणु कृष्णबल–सागर तयाला ॥ १ ॥

## २३८

( राग–सूरदासी मल्हार, ताल–त्रिवट. 'गरजत आये' या चालीवर.)

अनृतचि गोपाला मृत्यू आला, यश ना शिशुपाला ॥ ध्रु० ॥ कटु वार्ता ती ऐकतां, हृदयीं बोले सखा मज 'तुजला वरियलें' ॥ १ ॥

## २३९

( राग–जंगला, ताल–पंजाबी, 'काहेरी ननदिया' या चालीवर. )

करीन यदुमनीं सदना, रुचिर सदन पति–मन सतींना ॥ ध्रु० ॥ शुभ मणीमय भुवन अबलांना, जरी नाथ रमेना ॥ १ ॥

## २४०

( राग–बागेश्री ताल, त्रिवट, 'कोन गत भई' या चालीवर. )

प्रेम नच जाई तेथें, जिवासी जीव न जडे जेथें ॥ ध्रु० ॥ अनुसरतांना जडतें नातें; जीवा जीव एक कायं भेटवीतें ॥ १ ॥

## २४१

( राग–तिलंग, ताल–त्रिवट, चाल–'मोहेलीना नेक नजर यानी. )

लपविला लाल गगन–मणि, परि दिन अशुभ होत नच, दृष्टि न विफला; मगध–समरपति नव रवि उगवला ॥धृ० ॥
योग्यचि वर मम, सुखविल बाला; शुभ दिन अजि सुता वरिल वच शिशुपाला ॥ १ ॥

## २४२

( राग–देसकार, ताल–तिताल 'अमलारा माता' या चालीवर. )

अजि राधा बाला मीच गोपाला ॥ धृ० ॥ आलें चारायाला धेनूंना; मोहिलें कंठ–मधुबलें कृष्णाला ॥ १ ॥

## २४३

( राग–भैरवी, ताल–दीपचंदी, चाल–'ना मारो पिचकारी.' )

नृपकन्या तव जाया, आर्या; सुखविलासी सोडींना विनया ॥ धृ० ॥ वस्त्राच्छादना विरल कराया भिजवितां कां मम काया ॥ १ ॥

## २४४

( राग–तिलककामोद, ताल–रूपच. 'सूरसंगतरागविद्या' या चालीवर. पडदा.)

मम सुखाची ठेव, देवा, तुम्हापाशीं ठेवा; तो स्मृतिवरि लिहावी, मम कारणें, जनकनांवा ॥ धृ० ॥ अखिलहि खर्चचि करि, आप्त–देव–धर्म–वैभवीं; वर अजि हा असा मला द्यावा ॥ १ ॥

## २४५

( राग–हमीर, ताल–एकताल, 'दीम दारा दिर दिर' या चालीवर. )

सुंदर–मुख ललना, निजजनक–कुल–मना, तनमन नच देई अधम जना;–सहज असा नियम दावि निजलग्नीं, सदय–हृदय विनय–विनत न्यायरत नीतियुत अंगना ॥ धृ० ॥
सुखद लग्न असु–विकसन; नरतनु बलधन कर्मधाम, सुख–विलासनीं कुशल नाहीं वधुसमान; नीकटि गमन धर्म जाण; नयविनयचि पथ विशाल संलग्ना ॥ १ ॥

## २४६

(राग–जैजेवंती, ताल–झपताल, चाल 'चंद्रबदन राधिका.')

**गुरु सुरस गोकुळीं, राधिका मिरवली कृष्णाजवळी बाळी**
**॥ धृ० ॥ प्रेमीजन कनवाळू, मन मिळवी मग शिकवी उपजताचि ज्ञाना–विज्ञाना सुवेळीं ॥ १ ॥**

## २४७

(राग–कालिंगडा, ताल–दीपचंदी, 'रात लढी' या चालीवर.)

**मम मनीं कृष्ण सखा रमला; नच रणीं आप्तवधा सजला**
**॥ धृ० ॥ नवल नाहीं, नच दृश्य इतरां झाला; दहन झालें; शिशुपाल समजे भोळा ॥ १ ॥**

## २४८

(राग–मालकंस, ताल–त्रिताल, 'कृष्णमाधो राम' या चालीवर.)

**वैरि मारायाला, ही गोशाला ॥ धृ० ॥ प्रमुदित माता, रिपुबल नमवितां; करि मृदुल दूध अरि–वध; सबल अबला ॥ १ ॥**

## २४९

(राग–ललत, ताल–त्रिवट, 'मावेंदा यारदा जोबन' या चालीवर.)

**अचला विचला, दाविल तव अचुक पद मार्गाला ॥ धृ० ॥**
**दिसत पंथ बहु, संशय आला; अचल धर्म तव प्रेमाला ॥ १ ॥**

## २५०

(राग–देसी, ताल–धिमात्रिताला, चाल–'येरी मैं को नाही'.)

**त्वरा करा नाथा, तुझिया नावा मळवितो राहू खरा ॥ धृ० ॥**
**जंगविल आशा मजला नच आता, गमविता वेळ जहा ॥ १ ॥**

## द्रौपदी

१९-१२-१९२०

२५१

[राग-हमीर, ताल-त्रिवट; चाल-'धीट लंगरवा']

थाट समरिचा दावी नट साचा; परि येतां
मग काळ करणिचा, लागतो नाट ॥ धृ० ॥
स्वयंवरा मम नटवा आला; सोंग सजविलें,
धनुला धरिलें, मत्स्य दिसेना, बाण चढविना;
जय पावेना ा थयथयाट ॥ १ ॥

२५२

( गज्जल-जिल्हा खमाज, चाल-'मै फक्त एक नहिं' )

धर्ममय ही काया, धर्म हा विजया पाया;
बुडतां नो नासवितो शूर वीरांची विद्या ॥ धृ० ॥
पांडव हा, कुरु हा तुल्यबली सकला; परि
घाली कमला लोटांगण धर्माला ॥ १ ॥

२५३

( राग-भूप; ताल-आध्धा. चाल-'झांझ मंदीरवा' )

लाजविलें वैऱ्यांना, उरेना कामना ॥ धृ० ॥
सदा आनंद मला, सुखाला संपूर्णाला सेवित आलें;
न्युन भासलें, नाहीं देखिली रिपुविडंबना ॥ १ ॥

२५४

( राग-जयजयवंती; ताल-झपताल, चाल-'अचल रहो राज' )

नयनीति ही नाहीं; बंधूसि व्यसनीं देखोनि स्वस्थ मन राही ॥ धृ० ॥
जो कौरवजनां, तो पांडवांना न्याय पाही ॥ १ ॥

२५५

( गज्जल-पहाडी., चाल-'देखके दिदार' )

पांडवा सम्राटपदाला पोंचविता तो जाहला;
भक्तिचा हाचि हात माझा महापुण्यें सजविला ॥ धृ० ॥
कंस पापी तो जरासंध परमसाहसें मारिला;
उपभोगाची वेळ येतां स्वार्थत्यागी राहिला ॥ १ ॥

## २५६

( राग–देसकर; ताल–त्रिवट; चाल–'जागो जागति' )

पुरुषासि स्त्री ज्ञानमाला; सुखद समय, अशुभ समय, भेद कळे सहज तिला ॥ धृ० ॥ पुरुष वपुसि अर्पी शौर्याला, इह लोकीं बहु दिन सुखविलास–फळ मिळवी अबला ॥ १ ॥

## २५७

( राग–पहाडी; ताल–खेमटा; चाल–'करोना कोई' )

विराट ज्ञानी कोंदटला सुमनीं ॥ धृ० ॥
सुमन रेणु चराचर भुवनीं, परि तें कृष्ण जाण; कणकण असे महाजन, कारण मागें उभा धनी ॥ १ ॥

## २५८

( राग–बागेश्री; ताल–त्रिवट, चाल–'अपराध क्षमा करुनिया' )

ठरला जणु मत्सर राजा; वृद्ध तरुण बांधिती पूजा ॥ धृ० ॥ होत सहज सुख तरुणपणाला, वृद्धदशा सोड सुखलीला, सहच तरिच परिविभव मनाला, हाहि नियम विलया आजि गेला ॥ १ ॥

## २५९

( राग–जिल्हा पहाडी; ताल–खेमटा; चाल–'गुरु दीन दयाळ' )

लढवूं गुरूला रणीं नका ॥ धृ० ॥ बोधामृतासि पसरावयासि व्हावें कां बांध नेमका ॥ १ ॥

## २६०

( राग–सोहनी, ताल–त्रिवट, चाल–'मधुरानना' )

गमली मना, निज सावली भूतावली ॥ धृ० ॥
अशुभ नाना नव कल्पना भयचकिता जवळीं ॥ १ ॥

## २६१

( राग–भीमपलास; ताल–झपताल. चाल–'भरन लगी' )

न रणभूमि न विलसन, एकावरी प्रेम न धरि कुरुजन ॥ धृ० ॥ समप्रीति जरि ख्याति, नातें भगिनीचें तुझें साचें, करि मनन ॥ १ ॥

२६२

(राग–बिहाग, ताल–त्रिताल, चाल–"अटलसबजानी.")

असाचि दिसला ध्यानीं चिंतना, मिरवित सोज्वल भाव-भावना ॥ धृ० ॥
सतत आपुलें द्यावे नयना । प्रत्यक्ष दर्शन,
हीच प्रार्थना ॥ १ ॥

---

## सं. सावित्री

६–३–१९३३

२६३

(राग–जिल्हा पिलु, ताल–त्रिवट चाल 'पियाबिन चैन')

प्रिय जरि हा सहवास मला । आवरी उतावीळ मनाला, ।
बंध धर्म सकला ॥ धृ० ॥ बंधन योगे अमर संसार ।
चंचल दुःखचि तो अविचार धरीना संतोषाला ॥ १ ॥

२६४

(राग–भीमपलास, ताल–एकताल; चाल–'क्या करूं मैं.')

योग्य न प्रेम वर्णना । वाणी, मति–मनसाहसह, प्रेम–धाम
गांठीना ॥ धृ० ॥ ब्रम्ह सत्य मज प्रेमा, बहु रूपा बहू नामा
घेईना । समता ती एक एक भगवाना ॥ १ ॥

२६५

(राग–मांडजिल्हा, ताल–रूपक; चाल–'आइरी सजना.')

लाविना मन हें अजि दोषा या जना ॥ धृ० ॥ निकटि आला,
शरण गेला मम देह तत्क्षणा ॥ १ ॥

२६६

(राग–जंगला, ताल–कवाली; चाल–'बिनति हमारी.')

मजला घडावी देवा तव पदसेवा । सहवास द्यावा ॥ धृ० ॥
सेवेत भाग पावतां, सहजा मिळे समता । छंद असा पुरवावा ॥ १ ॥

२६७

[ राग–काफी; ताल–त्रिवट; चाल– 'लागि उचट.' ]

सनातन नाद हा भगवाना । साधुजना पहानें, फुलवित दानत आचरित ज्ञाना ॥ धृ० ॥ नाद–निनादे नारदा वदे । शील घे विषय गाना ॥ १ ॥

२६८

[राग–झिंजोटी; ताल–कवाली; चाल– 'सिरि राम कहे.' ]

सजला नटला जणु राजा । लखलखीत दावित तेजा ॥ धृ० ॥
बलसागर तारी दीना । तप तपत शीलधर राणा । बहु चमकवि साहस काजा ॥ १ ॥

२६९

[राग–कर्नाटकी आनंद भैरवी; ताल–त्रिवट; चाल– 'भ्रुवसमया.' ]

नयनीति ही बहु प्रेमळा । मज धर्म हा समजाविला ॥ धृ० ॥
कुपथा मना कधि दाविना । विमल अबला दे नरा बला ॥ १ ॥

---

## विद्याहरण

३१–५–१९१३

२७०

[ राग–सिंदुरा, ताल–दीपचंदी. ]

( 'कान्हा ये सखि नंद महलमे,' या चालीवर. )

आला जो मज प्रेमें वराया । कां न करी सुशिला निज जाया ॥ धृ० ॥ कुमुदमोहें पकांत दिसला । करि मग विमल शशि तो कमला ॥ १ ॥

## २७१

[ राग—शंकरा, ताल—झपताल ]

( 'निर्धना जी वरी' या चालीवर)

**जाण जरि शत्रूला, जामात नेमिला । वंशतरू जाळिला मीच माझा ॥ धृ० ॥ देवयानी मला, पुत्र जणु एकला । काव्यरस जन्मला, गितराजा ॥ १ ॥ अभिमान हा दिसे, तापसाला पिसें । जीव परि तो असे, आप्तकाजा ॥ २ ॥**

## २७२

[ राग—काफी—धनि—पिलू, ताल—दादरा. ]

( 'बालमुजे साडी गुलाबी' या चालीवर. )

**भास मला झाला, पहातां कपोला, इंदु तो नभीचा सेवि भूतलाला; येथ दिसे ही आप्तलोकांशुमाला तयाला ॥ धृ० ॥ अधरबिंब धरि सुधेसि, रजनी ही केशराशि, नयनगोल दावि लोल तारांगणाच्या प्रभेला ॥ १ ॥**

## २७३

[ राग—किर्वाणी, ताल—दादरा. ]

( 'वरमुल सखि' या कानडी चालीवर. )

**सुरसुखनि तूं विमला सगुणा कविबाला ॥ धृ० ॥ वदनमणि मज, रमणी, अचुक दावि मार्गाला ॥ १ ॥ देवयानीदेह धरे अमरविभवगुण सारे । सकलकला कवितनुजाचरण मला ॥ २ ॥**

## २७४

[ राग—जिल्हा झिंजोटी, ताल—केरवा. ]

( 'डोलत आये मोरि नैया' या चालीवर. )

**डोलत जीव देवकाया देखोनियां तव ॥ धृ० ॥ ही देवकाया अहो कीं जीवमाया ! लाज उपजे, मी नच साजें याचि पाया; कांति नवोनव ॥ १ ॥**

## २७५

[ जिल्हा–खमाज, ताल–पंजाबी. ]

( 'तनमनकी सुध विसर गई' या चालीवर. )

मधुमधुरा तव गिरा मोहना, भासे निशेची भूल मना ॥ धृ० ॥ मदिरा म्हणू तरी ती भ्रांती, मधु रिपु हाचि खरा ही ख्याती; दीनवशपरी मनधरणी ही करवि, हें नवल होई जना ॥ १ ॥

## २७६

[ राग–देस सोरट; ताल–एक्का. ]

( 'पियाकरधर देखो घरकत है मोरि छतिया,' या चालीवर. )

मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला, भोगी पुष्पमाला; अभिनव कुसुम मधुपा, सहज सुचविती नूतन शृंगाराला ॥ धृ० ॥ भ्रमर सुरस वर्नि दिसला कमला टाकुनि; कच अदय, भयद झाला; कोमजलें सुमनदल, दुखवि मजला ॥ १ ॥

## २७७

[ राग–जिल्हाधानी, ताल–दादरा. ]

( 'जाको सखि' या चालीवर. )

जननि चलाचला, प्रीति जीवकला; लोक लोकां सूत्र असे अचला प्रीतिलीला ॥ प्रेमसखा उद्धरि जीवाला; हा जन्मतांचि ब्रम्हा साक्षात आला, देवधर्ममहिमा धरि खरा प्रेमा; तारण्या जगाला देव प्रीत झाला ॥ धृ० ॥ ईशाचे नामा–स्वरूपा पहाण्या, मिळाया विशाल मार्ग सोपा प्रेम मला ॥ १ ॥

## २७८

[ राग–देशी, ताल–झपताल. ]

( 'डिडौडन बाजे' या चालीवर. )

अहंकार माझा विदेही कराया धजते ती देवा वरुनिया ॥ धृ० ॥ मम जीवज्योति सुता मृत्युहानि जरि जाई, यश नाहि या सांप्रदाया ॥ १ ॥

२७९

( 'सकल्पमे टीदा' या कानडी चालीवर. )

तेजा नभिं ज्या साहवेना, तें देई मृदुला शोभा
नयना ॥ धृ० ॥ सत्या कठोरा ज्या सोसवेना, करि
तेंचि तव मुख मधु मना ॥ १ ॥ बहुदुःख संसार, परि
दे जनां अति सौख्य साध्वीसंगे जाणा ॥ २ ॥

२८०

[ राग–भीमपल्लासल, ताल–त्रिवट. ]

( 'तुमसन लागी रटना' या चालीवर. )

दिसत न कशी ममता ? कवि पिता हो माता ॥ धृ० ॥
दुःखित जगासि दयार्द्र लोचन कविजन । विकसवि
आतां नयन ॥ १ ॥

२८१

[ राग–पहाडी; ताल एक्का. ]

( 'जोबन मदभर चलि आई,' या चालीवर. )

लोळत कच मुखमधुवरि, त्यांसि तोंचि कर निवारी ।
भ्रमरयोग कमलयोग, या धर्मा दूर न करि ॥ धृ० ॥
शिक्षेला कच न पात्र; देवयानि, तूचि शपथ, सफल काम
नलिनिनाथ दुखवि न वनिं कच यापरि ॥ २ ॥

२८२

[ राग–हमीर, ताल–एक्का. ]

( 'तेंडेरे कारन' या चालीवर. )

विमल अधर निकटिं मोह हा पापी ! वदन–सुमन–गंध
लोपी ॥ धृ० ॥ धवला ज्योत्स्ना राहुसि अर्पी सुखद सुधाकर
विमल अधर ॥ १ ॥

२८३

[राग–बागेश्री, ताल–झपताल.]

( "आतां राम पाहि मना" या चालीवर. )

आतां राग देई मना शांततेला; वीर हा; असूर संहार झाला ॥ धृ० ॥ कोप दुर्गचि खरा दुर्बला जाहला, विजयदायक मला, बंदी याला ॥ १ ॥

२८४

[राग–भैरवी, ताल–त्रिवट.]

( "धन्य जाहला, माझा राम पाहिला" या चालीवर. )

लग्न होईना, नाथा; तात साहिना ॥ धृ० ॥ सुरवर, माना सहोदर या जना; त्यागचि तारक कांता, विरहि मनांना ॥ १ ॥

२८५

[राग–पूर्या धनाश्री, ताल–झपताल]

( "दत्त गुरु दत्तगुरु या चालीवर. )

मद्य मद चोरि तप दाऊनी सुख नरा । चौरकहि बल भास; शापयोग्या सुरा ॥ धृ० ॥ ही वारयोषिता दारुणा सेविता । भस्म करिते जना, व्याधि भयकरा ॥ १ ॥

२८६

[राग–सोडाकानडा, ताल–एक्का]

( "तू है मदमदसा' या चालीवर. )

तू का वदसि मला कटु बोला, अबोला बरा या बाला ॥ धृ० ॥ प्रेमनाश झाला, केंवि राग आला? नच मधु ने नाशा भ्रमराला ॥ १ ॥

२८७

[राग–सोहनी, ताल–त्रिवट.]

मध वपु घट लत्ता प्रहारे फुटत हे, रुधिर सम मत्त मद वाहे न भू भार साहे ॥ धृ० ॥ मधु वध कुपित समर जरि गुरूवर करी घोर, विगत विजय कच नोहे ॥ १ ॥

# मेनका

## (२२-४-१९२६)

### २८८

[राग-काफी; ताल-त्रिवट; चाल-"कोन गावको छोरा"]

भक्तिभाव हा, घ्या सेवा; चिर रूप तपनांत तापवा; गोड गोड मज बोलवा ॥ धृ० ॥ अमर कलांसि मम देह धरी, सत्य सत्य त्या राबवा ॥ १ ॥

### २८९

[राग-शंकरा; ताल-त्रिवट; चाल-"केशव हा गमला"]

सन्निद्ध जी सेवा, सेवा तीच सुखदा विरहो
जनाला ॥ धृ० ॥ सौख्य असें विमल करा,
सहजचि मारा मग विरहाला ॥ १ ॥

### २९०

( गजल ताल-केरवा चाल-जुदइमे तेरे )

इथेच थारा पराक्रमाला; म्हणोनि देवा जन्म आला ॥ धृ० ॥
परोपकारे सुखीच झाला, तनूसि झिजवित जगांत ठेला
तो शिकवितो या सेवेला ॥ १ ॥

### २९१

( राग-भीमपलास; ताल-त्रिवट; चाल-'तुमबिन आये हो' )

भूषण संसारा, विमला-वनिता-वश जरि जीवपसारा ॥ धृ० ॥
प्रेमळ जीवन या अधिकारा जीव पोचतां, मोक्षचि दुसरा ॥ १ ॥

### २९२

( राग-बिहाग; ताल-त्रिवट; चाल-'साच साच मत बोल' )

सत्य, सत्य नच, फोल पाला; जरि नच सत्यें सौख्या गेला ॥ धृ० ॥
सुखफल सत्या नियमें आलें, तप झालें सुखसाधन मजला ॥ १ ॥

## २९३

( राग–बागेश्री; ताल–त्रिताल; चाल–'बन बन बन आये' )

प्रियकर वश मजला; विमल यश हेंचि, गुरुपदा देह चढला ॥ धृ० ॥

स्त्री पुरुषा गुरुता येतां । विरह–कलह मग शांत झाला ॥ १ ॥

## २९४

( राग–जीवनपुरी; ताल–त्रिवट; चाल–'छिन छिनया' )

अजि पुरवा ही हौस प्रियकरा, मातृपदीं तनु मम बसवा ॥ धृ० ॥

स्त्री जगाला स्त्रीच विधाता; होत नाहीं जरि माता, विश्व–सुखीं विष कालवा ॥ १ ॥

## २९५

( राग–भैरवी; ताल–त्रिवट; चाल–'राजामानिबे' )

देहा विसरलें नच; मग सुख जाणा हीन वासना ॥ धृ० ॥

अभ्यास सतत सकलहि केला, डोल फोल नकळत पळाला;

देहसंग परि बुद्धि सोडिना ॥ १ ॥

# वासुदेव नीळकंट आगटे

## संगीत महानंदा

(१९१५)

२९६

(भैरवी, गर्भा 'बारोपियाकांता बिन')

शिव शिव जन्मा आले का अशा ।। वारांगना देह दुष्कीर्तीचे गेहे ।। धृ० ।।
लोकी पती एक नारी कुणी ।। येतो गृही तो होतो धनी ।। चित्ती न सद्भाव चिंती दुजा भाव ।। १ ।। नाये कळु ऐशी बोले हळू । द्रव्याविशी मात्र जैसी जळू ।। चिंती ।। २ ।। माया दया काही नाही मनी ।।
कामांध लोका डसे सर्पिणी । निकाम न प्रेम करणे असा धर्म ।। ३ ।।
माता पिता बंधु ऐशा रिती ।। कानी कपाळी कीं सांगती ।। निष्काम न प्रेम करणे असा धर्म ।। ४ ।।

२९७

(सारंग–केरवा हमदम देखे)

नटजन वेष खचित गमतीचा ।। बहुत हिमतीचा अमित किमतीचा ।। धृ० ।।
अंतर्बाह्य विरोध कृतीचा ।। गुप्त शोक वरि हास्य रसाचा ।। १ ।।
बाह्यांगी नव सुंदर योषा ।। अंतरि विश्व निमा पुरुषाचा ।। २ ।।

२९८

(दिलदार दिलारा)

मी नारि नरांचे तनमनधन आणि वेधित या नयने ।
चलविचल करिन तरुणि तरुण मन सारिगम गाउन अमित दाउन ।। धृ० ।।
नरेंद्र पार्थ जसा सोहि बाण उजव्याने ।। प्रसंगीं तोचि तेंचि योजितसे डाव्याने ।। परशुराम जसा मारि अरी शापाने ।। कधि कधि छेदितसे शिर बाणचापाने ।। १ ।।

२९९

(नैजोबनवालीका)

जें जें मी मागूं ते मला वाढा ।। जयभुवनी यश जोडा
मातेच्या हातुनि तनया वधोनी । गंधा करोनी मला वाढा ।। १ ।।
साध्वीने सदनी पाक करोनी । वसना त्यजोनी मला वाढा ।।

# वासुदेव वामन खरे

## चित्रवंचना

१९१७

३००

(भैरव – त्रिवट)

नृपति– कन्या कां वारे अनुरूप कांता ॥ धृ०॥
गरिब मी दुबळी बळे । मज शोकि लोटिले ।
वचन तसलें । मजसि दिधले ॥
उचित गमले । असे आता

३०१

(जीवनपुरी, ताल–त्रिवट)

मंजुळ किति मंथर –गति नुपुर रव हा अनुताले ॥
जणुं नीलकंठा नृत्यागम सांगे ॥ धृ०॥
हा दूर चतुर तर कांता नियोजी ॥
लागुनी श्रवणा सुचवी आराधन माते ॥ १ ॥

३०२

(सारंग–दादरा)

मानस का हे । संशय मम जयि घेई ।
अधीर का होई । नेत्र माझा सुरु ॥
वीर विजयी खरा । तरुणा भारी लोळवि पायां ॥ धृ० ॥
भुलवू कुमारा । संभ्रम मम सारा ।
मदनलीला – पसारा । वरा हा । नेत्र माझा सुरा ॥ १ ॥

## सं. उग्रमंगल

(२१-१-१९२२)

३०३

[राग-यमन ताल-त्रिवट]

आज तव गडे । सुख मला । नृप रमणीं – वैभवि नोहे ।
जरि पति मानी । गुण-गण वानी । मनिचें जाणी ।।धृ०।।
सदन भार । समज अनिवार । हुरहुर थोर झुरवि हे हृदय सतत ।।

३०४

(चाल-गजल)

चाले वसंत राजा । आस्ते । कदम मुलाजा ।।
संगे जनानि फौजा । रंगेल ढंग मौजा ।। धृ०।।
सरकार राव रंभा । शृंगार करी ताबा ।
कार्या इथे न थारा । वर्दी न अर्जदारा ।।

३०५

[राग-देशी, ताल-त्रिवट]

भाव भला भजकाचा । साधी प्रभुदया ।। धृ०।।
कायिक वाचिक नच याग निभावे । हृदयि रिघे देव ।।

# राम गणेश गडकरी

## पुण्यप्रभाव

७–६–१९१६

३०६

वाजिव रे बाळा । वेल्हाळा । रुमझुम घुंगुरवाळा ।।
अस्फुट विश्वांचे । प्रेमाचे । गाणे आनंदाचे ।।
वदलो जे नांदी । संवादी । तुझिया जन्मा आधी ।।
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । काहीसे भीतीचे ।
बाळा ते बोल । तुं बोल । आज मनी जे खोल ।
रात्रीच्या काळी । जो बसली । ब्रम्हानंदी टाळी ।
मनी तेव्हां बाणे । जे गाणे । अस्फुट मंजुळवाणे ।।
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणे ते गाया ।।
हृदयी खळबळले । दरवळले । विना ऐकिल्या कळले ।।
गाणे मंजुळ ते । झुळझुळते । तुझिया वाळचा भवते
बाळा हालूं ते । बोलूं दे । आनंदे डोलूं दे ।।
एकच पायाचा । वाळचाचा । नाच गोड बाळाचा
ऐकूनि आनंदे । त्या छंदे । घर सगळे नाचू दे ।।

३०७

(आतपरी दरबार)

नाचत ना गगनात । न था । तारांची बरसात ।। धृ० ।।
आणित होती । माणिक मोती । वरतुनी राजस रात ।। १ ।।
नाव उलटली । हाव हरपली । चंदेरि दरियात ।। २ ।।
ती ही वरची देवा घरची । दौलत लोक पहात ।। ३ ।।

३०८

(बोल मोरे राजा रे.)

बोल ब्रिजलाला काही हंसुनी बोल । भ्याले जनाला । भ्याले मनाला ।
सुटला माझा तोल । । बोल ०।। तरि उरि धडधड रहा मनिचतू ।
हांसुनि भिरभिर वद नयनानी नवलाखाचा बोल ।। बोल०।।

निज बाळा रे गाणे गाते आई । करि आता जो जो गाई ॥
तुज जन्म दिला त्याची स्वारी । लाखात शिपाई भारी ॥
बघ गरदी ही बुरुजाची तुजभवती । दगडांची त्याची छाती ॥
कळिकाळाशी झगडणार खंबीर । हे तुझेच हिरवे वीर ॥
जीवाच्या जळत्या जोती
आकाशी तारा होती
मोलाची माणिक मोती
त्या डोळ्यातो देवराया तुज पाही । करि आतां जो जो गाई ॥ १ ॥
दो दिवसांची ही दुनियेची वसति । सारखीच असती नसती ।
तुज ऐसा हा बाळ नऊ नवसाचा । हातचा कि रे जायचा ॥
हे देवाघरचे लेणें
नशिबाते देणे घेणे
कुणीतरी कुणास्तव रडणे
ती रडणारी रडतील धाई धाई । करि आता जो जो गाई ।

## ३१०

(रंग उडावतले)

रंग अहा भरला । सुबक भला । नाचत चंचल हा वर वरला ॥ धृ० ॥
भुलवुनि खुलवुनि हासत खेळत । भारुनि केले गुंग जिवाला ॥ १ ॥
हंसवी फसवी नटवी माया । शोभत बाई ज्याची त्याला ॥ २ ॥
बांधुनि नजरा जादुगारा । दाखविता हा खेळ कुणाला ॥ ३ ॥

## ३११

(जो पिया आयेना)

चतुरा चातुरी । तुमची न्यारी । भुलावणी खरी खुरी ।
परि भारी । जिव्हारी । दुधारी सुरी ॥ धृ० ॥ भोळा भाव भुलाया
टाकुनिया फांसा । केला डाव असा अवचित का हो खासा ।
हा देव पावला आज कुणाच्या नवसा । रुसला कान्हा काय
जिवाच्या रासा ॥ तुटली सारी । का दिलदारी । इतक्यावारी ॥ १ ॥

# भावबंधन

१८–१०–१९१९

## ३१२

[यमनकल्याण, ताल–दादर]

कठिण कठिण कठिण किती पुरुष हृदय बाई ।
स्त्री जाती प्रति झटता अंत कळत नाही ॥ धृ० ॥
रंगुनि रंगात मधुर मधुर बोलती । हंसत हंसत फसवुनि
हृदबंध जोडिती । हृदयाचा सुंदरसा गोफ गुंफिती ।
पदर पदर परि शेवटी तुटत तुटत जाई ॥ १ ॥

## ३१३

[राग–दरबारी, ताल त्रिताल]

जरठबाला । योग असा हा । भूस्तरी योग्य व्याकरणि तसा ॥
योग असा ॥ धृ० ॥ हिरा तइ दिसे उपवे मधवा श्वाने
तुलियेला ॥ १ ॥ न बालरवि त्या बुडत्या । विधुसि संमख चिर ठेला ॥ १ ॥

## ३१४

[राग–भीमपलासः त्रिताल]

स्त्रिया रणि बद्ध परिकरा । स्नेह बद्धशा प्रिय गमति नर ॥ धृ° ।
रंगक्रिडेमधि रमणीया ॥ क्रीडारंगी तेवी रुचिरा ॥ १ ॥
संसाराच्या खुलविती खेळा ॥ खेळाच्या नटविती संसारा ॥ २ ।

## ३१५

[बेहाग–पंजाबी]

सकल चराचरि या तुझा असे निवास ॥ धृ० ॥ पाषाणाच्या
असिसि जरी मूर्तिमधी । उपलहृदयि वससि खास ॥ १ ॥

## एकच प्याला

(२०-२-१९१९)

### ३१६

(राग-यमन, ताल-त्रिवट. चाल-ग्रेरी आली पिया बिन.)

लागे हृदयीं हुरहुर । अजि ।
सुखविषय गमति नच मज सुखकर ।। धृ० ।।
कांहीं सुचेना । कांही रुचेना ।
राहि कुठें स्थिर मति नच पळभर ।। १ ।।

### ३१७

(राग-बेहाग, ताल-त्रिवट, चाल-टेर सुनीपाये.)

वेध तुझा लागे सतत मनी । वसतिच केली नामे वदनी ।।धृ० ।।
जगत सकल सखि भासत त्वन्मय । मधुर रूप तव खेळे नयनी ।। १ ।।

### ३१८

(राग-भूप, ताल-एकताल, चाल-रतन रजक कनक.)

परम गहन ईशकाम । विश्वा जरी पुण्यधाम ।
मनुजा तरी गूढ चरम । चिर अभेद्य साचे ।। धृ० ।।
क्रीडा दैवी विराट । मनजसृजन क्षुद्र त्यात ।
मानुषी मनीषा! गणन काय त्याचे ? ।। १ ।।

### ३१९

(राग-भीमपलास, ताल-ते रे बलमा बलमा)

छळिती या हृदया अदया । भ्रांत मनोरचना कालगुणा ।। धृ० ।।
मातजीवना झिजवुनि जगती । अंती घेती तयासह त्या निधना ।। १ ।।

### ३२०

(राग-काफी, जिल्हा, ताल-त्रिवट, चाल-इतना संदेसवा.)

दहति बहु मना नाना कुशंका
विपद विकट घोर । निकटी विलोकी ।
मन कंप घेत । गणि ते ना विवेका ।। १ ।।

३२१

(राग–खमाज जिल्हा, ताल–पंजाबी, चाल–मैं तोसे नाही बोलोरे)

शंकाहि नाही काली ज्या । दुर्गति जने ये सदा
धूर्त कपटि अरि । जैसा रण करी
तेवि विद्या ही सदा ॥ १ ॥

३२२

(राग–शंकरा. ताल–त्रिवट, चाल–सोजानी नारी.)

संसारिं विषारी तीव्र सत्यें । अमृत होती । कृतिनें कान्त ॥ धृ० ॥
दिव्य रसायन । संकटातकी । सत्यपरिचयें । क्षणि असुखान्त ॥ १ ॥

३२३

(राग–भैरवी, ताल–पंजाबी, चाल–बाबुल मोरा.)

गुणगंभीरा । त्यजि न लव धीरा ॥ धृ० ॥
सत्त्वपरीक्षा महा । यदा परमेश्वर नियोजी ।
अवसाद तेव्हां उचित का वीरा ॥ १ ॥

३२४

(चाल–विडा घ्या हो नारायणा)

घास घे रे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।
भरवी यशोदामाई । सांवळा नंदबाळ घेई ॥धृ०॥
घेई कोंडा-कणी त्रैलोक्याचा धणी ।
विदुराघरींचा । पहिलावाहिला घास ॥१॥
पोहे मूठभरी । क्षीराब्धीच्या हरी ।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घास ॥२॥
थाळी एक्या देठी । घ्यावी जगजेठी ।
द्रौपदीचा । आला तिसरा घास ॥३॥
उरल्या उष्टावळी । फळांच्या वनमाळी ।
शबरी भिल्लीणीचा । घ्या हो चवथा घास ॥४॥
टाकून ओवाळून । मुखचंद्रावरुन ।
गोविंदाप्रजाचा । उरलासुरला घास ॥५॥

३२५

[राग–बिलावल]

वसुधातल रमणीय सुधाकर । व्यसनधन तिमिरी बुडविसी कैसा ॥धृ०॥
सुजनी जया परमेश सुखावे, नाशूनी त्या तुजसी मोद नृशंसा ॥१॥

### ३२६

(राग—अडाणा, ताल-त्रिवट, चाल-सुंदरी मोरी का.)

झणि दे कर या दीना। प्रेमजलातुर मृतशा दे जल ते या मीना ॥धृ०॥
वांछा तरी उपकारमधूच्या। या करि संतत पाना ॥१॥

### ३२७

(राग—गरुडध्वनि, ताल-त्रिवट, चाल-परब्रह्ममो रघु.)

ललनामना नच अघलवशंका अणुहि सहते कदा ॥धृ०॥
सृजनि त्याच्या विधि तरल घे विमल प्रकृतिसी पुण्य परम ॥१॥

### ३२८

(राग—जिल्हा मांड, ताल-कवाली, चाल-पिया मनसे.)

दयाछाया घे निवारुनीया, प्रभु मजवरि कोपला ॥धृ०॥
जीवनासि मम आधार गुरु जो। तोहि कसा अजि लोपला ॥१॥

### ३२९

(राग—तिलकामोद, ताल-एकताल, चाल-अब तो लाज.)

प्रणतनाथ । रक्षि कान्त। करि तदीय असुख शांत ॥धृ०॥
अशुभा ज्या योजि दैव। पतिलागीं, त्या सदैव।
परिणमवी मंगलांत ॥१॥

### ३३०

(राग—मांड-गर्मा, ताल—दादरा, चाल—गोकुलमा लई.)

मानस का बधिरावें हें ?। बघतसे खिन्न जगता ॥धृ०॥
गृहशृंखलाया। दृढ बद्ध पाया। बल ना भेद तया होता ॥१॥

### ३३१

(राग—खमाज, ताल—त्रिवट, चाल—सनक मुख विनुत.)

प्रणय जरि भंगला ! तरि नर जगता मुकला ॥धृ०॥
घोर निरयसम ! त्यासि विकट जग !
दीर्घ जीवित शापचि खरा तयाला ॥१॥

## ३३२

(राग–वसंत, ताल–त्रिवट, चाल–जपिये नाम जाकोजी)

गणिसि काय खल मातें, अलंकार केवळ कुजनांतें।
न विश्वासलव योग्य जयातें॥धृ०॥
वद का स्मरसी चिरसहवासी।
घडली कृति अनुचित या हातें।
जनकधर्म कधी त्यजि काय सुतें॥१॥

## ३३३

(राग–पहाडी–जिल्हा, ताल–केरवा, चाल–मान नाही सैंय्या.)

लोटु नका कान्ता। अशा दुरी कान्ता।
केवि जगें दीना मीना। जललवरहिता॥धृ०॥
हेंचि चरण माझे। जीवन जगतीं।
मृतचि गणा मज हे दुरी होतां॥१॥

## ३३४

(राग–काफी-जिल्हा; ताल-कवाली, चाल–कल मुझे कर.)

सत्य वदे वचनाला। नाथा। स्मरुनि पदांला या सुरविमला॥धृ०॥
वित्त परार्जित मानी विषसम।स्पर्शिन ना कधीं मी त्याला॥२॥

## ३३५

(राग–पहाडी-गज्जल; ताल–धुमाळी; चाल–दिल बेकरार तूने.)

कशिया त्यजू पदाला। मम सुभगशुभपदांला।
वसे पादयुग जिथें हे। मम स्वर्ग तेथ राहे॥
स्वर्लोकिं चरण हे नसती। तरी मजसि निरयवसती ती॥
नरकहि घोर सहकांता। हो स्वर्ग मला आतां॥१॥

## ३३६

(राग–बेहागडा' ताल-त्रिवट; चाल-चरावत गुय्या.)

जगी हतभागा। सुखि चिर असुख॥धृ०॥
जनके त्यजिता। लाधे दुसरा।
या विनाश त्या। माते जिधि विधि विमुख॥१॥

३३७

(राग–मालकंस; ताल-झपताल; चाल-त्याग वाटे सुलभ.)

सोडि नच मजवरी वचनखरतशरां।
दग्ध करिसी तये हाय। मम अंतरा ॥धृ०॥
स्मृति काय पूर्विचि। लोपली आजची।
केंवि तव मति रची। कल्पना भयकरा ॥१॥

३३८

(राग–बागेश्री; ताल-त्रिवट, चाल-गोरा गोरा मुख.)

मान भंग दाही। मृतशा हृदया ॥धृ०॥
दग्ध वल्लरी जाळी चंचला अदया ॥१॥
गतपतितांचे जीवन जगती वाया ॥२॥

३३९

(राग–कालिंगडा; ताल-दीपचंदी; चाल-छुपनापे रंग.)

बघु नको मजकडे केंविलवाणा, राजसबाळा ॥धृ०॥
ये देवा। आपुली ना करुणा।
तोंवरी समजुनी। वर्ते अनकाला ॥१॥

३४०

(राग–पहाडी–गज्जल; ताल-कवाली; चाल-खडा कर.)

असे पति देवचि ललनांना। तयासी अन्य भावना ना ॥
स्पर्शमणि वनितामान साचे। करित जे कांचन लोहाचे ॥
स्वपतिच्या अंगिच्या दोषा। गणिति गुण मधुर आर्ययोषा ॥
तयासह नरकयातनांला स्वर्गसुख मनिं समजति अबला ॥
असे जो प्रस्तर जननयनी। गणी त्या ईशचि तद्रमणी ॥
वसुनि त्या या देवानिकटी। ईशपद लभति सपति अंती ॥१॥

३४१

(राग–पहाडी-गज्जल; तालधुमाळी; चाल–दिलके तु हान.)

मज जन्म देइ माता। परि पोशिलें तुम्ही ॥
निजकन्यका गणोनी। न काहीं केलें कमी ॥धृ०॥
उपकार जे जहाले। हिमाद्रितुंगसे।
शत जन्म घेऊनी ते। फेडीन काय मी ॥१॥
सदया मानसि ठेवा। आपुल्या असे सदा।
उपकारबद्ध तनया। तुमची पदें नमीं ॥२॥

(राग—भैरवी, ताल-केरवा., चाल-गा गोरी ननदी.)

प्रभु अजि गमला मनीं तोषला ॥धृ०॥
कोपे बहु माझा। तो प्रभुराजा
आतां हांसला। मनीं तोषला।
मृतचि हृदय होतें नाथ, हे पूर्ण झाले।
परि वचनसुधेनें त्यासि जीवंत केलें॥
अमृतमधुर शब्दा त्या पुन्हां ऐकण्यातें।
श्रवणि सकल माझी शक्ति एकत्र होते॥१॥

## राजसंन्यास

३४३

(चाल—साजन होरे)

साजणि बाई। सजवी मजसि करि घाई
लगीन घडि जाई। वेळ आली भरा
देव आले घरा। करा चतराई॥१॥
साजणि बाई। नटुनि थटुनि लवलाही।
निघते अंगाई। राजराजेश्वरा
जवळि याहो जरा। बघिन मुख काही
साजणि बाई। चपळ पळत मन पदी
जवळि नच राहो। मंगलाचे सडे
टाकि चोंही कडे। दावि नवलाई

३४४

(चाल—वखते तुलख देख)

भासे जनात राया। हां मनात राया॥
नवखंड देह नटला। दिलदार एक राया
मागे सदा फिराया। भागे अनंत काया
लागे जिवास माया। लागे परी न राया
हाती अखंड भरला। इष्के शराब प्याला
नाही अजून प्याला। दिलदार प्यार राया

आजवरि पाहुनि वाट सुंदरा देह फिरे झुरला। जिवलगारे।।
डोळ्यांत प्राण बघ उरला
भरास आला खेळ-डाव हा कोणितरी उकला ।।
माझा डाव का हुकला
पुरती झाली सांज, कळप हा विसावत बसला ।।
तो वीर कुणीकडे फसला ।।
धरि धरि चाले थाट देवावर फुलावर चढला ।।
हा एक हार कां पडला ।।
बहरुनि आला चहुंकडे रंगरस झुकला ।।
माझाच मोगरा सुकला ।।
(चाल) कां पाडिसी देवा वज्रचुडच्याला तडा ।।
कुणीकडे उडाला मुद्रिकेतील तोडा
हरपला मणिच मग उदास नागफडा ।।
धरुनि भरवसा जीव ज्यावरती आजवर ठरला।
जिवलगारे। तो आज वायदा सरला ।।१।।

## प्रेमसंन्यास

३४६

( राग–भीमपलास, ताल–एकताल, चाल–देरेना. )

प्रणया नवरुचि देता। हा विरह रुचिर गमला।
विरह पीडिता। तृषित मना।
मजसम मधुपा तू गमसि कमला ।।१।।

३४७

( राग–तिलक कामोद, ताल–त्रिताल, चाल–जवहरी. )

सुखमय आशा। विधिने नाशा। निशिदिनिं छळिते।
घोर निराशा ।।धृ०।।
काव्य कल्पना। भुलवी भुवना।
अनुभव परि ये। अरसिक ऐसा ।।१।।

(राग भैरवी–ताल केरवा, चाल–अनाथके नाथ)

प्रभू प्रकटला। अता हंसला।
प्रेमिजनांचाउद्धार। निकटि दिसला॥ धृ० ॥
पाशगळी प्रेम सुमांचा॥
वास तया सौभाग्याचा।
या पुण्यकालीं बोल सखे मधु बोलां॥ १ ॥

३४९

(राग पहाडी–ताल केरवा, चाल–दाता हमरे)

ऐसा महिमा। प्रेमाचा।
मधुर भासला। खेळ सदा। प्रेमाचा ॥ धृ० ॥
प्रभु परि माझा। मग रुसतां
डाव उधळला। सौख्याचा प्रेमाचा ॥ १ ॥

३५०

(राग बिहाग, ताल केरवा, चाल–सखेरी बन)

रमवि नयनां। ही प्रभुलीला।
अमर कृतिला। त्या तुलना ना ॥ धृ० ॥
जादुगार चतुर भासला ॥
रमवी भुलवी। तो सहज भुवना॥ १ ॥

३५१

(राग पिलू, ताल केरवा चाल–तानीम तानीम)

सखये विसरुनि जगताला।
सेवू प्रणयाचा। सुरस प्याला। गाऊ प्रेममंगला ॥ धृ० ॥
वाहिन मी मम जीवाला। तव सेवेला।
तुज सुख देतां। मोद मजला ॥ १ ॥

## नारायण रामलिंग बामणगावकर

### आत्मतेज

### (१९२०)

३५२

[राग मांडवा–ताल केरवा]

लवकरि धाव रे लवकरि पाव रे हे कमलावरा मला ॥ धृ० ॥
दे मज थारा राया । मी किंकरी पाया ।
अति दीन धर्मजाया । तूचि तारि रे मला ॥ १ ॥

३५३

[राग जीवनपुरी–ताल–त्रिताल]

ती परम विमल सखि प्रशमा । अजि सुखवो मम नाथाला ।
त्वरित अरिरमण सहज दिसेल ॥ धृ० ॥ सुखद ती बुधपदा ।
नच इतरा कदा । वळेना क्षणी जरी ती । प्रबळ वीर नर तिज
धरोनी । रंजविती मधुनच बहु वदोनी ॥ १ ॥

# यशवंत नारायण टिपणीस

## शहा शिवाजी
१४–५–१९२१

३५४

(चाल–ठाडे मये)

सांडुनिया रिपुरुधिरा गे माते। न्हाणिन तव पदकमला। आणिन गृहिताता॥धृ०॥
विसर मना क्षण पडता। त्यागिन तनु इह जगता। गहिंवर तव मायेचा
स्फूर्ति जलधारा ॥ १ ॥

३५५

(चाल–देव तेथे विलसे)

देवता कामुकता रहिता। कां न होय कार्य वरद ॥ धृ० ॥
जी रुसते प्रेम रता। शांतकाल पाहता। कालगुणे कठिन
बने। धांवे निजबले परि हरि भया। निरामय करित ॥ १ ॥

३५६

(चाल–तोम तननन)

हा गगन पति तमारि दिनकर। अरुणधामि उधळित
किरण राशि ॥ धृ० ॥ जागी हो बघ उषा विराजत।
निजरमणा अरिदमना नियोजि। धावत नभि धमकावित
सत्ता मिरवित। क्लांत कांत शांताया ॥ १ ॥

३५७

(चाल–निरथको सब)

निरखिता सुखविते भाविका तीर्थ ते। वासना जाळुनि
शांतता अवतरे ॥ धृ० ॥ मुद्रा सदा शांत। प्रलय
तरि मन शांत। करणी किती शांत। प्रखर ते भय सरे ॥ १ ॥

३५८

(चाल--कवन सुख)

अमरपद पावे जो धर्म आचरित । आधार ध्रुव तोहि ॥ धृ० ॥
विधिनियम भंगिता । दोष ये धार्मिका । केविं नर नायका ।
मान्य व्हावे ॥ १ ॥

३५९

(चाल–अब रसीला प्याला)

खर विषाचा प्याला नरपति हा । नग जरि पय प्याला ।
अधमचि हरि प्राणा ॥ धृ० ॥ नृपति वचनि नर भुलता ।
मूढमति अंध होत । खल–कृतिला मग फसला । मुकतचि निज प्राणा ॥ १ ॥

३६०

(चाल–दां मोरा संख्या)

हा हृदयिचा जिवाचा झोला । झुलविता नवरंग सुखाला ॥ धृ० ॥
तोचि गडे मज त्रिभुवन भासे । झुलता जीव जिवाला ॥ १ ॥

३६१

(चाल–मिलजानाव)

जन्मा यावे । गुणवंता वरावे । प्रेमे एकरूप व्हावे ॥ धृ० ॥
तोचि मला तारिता । तोचि मला सावरिता । थोर पदां सेविता ।
पुण्यकाल ये ।

## आशा निराशा

(१९२३)

३६२

(कवाली, त्रिवट)

हजरत सलाम घ्यावा । मजला निकाल द्यावा । देवा ॥ धृ० ॥
बागबगिचा फळा फुलांचा । कोणी काय तुडवावा । देवा ॥ १ ॥
जोड बाळिचा दसलाखाचा । सागरात हरवावा ! देवा ॥ २ ॥
मायापित्याचा जीव जिवाचा । कालपाशि ग़ुजरावा । देवा ॥ ३ ॥

## ३६३

[राग पहाडी–ताल कवाली]

नाचत रसा रसिका । छुम छुम जलिं नौका ॥ धृ० ॥
प्रणयमहोत्सवी । ललित रागिणी । मिरवित प्रीति पताका ।
उधळीत मृदु कलिका ॥ १ ॥

## ३६४

[राग धानी, ताल–त्रिवट

मान्य कांत वरिला हा । रवि राज्य करित । मम मनिं
निशिदिनि तो हा ॥ धृ० ॥ धन्य हंसिका । मौत्तिक वांछित ।
खुलवि फुलवि शशि तारका ॥ १ ॥

## ३६५

[गझल ताल कवाली]

तात करीं दुहिता विनाश । बल द्याया वेगे । माते धांव गे ॥ धृ० ॥
अर्पुनि म्लान मुखी । चुंबनधारा । घे हृदयी फुलवी जिवाला ।
तव माया वेगे । माते धांव गे ॥ १ ॥

## ३६६

[राग पिलु ताल कवाली]

दिलरुबा हा या जिवाचा बाज साजिरा हमिरा हा ॥ धृ० ॥
पाखरा या । प्रेम गाया स्कंधी हृदयी दया ।
खुल्या दिलाचे पडदे खोला । कालि कालि या ।
गडे या – या ॥ १ ॥

---

# शिक्का कट्यार

४–६–१९२७

## ३६७

[राग–मियाचा मल्हार ताल–एकताल]

मधुप हा पिसा कसा सुवासा । कमलिनिपाशा फसे अधिरसा ॥
वांछिता विलासा ॥ धृ० ॥ हृदयी मदन संचरला ।
व्याकुळ करि जिवाला । तनु कापे थर थर थर ।
मनहंसा प्रणय सुख पिपासा ॥ १ ॥

३६८

[राग कर्नाटकी–ताल–त्रिवट]

ललना पाणिग्रहणा या जना । अलिंगना प्रियागंना ।। धृ० ।।
नजर गहिरि हनु गोजिरा । गाल लाल सजतहि संगरा
न्हाया जाया जना या ।। १ ।।

३६९

[राग जयजयवंती ताल–त्रिवट]

मंगल ते प्रियधाम । या मना । ममता निर्झर
मातृहृदय ते । चुंबचुंबिता ये अंगाई ।। धृ० ।।
वदन सुमांचा चुंबन मेवा । भान हिरावी । मोद माइना ।। १ ।।

३७०

[केरवा]

माता वचन दे सदा देशा । तुडवी परकीय पाशा ।।
राष्ट्रधर्म नव जीव शिवाचा । ऐक्याविना न आशा ।। धृ० ।।
हा महाराष्ट्र । जागा होई । ग्वाहि देत तुज माय भवानी ।।
स्वातंत्र्य साधाया देशा । ऐक्याविना न आशा ।। १ ।।

३७१

[राग सुदा कानडा–ताल त्रिवट]

तुझ्याविना भाव ना या मना । राजस माना कामुकता ना ।। धृ० ।।
मदिय प्राण उचित दान । प्रिया आस शमनि कां न ।। १ ।।

३७२

[राग बागेश्री ताल–त्रिवट]

घुमत ध्वनि कां हा । गे प्रणयिनी मम मनी ।
गा प्रिया जा राया । अमरपद घ्याया समरि या ।। धृ० ।।
नाचता पूर्वा जाया जिवाची । उधळि स्मितरंग करि गुंग ।
रविला प्रिय रणि न्हाया ।। १ ।।

३७३

[राग देसकार, ताल–झपताल]

सुखद जगि राजा । शास्ता बलवान् ।
जो झटत दिन रात । उचित जन काजा ॥ धृ० ॥
या रणी साह्यार्थ । ह्या बलि महाराष्ट्र ।
राजकाज तरवार । कां न यश मम ध्वजा । काजा ॥ १ ॥

३७४

स्वार्थी पसारा सारा जगी या । रवि चंद्र
तारा उडति त्या अमरा ॥ धृ० ॥ घनदाट
अंधार पसरे निराशा । झंजार वारा
न जिवा निवारा ॥ १ ॥

३७५

[राग भैरवी–त्रिवट]

पाहिन मी सखया जिवा या । वाहिन काया त्या झुलवाया ।
रिझविन प्रेम भरे मम हृदया ॥ धृ० ॥ रणि चमकला
राजस राया । शाहू छत्रपति ह्या या । नाचति
या वृत्ति प्रियासि गावया ॥ १ ॥

## नेकजातमराठा

३७६

[भीमपलास झपताल]

किती अधम गांजी जरी । देशसुत मान्यवर ।
कामिनिस तोचि खल ॥ धृ० ॥ वांछि रति कांचना ।
पात्र पति लांछना । नच सौख्य शांति या तेवि गरल ॥ १ ॥

३७७

[भूप–त्रिवट]

रति रमणा झुलवि फुलवनांत । हरवित पणात ।
हंसे –रुसे– फसे । लपुनि नवरसांत ॥ धृ० ॥
उचित कालि सखि आर्या । प्रीति सुमन गुंफुनिया ।
सहास्य वाहि जनांत ॥ १ ॥

[जय जय–नाट–झपताल]

तव काय हा पाश । भ्रमतां आकाश । मधुपा कामुकास ।
भुलवित अभिलाष ॥ धृ० ॥ वदनि या जलभास ॥ धृ० ॥
हा भुलत त्यास । तव श्वास मधुहास । रसिकास करि दास ॥ १ ॥

३७९

[राग गारा, केरवा]

या जिवलगा कुणाच्या लीला । खुलविला अनुराग कशाला ॥ धृ० ॥
वेधि गडे शर तव हृदयाला । मजवरि आळ न घाला ॥ १ ॥

३८०

[राग कानडी–काफी–ताल त्रिवट]

ना तुलना तव वचना । सफलता फुलता नता ललना ॥ धृ० ॥
मानिता मम भावना । त्यागिता इतरे जना । रवि किरण
प्रखर तर दिपुनि जात तव वदना ॥ १ ॥

३८१

[बहार–ताल त्रिवट]

कृतांत कां न वांछि या नरांतका मान्य
नरक लोकां ॥ धृ० ॥ नीच नराधम जिवा तारिता ।
ताप त्या नरा लोकी जगतां । क्वचित पापि उपकारा
वरितां । जाईन रौरवा कृतार्थ कां ॥ १ ॥

३८२

[झिंजोटी–त्रिवट]

प्रेम माया । जयवंत सहाया । वांछि स्वर्गवास जाया ॥ धृ० ॥
भाव प्रिया दाविता । नाथ तया साथ देतां । वारित त्या
संकटा । धन्य प्रेमी हा ॥ १ ॥

३८३

[मिश्रमांड ताल–रुपक]

ही आस या मानसा । प्रणयिनी प्रेमा कसा विकासा ॥ धृ० ॥
प्रेम भरे मन आत्मा । आराधीत । तुज गे सुहासिनी सखे ।
नको विसरूंया । लागे पिपासा दासा ॥ १ ॥



भाऊराव कोल्हटकर आणि चिंतोबा गुरव



'ललितकलादर्श'च्या शहाशिवाजी नाटकात, शं. ना. चाफेकर सईबाईच्या भूमिकेत



'जन्मरहस्य' नाटकात, कृष्णराव कोल्हापूरे आणि दीनानाथ



'साध्वी मिराबाई' नाटकात नटवर्य बंडोपंत सोहोनी (गिरोधर) सवाई गंधर्व (स्वामी दयानंद) आणि मा. अनंत दामले



बालमोहन–'स्वर्गावर स्वारी' नाटकात बापूराव माने (कयाधू)
पीतांबर गोरे, (प्रल्हाद)



'राक्षसी महत्त्वाकांक्षा' 'नाटकात केशवराव भोसले (मृणालिनी)
आणि पळणीटकर पेन्टर



'प्रेमशोधन' नाटकांत, जोगळेकर, बोडस आणि बालगंधर्व (किर्लोस्कर नाटकमंडळी) १९११



'अमृतसिद्धि' नाटकात गुळवणी, बालगंधर्व आणि नटवर्य लोंढे



आण्णासाहेब किर्लोस्कर




गोविंद बल्लाळ देवल



श्रीपाद कृष्ण कोल्हटकर



नाट्याचार्य खाडीलकर



राम गणेश गडकरी



स्वातंत्र्यवीर सावरकर



वीर वामनराव जोशी



य. ना. टिपणीस

## गोविंद सदाशिव टेंबे

### पटवर्धन नाटक

१९२४

३८४

प्रेम हे नितांत तुझें। केवि वानु मी अबला की श्रुति ही
विविध वचें स्तवुनि शिणली वा तुजला ॥ धृ० ॥
संकटि भार घेसि भक्तांचा राया। शिशुपाणि जासि भूक
दीन धेनु चाराया। असती सज्ज सदा प्रबल शत्रु माराया।
तुजला काय कठिण द्रौपदिसी ताराया। गोवर्धनासि सावरुनि
अंगुली दावि तव लीला। उद्धार हेतु धरुनि मनीं मम
वसन वेष्टिते तिजला ॥ १ ॥

३८५

तारिणी नव वसन धारिणी वात्सल्य हृदयि धरुनी
करिसि दया स्वजनी ॥ धृ० ॥ तळमळे अवघी प्रजा।
उत्सवी मग्न राजा साधितो शकुनि काजा। वैरिधर
भरिती स्वैरगती रमति। प्रजा जन फिरती रानी ॥ १ ॥
भूषविसि राज्ञी हरुनीया दीनापदा। होसि आदर्श सकल
स्त्रीजना। स्वजनहितकारिणी ॥ २ ॥

३८६

मितभाषिणी तीच कुलकामिनी। गृहिणी, रुचिर वच वदुनि
भूषवि, स्वकुल कुलाचार राखोनी ॥ धृ० ॥
केवि मिळे त्या जना मान्यता। अविनय ज्या वरिती वाक्पटुता।
कुलकलंकिनी ठरती वनिता मिरविती जरी सदाचार सांडोनी ॥ १ ॥

३८७

वैरि भुजंग विषारी। मुरारी कोण तुजविण सांग
निवारी ॥ धृ० ॥ द्यूतपाश पसरी दुर्योधन। त्यात
पडती पांडव अविचारी ॥ निंद्य मार्ग जरिनृप
आक्रमिती प्रजा सकलही तो स्वीकारी, अंध विचारी ॥ १ ॥

## ३८८

शांतवा हो मानसा । क्षोभ वाया करितसा । उमटला
का मनि ठसा । द्यूत लाविन गळफासा ॥ धृ० ॥
कां तृप्त झाली लालसा । । डौल मिरवुनी राजसा
केवि सुचलो अवदशा । धिःकारले सदुपदेशा ॥ १ ॥

## ३८९

मधुसुदन हे माधवा । हे चक्रपाणी पाणी सुरम्य सुदर्शन
सूर्य सुधाकर लोचना ॥ धृ० ॥ वसना विणोनी
शिणल्या सुरामा । सति रुक्मिणी ही तशी सत्यभामा
तव सिद्ध जाया मम रक्षणा । वैरी करिल तरि कृष्ण वदना ॥ १ ॥

---

# तुलसीदास

## १९-३-१९२८

## ३९०

नच पार नाद निधिला । विधितनया वीणा वाही, तरुनि जावया ।
पैलतीर परि ना दिसला ॥ धृ० ॥ ब्रम्हनाद नटवी गानकला
श्रुति पंचम जो, श्रुतिसि गोचरा ।
स्वरलेखनि जरि बांधिली तिला । हीननाद होई स्वरमाला ॥ १॥

## ३९१

रामरंगिरंगले मन । आत्मरंगी रंगले । रामरुप जाहले मन ॥
विशवरंगी रंगले । चित्त दंग जाहले॥ धृ० ॥ चरणि नेत्र गुंतले ॥
भृंग अंबुजातले । भवतरंग भंगले । अंतरंग दंगले ॥ १ ॥

## ३९२

प्रभुपदपंकजलीनां, कवीना । बंधन की स्थलकालहि
साहेना ॥ धृ० ॥ नच धाना, नच मंदांधा जनां । कविजन
मानी । सेवोनी राघव नाम सुधा करीती सुगाना ॥ १ ॥

३९३

परमगहन पाशां, विधिच्या कोण चुकवि । मनुज घेरि दुराशा । ध्रु० ॥ प्रणयपाश गळि पडला । जीव जिवा सांपडला । परिणय हा बंध परि उदयाला । गति दे अविनाशा ॥ १ ॥

## सं. वत्वंचना
१९२५
३९४

[राग– यमन कल्याण ताल–त्रिवट]

काया नमविली, सुखदशा चरण सरोजी, वनिकासुता ही धन अवगणुनी अधनधामीं धन्या रमली ॥ ध्रु० ॥ मलिन पंकी रुतले ते पंकज परि करि कमला चिर वसति कमलि ॥ १ ॥

# विट्ठल सीताराम गुर्जर

## नंदकुमार

१९२५

३९५

[राग—जिल्हा काफी, ताल—पंजाबी; चाल—चलो हटो बरया.]

चरित हा देवाच्या हृदया । मजला गणि जो गुरुसम वायां ॥ धृ० ॥
विपदि घोर हा मज जरि पाही । तरि ये खरता कृति परा तया ॥ १ ॥

३९६

[राग—यमन ताल—एकताल चाल—सैयां तुम बोल].

कुसुमा विधि चारुकांत । निर्मी आमोदशांत । परिनाशा त्या संगे कीटकासि मूढ सृजित ॥ धृ० ॥ अखिल भुवन भूषणा प्रेरिजगति नरवशासि । दनुज तया, का नकळे, नाशाया मग निर्मित ॥ १ ॥

३९७

[राग—पहाडी ताल—केरवा चाल—करम दिया मोरि]

भाग्यवती भुवनात ललना । तुजसम बहु धन्या दिसेना ॥ धृ० ॥
निरखोनि जया विश्वसुधा वरि । दे तुज तो स्वमना समाना ॥ १ ॥
चिर सहवासा घे रमणाच्या । निरवधि सुख सदना वरेण्या ॥ २ ॥

३९८

[राग—भीमपलास ताल—एकताल. चाल—लचक लचक]

तिमिर पटल भार विपुल करि वसुधा व्याकुळ हा ॥ धृ० ॥
अरुणोदय कान्त शान्त वांछि भुवन आर्त महा । अमर विभवि उदयाचलि त्या विलसे कृष्ण अहा ॥ १ ॥

३९९

[राग—दरबारी कानडा ताल—त्रिताल चाल—जानकीराम राजाकी]

मानसा या देहा । तुच स्वामिनी भुवनि एका ॥ धृ० ॥
जया तव करि दिले ते । हृदयचि चिरिसी हाते । ही कृति नेइल नरका ॥ १॥

[राग–करहृ प्रिया, ताल–त्रिताल, चाल–सीतापते भज.]

तारावया जन पातला हा । परि शल्यसा हो कुजनांस ॥ धृ० ॥
सुरनंदना सुखदा त्यजोनी । अघ सेविते नरकवास ॥ १ ॥

४०१

[राग–देसकार, ताल–त्रिताल चाल–सबरस आकर दे]

अवधि न भाग्य बलाते । द्वेषमात्रमलिनगात्र हृतललना अमरधिपा
मधरा ॥ धृ० ॥ योगे स्वाति समयी घनजले शुक्ति पुटी
जन्मती सतेजा मुक्ता प्रखरा ॥ १ ॥

४०२

[राग–भैरवी, ताल–त्रिताल, चाल–तुम जागे कौन]

नच मानसा आशा प्राणेशा । आता अन्या या ॥ धृ० ॥
विश्वमंगला प्रिय कृष्णाला साह्य करी मिळो प्रेमे आपुल्या ॥ १ ॥

## सदाशिव अनंत शुक्ल

### सत्याग्रही
१९३३

४०३

[राग–तिलंग, ताल–केरवा]

आनंदे विश्व रंगले । नारदा । आशा फुले जीव डोले ॥ ध्रु० ॥
शुभ बोला हा मला संजीवनीसा गमला । मृत जीवनी ह्या ॥ १ ॥

४०४

[राग–मिश्रपिलु ताल–त्रिताल]

बाळा । कां रुचला अबोला ?
सुचत कसा नवलाचा चाळा ? ॥ ध्रु० ॥
हांसवी नाचवि ह्या जीवा । हृदयिच्या राजिवा ।
सोडुनि रुसवा बोल सुधेच्या मंजुळ बोला ॥ १ ॥

४०५

[राग–पिलु मिश्र ताल–दुमाळी]

कुठे गुंतला ? देवा । कशि नाही लवहि करुणा ? दयाळा ॥ ध्रु० ॥
सत्याग्रही बाळ हा । तपोनिधीच महा ध्रुवबाळासि
दर्शन द्या ह्या काला ॥ १ ॥

४०६

[वसंत त्रिवट]

ॐ नमो भगवते वासुदेवाय ।
मंत्र सोपा जपा मोक्ष दायी महा ॥ ध्रु० ॥
योग याग खर तपादि । विफल सकल ह्या उपाधि ।
भक्तियोग सहज साधि । मुक्ति लाभ जगति हा ॥ १ ॥

## सिंहाचा छावा

८-१-१९२७

४०७

(चाल–ललना लाडकी)

चतुरे । बोल ना मधु बोल फुलांचे प्यारे ॥ धृ० ॥
शृंखला प्रेममाला । प्रेमी जिवाला बांधायाला ।
दिव्य धरि बळा अबला प्रेमला । जग रंगवि प्रेम सारे ॥ १ ॥

४०८

(चाल–प्रेम दे नितांत तुझे)

आई गे । प्रशांत मने देई तू निरोप मला ।
समर मार्ग शौर्यधना सुखद स्वर्गसम झाला
तुजविन पायि गर्व सर्व शत्रु शौर्याचा
रडविन धाई धाई वैऱ्याना साचा
मिरविल डौल वृथा काय पुत्र पार्थाचा ।
नच मी अजाण बाळ, जाण काळ काळाचा
माया ममता आवरुनी दे शुभ आशीर्वादाला
रणांगणांत जायाला वीर पुत्र तव सजला ।

---

## सौभाग्य लक्ष्मी

१९२५

४०९

[राग–पिलु, मिश्र, ताल–केरवा]

गोजिऱ्या कळ्या–फुलानो ।
का असा उगाच रुसवा अबोला वृथा ?
का स्पर्श पापी विधवेचा ?
भाव अमंगळ खुल्या दिलाचा ?
ओसरली का तेजोगंगा ?
भ्रष्ट काय झाला ? सांगा नको मौनता ?

४१०

बोल हांसरे । बोल प्यारे
बुलबुला । विषाद का रे ?
भावना भंगून जाता
जीव मेला ह्या जगाला
मोह –माय– पाश आतां
तोडिले भवबंध सारे
दैव दुष्ट सदैव छळतां
आज होत अखेर ही ।
चालले टाकून तुजला
राजसा, निरोप दे रे ।

## साध्वी मिराबाई
(८–२–१९३०)

४११

[ भीमपलास–त्रिवट ]

रुचिरचि हा ल्याले भक्तिभाव–शुभ–गुण–मणि अलंकार ॥ धृ० ॥
प्रभुला पुजिले या मन मंदिरीं । तन मन धन पदिं वाहिलें ॥ १ ॥

४१२

( राग–बागेश्री–धुमाळी )

त्राता प्रभु सकलांचा । हा अंतरिचा साचा दृढ भाव
निरंतरचा ॥ धृ० ॥ नच जिवास आसरा । प्रभुवाचुनि दुसरा ।
घेताचि स्वजनांचा तो भार शिरीं सारा ॥ १ ॥

४१३

( राग–पिलु, मिश्र–ताल कवाली )

व्रिजलाला गडे पुरवी हृदयिची आस ॥ धृ० ॥
वाजिव श्री हरी । मंजुळ बासरी । पाजिव शांति सुधा जीवास ॥ १ ॥

४१४

( भैरवी–ताल दादरा. )

असार पसारा शून्य संसार सारा । हा प्रभूराजा जिवासि
एक निवारा ॥ धृ० ॥ मज निरोप द्यावा ठेवुनि प्रेम भावा ।
सकल चरणी माझा हा नमस्कार घ्यावा । सफल जनन झाले,
सेविलें सौख्य सारा ! प्रभु चरण विलीना जाहली आज मीरा ॥ १ ॥

## वामन गोपाळ जोशी

### राक्षसी महत्वाकांक्षा

२०-९-१९१३

४१५

[ नई जोबनवालीका मजा लुटा ]

मी नवबाला जोगिण बनले ।। जोगिण बनलें ।। जगा विसरलें ।।
जगा विसरले ।। सुखा विसरले ।। मी नव० ।।
यौवनही नच गणिले हाय ।। धृ० ।।
परमात्मा वल्लभ शोधाचे । पिसेंच भरलें ।। जगा० ।। "
सादुनि अवघे मार्ग सुलभ या । प्रेमाच्या वाटे अनुसरले
थोर प्रीति बल योग मांडिला । साहस प्रेमे हे आदरले ।। २ ।।

४१६

लावि चटक गुण गाना ।। यशपाना ।। धृ० ।।
रसविभवा नव । अनुदिनी दावी ।।
करि ही लोलुप रसना ।। १ ।। यशपाना०
दिव्य गुणामृत । सेवुनि प्रीति ।
होई यौवन लीना ।। २ ।। राग पाना०

४१७

[ छागयो तेरे नयनोमे राम-मांड दादरा. ]

भान हरी हा । मोहि नयना मना ।। धृ० ।।
जिकोनि अबला, तनु रोम रोमी । सत्ता बलाने,
विहार करी हा ।। १ ।। मोहि नयना मना ०
नयनात खेळे श्रवणात बोले । हृदयात डोळे प्राण सखा हा ।।
मोहि नयना मना ।। २ ।।

४१८

[ छब दिखला जाय ]

सुख विलया जाय; लागे हाय मना
चैन पडे नच जीवा या ॥ धृ० ॥
जाता पति– क्षितिज धरया ॥
दूर पळत नच हातीं ये ॥
काय करू ? किती धावू ! बहु श्रमाने शिणली
ही काया ॥ १ ॥

४१९

(भीमपलास–झपताल)

प्रेमगानी सतत रमलि ही बालिका ॥
प्रेम–भवना–चरण दूर करवेल का ? ॥ धृ० ॥
"जीवास आधार ॥ रवि पद महोदर ॥
नलिनी प्रणयाकुला ॥ विरहि विसरेल का ?"

---

## रणदुंदुभि

(१९–२–१९२७)

४२०

[ "अब छोडोना पराई कान्हा." ]

परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला ॥
सजिवपणी घडती सारे । मरण भोग त्याला ॥ धृ० ॥
असुनि खास मालक घरचा । म्हणती चोर त्याला ॥ १ ॥
सौख्य भोग इतरा सारे । कष्ट मात्र त्याला ॥ २ ॥
मातृभूमि त्याची त्याला । होत बंदिशाळा ॥ ३ ॥

४२१

[– देक्ता कामुकता रहिता. ]

आपदा राज–पदा भयदा ॥ नृपति काम भोग निरति ॥ धृ० ॥
लोपुनिया चिरसुखदा ॥ दिव्य शील संपदा ॥
पापरता । पामरता ॥ माते, नरपति —
शिरि अरि सदा महा भया धरित –॥ १ ॥

## ४२२

[ गझल "नियामत सखे आई है." ]

जगी हा खास वेड्याचा । पसारा माजला सारा
गमे या भ्रान्त संसारी । ध्रुवाचा 'वेड' हा तारा ॥ धृ० ।
कुणाला वेड कनकाचे । कुणाला कामिनी जाचे ॥
भ्रमाने राजसत्तेच्या । कुणाचे चित्त ते नाचे ॥ १ ॥
कुणाला देव बहकावी । कुणाला देश चळ लावी
कुणाची नजर धर्माच्या । निशेने धुंदली भारी ॥ २ ॥
अशा या विविध रंगाच्या । पिशाच्या लहर बहरींनी ॥
दुरंगी दीन दुनियेची । जवानी रंगली सारी ॥ ३ ॥

## ४२३

[ तिलक कामोद–एकताल–"परमपुरुष नारायण" ]

वितरि प्रखर तेजोबल । करि जन समरनिरत ॥
हरूनि दयाल मोहजाल ॥ धृ० ॥ करूनि दया ।
ने विलया । हा स्वदेश नाश काल

## ४२४

[ यालकंस–झपताल–कृष्ण मुखचंद्र" ]

दिव्य स्वातंत्र्य रवि आत्मतेजोबले ॥
प्रगटता अवनितलि कोण त्या लोपवी ॥ धृ० ॥
शौर्यसागर–लहरि गगन–मंडळ महा ॥
भेदिता कवण त्या अबल कर थोपवी ? ॥ १ ॥

# न. चिं. केळकर

## कृष्णार्जुन युद्ध

### ४२५

( मांड–केरवा )

गाढ झोप घेसी करूणाधना । सोडि तियेते ॥ धृ० ॥
स्थापुनि अहिशिरी । विश्वकटाहा । पेटविले कलि कालानी ॥
घना । सोडी जलाते ॥ १ ॥

### ४२६

( सिंध भैरवी–एक्का )

हे अति नवल होत । कल्पांती श्रुत न दृष्ट ॥ धृ० ॥
शेष बघे उडु गगनीं । शिरि तारा धरि धरणी ।
हिम पेटवी गिरी पडता । ग्रासि शिशुसि माता ॥ १ ॥

### ४२७

( जिल्हा–त्रिवट )

हरिला ज्ञणि वदा । जी मम अपकीर्ति हो जगीं ती ॥ धृ० ॥
सुज्ञ तुम्ही या नणंदा जावा । मुठित ठेवता नवऱ्या भावां । मग न
कलह कां मिटला जावा ॥ १ ॥

### ४२८

( जिल्हा–केरवा )

अंत न लागे तव कवणाहि । वेड जगासि लाविसी पाही ।
प्रेम द्वेष तुला सम असती । खेळ खेळण्या दोही ॥ १ ॥
लीलाप्रिय तू उपहासाच्या । बुडविसी मूढा डोही ॥ २ ॥

—★—

## नरहर गणेश कमतनूरकर

श्री

(३-१२-१९२६)

४२९

सखि मुखचंद्र भ्रांत न करो मनासी
खर पाप तेंही वचनांही वमाया ॥ धृ० ॥
कुवचा विधाता शिकवील कैसा
विधु किरणिं तमभाव होईल कधीं काय ॥ १ ॥

४३०

[ कर्नाटकी दुर्गा–एकताल ]

पाणी दानीं प्रेरणा करी । सति शुभ रामा ।
सुमनपाशि करि नरासि या सुबुद्धसा जगासि ॥ धृ० ॥
देवदूति प्रिति गमते अवतरतां ॥
कांचनगुण घावयास आयसास
वधुवरासि स्पर्शकालि ॥ १ ॥

२३९९३
२१६६२

४३१

[ राग–तिलकमोद, ताल–एकताल ]

दैव देत नवा घाव ॥
अंधार सभोंवार । तयात असु घे ठाव ॥ धृ० ॥
अभिजात अभिमान, परघरिं बंदिवान
अपमान नसे सान । हा विचार घेत प्राण ॥ १ ॥

४३२

[ गझल ]

मम बंधु सखा शून्य जगीं एक असावा । नच अन्य दिसावा ॥
आशाहि झरे, जीव झुरे, धीर न राही । जाई मति तोहि ॥
मन भ्रांत वरी, देहि तसा अग्नि जळावा । मज मृत्यु दिसावा ॥
विश्राम कुठे पाहू ऐशा डोहिं जातां । विश्वास कोण होत
दुजे आतां । कर देऊनिया देव गुणे पार करावा ॥
मज मुक्त करावा ॥ १ ॥

४३३

[ राग–बिहागडा : ताल–झपताल ]

आधार संसारिं दिनरात श्रीकांत
आल्हाद हाति मग होत काही । धृ० ॥
शंका सुखाची व्यसनांत येते
साधे समाधान केविं नाही ॥ १ ॥

४३४

[ राग–अडाणा ताल–त्रिवट ]

पशुमात्र खचित गणला । निजधामी हा तसा
जुपला जन । तनमनबंधन साधुनि सेवेला ॥ धृ० ।
जरि विचारधन हरण होत नित । मानव राक्षस
बनत अदयसा । भया, नया, कदा, नच स्मरत

४३५

[ पहाडी–केरवा ]

कठोण कठोण जीवमान । दयाधना ॥ धृ० ॥
तुझ्या दयेची मला साऊली ।
पतीच्या स्वरूपे राखि प्राण ॥ १ ॥।

४३६

[ काफी ,त्रिवट ]

आशा हांसे, नाचे, माते गगनांगणी नेते ॥ धृ० ॥
उदयकालीचे रंग नवलपर
हरघडि नव जग मन बघतें ॥ १ ॥

४३७

[ सूर मल्हार–त्रिताल ]

महिरत जीवाला छंद वेला । भाव विरघळे
नव मद येता ॥ धृ० ॥
मादक तर धन मोह येता । आत्मभाव
नच राहो । ध्यास भास वश । पाहतें मन
मादक प्रतिबिंबाला । १ ॥

२-४-१९३१

४३८

[ रागेश्री–त्रिताल ]

निशामय कालिं या पर्दीं । काल–सदन–गत सकला आशा । प्रलय वन्हिचा होम पेटला ॥ धृ० ॥ भाव सुखाचा तव आगम हा, मानसि लागे भययुत तळमळ ॥ १ ॥

४३९

[ सुहा सुगराई–त्रिताल ]

तमांध झाला, भ्रमला हा, ज्ञानदीप हतबला घ्यावा ॥ धृ० ॥ मळवितो विमलशा कुलयशा बंधु कसा, हाच भाव मूढ करी जीवा ॥ १ ॥

४४०

[ भीमपलास, त्रिताल ]

नच लघुता तारानाथ स्मरतचि वितरित सम समाधान ॥ धृ० ॥ पाहुनिया कृति आज आपुली करितिल जन यशोगान ॥ १ ॥

४४१

[ नद, झपताल ]

उदित नव तारा आकाशि या होत
जीव विसावा, नयना निवारा ॥ धृ० ॥
हृदया परी ताप तत्कांति देते
विनय करि नियता विचारा ॥ १ ॥

४४२

[ अडाणा–झपताल ]

सोडिला प्रखर शर । बोल अधम हा तुझ गमत । मति कुटिला कशाला वरिसी रे ॥ धृ० ॥ परि मशक जैसा बघतसे तनुवरी । वच मी गणितसे भय ना खरे ॥ १ ॥

४४३

विष–फला कां हट्टाग्रहे ग्राहिसी अंगी
सुमनी ग्रहण तव कुतुहल ॥ धृ० ॥
विमल भालि चारु प्रभा
विकला करिसि तियेसि
जा–भय मच का? ॥ १ ॥

४४४

[ भूप त्रिताल ]

पाश तुटे । हा । होता अभिनव बोध मज लाभ ॥ धृ० ॥
धरणि प्रमुदिता वाटे माता । काय बाहि जणुं अंकि घ्यावया ।
निज कर देत मज आज ॥ १ ॥

# नारायण सीताराम फडके

## युगांतर

७-२-१९३१

४४५

(यमन-एकताल)

जनमानस मंदिरात । विलसो रुचिरा प्रशांत ।
मति स्वयंप्रकाशावती । मंगला युगान्तरांत ॥ धृ० ॥
कुल साधित वैभवात । न दिसो महति कुणास ।
धृति सेवा, कृति गुणांही । लाभो प्रभुला जनात ॥ १ ॥

४४६

(काफी-त्रिताल)

ललना दिसे सुप्रभाती । नयना तुझ्या दर्पणांती । अलकांचिया पाशा
धरिता मृदू त्या हातीं ॥ धृ० ॥ हसत मुखी ती सन्मुख राही । लाजुनी
वाटे पाही । १ ॥

४४७

(पटदीप-अपताल)

अधिर मन बावरे, घेइ आंदोलनें। विविध भावांवरि प्रेम शंका गुणें ॥ धृ० ॥
दयित हृदयांतले अणु जरी लाभलें। स्थल, विसावेल मन। कान्त गुणचिंतनें ॥१॥

४४८

(काफीदेस-एकताल)

किती सुखकर हा भास। हृदयातर करि उलसित। जाय
विसरूनि सकल ताप मनिचा । हा गोड प्यास ॥ धृ० ॥ भ्रमचि
रूचिर वाटत हा। जागृति विषसमचि गमत। मीलन जह
होत मधुर । जाय विरूनि ॥ १ ॥

४४९

(मांड-एकताल)

घेई विहंगसम भरारि मानस हें भारी ॥ धृ० ॥
उन्मादक गीताचे । छत सुंदर पसरावे ।
वाटे या क्षणि मनास । मन वेडे नाई ॥ १ ॥

४५०

पदपंकजाते प्रभुच्या वरोनी । मिळतो विसावा भयशंकित।ते ॥ धृ० ॥
नृपति नृपांचा परमेश साचा । क्षणि देह अभया शरणांगताते ॥ १ ॥

## विनायक दामोदर सावरकर

### संन्यस्तखङ्ग

१९-९-१९३१

४५१

(चाल–न पयाम आता है)

समयी सखा नये । मी जात फसुनि आता गे ।
बघत वाट थकले । मी दारि बसुनि आता गे ॥ धृ० ॥
मानि ना आता गोडी गुलाबी पुन्हा । सख्याशीं मांडिले
मी युद्ध रुसुनि आता गे ॥ १ ॥ गाठ होताचि या । शत्रूकंठि
पाश हा । अलिंगनाचा । फेकीन कसुनि आतां गे ॥ २ ॥
ईति जा सांग । आलात जा तसेची । प्रिया रडवीनची ।
मी हंसुनि हंसुनि आतां गे ॥ ३ ॥

४५२

(चाल–आंखोने तेरे गममे)

शत जन्म शोधितांना । शत आर्ति व्यर्थ झाल्या । शत सूर्य मालिकांच्या ।
दीपावली विझल्या ॥ १ ॥ तेव्हां पडे प्रियासी । क्षण एक आज गाठी ।
सु साधना युगांची । सिद्धीस अंति गाठी । हा हाय जो न जाई
मिठी घालू मी उठोनी । क्षण तो क्षणात गेला । सखि हातचा सुटोनी ॥ २ ॥

४५३

(चाल–मैं मनको फसिया)

सुकतातचि जगिया । जरी कीं । फुलें गळत पाकळी ।
उमलति ना त्याही । कलिका ज्या ॥ धृ० ॥ परंतु सुंदर कळ्या
पाकळ्या । फुलती जगि या । विसर ना हे वैतागी । तुझिया ॥ १ ॥

४५४

मर्म बंधातली ठेव ही प्रेममय
ठेंव जपोनि सुखाने दुखवीं जीव ॥ धृ० ॥
हृदयांबुजीं लीन लोभी अती हा
मकरंद ठेवा लुटण्यासी आला
बांधी जिवाला सुखाशा मनीं ॥ १ ॥

४५५

रतिरंगी रंगे ध्यान
रंगवी तरंगा
वांछिला प्रेमसंग
परि होय मनोभंग ॥ धृ० ॥
विकचदल सुमनांग
भ्रमरीस सुखसंग
विपरीत परि दैव
परि होय रसभंग ॥ १ ॥

# नारायण विनायक कुलकर्णी

## संत कान्होपात्रा

१९-११-१९३१

### ४५६

[ अभंग ]

जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥ १ ॥
बहु भुकेला झालो । तुमच्या उष्टयासाठी आलो ।
चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्टयासाठी । २ ॥

### ४५७

[ अभंग राग-पिलू ]

धाव घाली विठू आता चालू नको मंद । बडवे मज मारिती ऐसा
कांही तरि अपराध ॥ १ ॥ जोडुनिया कर चोखा विनवितो देवा ।
बोलला उत्तरी परि राग नसावा ॥ २ ॥

### ४५८

( राग-परदीप, ताल०त्रिवट, चाल-करीमा कर्माकरे )

पति तो का नावडे । जो मान्यशा मिळावी यशास ॥ धृ० ॥
कीर्ती जाया । प्रीती वाही । त्या कोपे परिहास ॥ १ ॥

### ४५९

[ अभंग- राग धानी, ताल-भजनी ठेका ]

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥
जाईन गे माये तया पंढरपूरा । भेटेन माहेरा आपूलीया ॥ २ ॥
सर्व सुकृताचे फळ मी लाहीन । क्षेम मी देईन परब्रम्ह ॥ ३ ॥
बाप रखुमादेवी वरा विठ्ठलाची भेटी । आपुलीया सेवेसाठी येऊनि राहे ॥४॥

## ४६०

(राग–तिलक कामोद, ताल–एकताल–चाल–मनमे मोहन विराजे)

नुरले मानस उदास । गुंगवि ध्यान प्रभूचे । पदकमली वास
रुचे ॥ धृ० ॥ पुलकीत काया सदा । अ सुख सकल होई नाश
भवभय गेले लयास ॥१॥

## ४६१

(राग–तिलंग, ताल–त्रिवट,चाल–तदियना तारेदानी)

अशी नटे ही चारुता । सतनु काय विसरुनि स्मृति ।
वरित सार्थता ॥ धृ० ॥ नयनि तरलता, नाचत खेळत ।
विभवि नव दिसत हास्य लयास ॥ १ ॥

## ४६२

(राग–बहार, ताल–त्रिवट, चाल–तुतु बाहु दे सवा)

शर लागला तुझा गे, बघ जिव झाला वेडा पिसा । हा ।
॥ धृ० ॥ जडे गडे तव ठायी आस । देई गोड चुंबनास
मधुरशा ॥ १ ॥ नको अशी तरि राहू दूर । बाहुपाशि सौख्य सार । मृदुलशा ॥ २ ॥

## ४६३

(राग–भीमपलास–एकताल, चाल–बन्सीधरके चरन)

देवा धरिले चरण । भक्ति सुगति जागे मजला । भाव बोल
रुचवि कोण ? सकल तुज विभो मान ! ॥ धृ० ॥
सान थोर जीवांसि । रक्षितोसि हृशीकेशी । अचल तुझ्या
पदी दीन । भय नुरवी होत लीन ॥ १ ॥

## ४६४

(अभंग, राग–झिंजोटी, ताल–केरवा)

पतित तूं पावना । म्हणविसी नारायणा । तरी सांभाळी वचन ।
ब्रीद वागविशी जाण ॥ २ ॥ याति शुद्ध नाही भाव ॥ दुष्ट आचरण
स्वभाव ॥ ३ ॥ मुखी नाम नाही । कान्होपात्रा शरण पायी ॥ ४ ॥

४६५

(राग–ललत, ताल–केरवा)

दीन पतित तू अन्यायी । शरण आले विठाबाई ॥ १ ॥
मी तो याति दीन । न कळे काही आचरण ॥ २ ॥
मज अधिकार नाही । भेट देई विठाबाई ॥ ३ ॥
ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ॥ ४ ॥

४६६

(राग–भैरवी, ताल–केरवा)

अगा वैकुंठीच्या राया । अगा विठ्ठला सखया ॥ १ ॥
अगा नारायणा । अगा वसुदेव नंदना ॥ २ ॥ अगा पुंडलिक वरदा । अगा विष्णू तू गोविंदा । अगा रखुमाईच्या कांता ·
कान्होपात्रा राखी आता ॥ ४ ॥

# वसंत शांताराम देसाई

## विधिलिखित

६–४–१९२८

४६७

(राग–यमन, ताल–रुपक, चाल–कैसे जाऊ घरा)

कोकीला रमवी त्या ऋतुराज श्रवणा। तिज रसिक दिसला।
भुलली श्यामला ॥ धृ० ॥ ललित भुवनी। गमत मजसी।
अरसिकांनी रसिक बाणा दुखविला ॥ १ ॥

४६८

(राग–गरूडध्वनी, ताल–त्रिवट, चाल–शरण पदा)

ताराया दीन अबला या। दूरित प्रबल पापभार दशावतार वरिले।
तेही काय वांया ? ॥ धृ० ॥ सुबल वरिल अबलताच माना।
प्राप्त अभय तिज नित्य भूतली। असुरदमन छळितां तिला,
स्वपद नाश वरिला। सार्थ सार्थ माया ॥ १ ॥

४६९

(राग–मिश्रकाफी, ताल–केरवा, चाल–राधेकृष्ण बोल.)

प्रेमभाव बोल विमले। याचनेस बोल सरले। काल हा अमोल ॥ धृ० ॥
भक्तिभाव मनी ठसला। नितदीन दास तुज भजला। विनविता आज
पदकमला। नच मनिचा प्रेमा फोल। विमले ॥ १ ॥

४७०

(राग–अडाणा, ताल–त्रिवट, चाल–गगरीरी भरून)

धरि धवल यशाचि मम धाम। तोची खलबले हरियेला,
कलंक लांछन कुलशीला ॥ धृ० ॥ कंप घेत जणू सांप्रत
धरणी। तिमिर चंड ग्रासित सकला ॥ १ ॥

४७१

(राग–मांड, ताल–दीपचंदी, चाल–ठाकूर तव)

सांप्रत मज त्याजिले कां ? देवा ! फिरत कसे जग हे, ग्रह
ते फिरता। तरी थारा तव पदी घाता ॥ धृ० ॥ विधि शासन
जगी चुके कुणाला। मनुजा तूची विसावा ॥ १ ॥

४७२

(राग–सोहोनी, ताल–त्रिवट, चाल–जोबन मदकर)

नंदनवन फुललें । त्यांत रमले, कुठे लोपले ।। धृ० ।।
विरह ज्वाला । पेटल्या या । दाह करिती जणू दैव कोपले ।। १ ।।

४७३

(राग–दुर्गा, ताल– त्रिवट, चाल–छबिले छेल छे ले)

अखिल स्त्री जनांना । लोकीं । बंधुभावनी नित गणी भगिनी तयांना ।। धृ० ।।
मानावे मजला । बंधु नव खरा । असे विनति पदान्विता ।। १ ।।
प्रेमा त्या कसला । स्वार्थ नच शिवे । सुखा वितरि जनांतरि ।। २ ।।

---

## अमृत सिद्धि

२६–१०–१९३३

४७४

(राग–भीमपलास, ताल–झपताल, चाल–खानदोरे)

तूंचि दिव्यांगना : भारिसी जीवना ।। धृ० ।। तव हा मुखचंद ।
उदित मम मंदिरी । जणु भाग्यपूर्णेंदु । जिवाचा उरेला ।। १ ।।

४७५

(राग–जिल्हा पहाडी, ताल–कवाली, चाल–फुलमंगावे)

गांजिसी वाया दीन जना या । जीवन मम तव छाया ।। धृ० ।
नयन–तरंगी जीव तरंगे । नाचत डोलत ही काया ।। १ ।।
अधरसुधा ती अमृत भासे । प्रेमपिपासा शमवाया ।। २ ।।

४७६

(राग–पिलु, ताल–कवाली, भजन)

तुमबिन मेरी कोन खबर ले । गोवर्धन गिरिधारी रे ।
मोरमुकुट पितांबर शोभे । कुंडलकी गत न्यारी रे ।। धृ० ।।
खडी सभा मो द्रौपदी ठाडी । राखो लाज हमारी ।
मीराके प्रभु गिरिधर नागर चरणकमल बलहारी रे ।। १ ।।

४७७

(राग–दुर्गा, ताल–केरवा)

पायोरी मैंने रामरतनधन पायो। वस्तु अमोलिक दीजे मेरे सद्‌गुरू।
कृपा करी अन पायो ॥ १ ॥ जनम जनम की पुंजी बांधी।
जगमे सभी खो वायो ॥ २ ॥ सतकी नाव खेवटीया सद्‌गुरू।
भवसागर तर आयो ॥ ३ ॥ मिराके प्रभ गिरिधर नागर।
हरख हरख जस गायो ॥ ४ ॥

४७८

(राग–शंकरा, ताल–त्रिताल, चाल–जियामे बसेरा)

कटु योजना ही। विधिवी। अजि साहू कैसा।
मज बल ना ॥ ध्रु० ॥ रतिसम कांता। जरि संसारी।
रतिसुख नाही। हीच दुष्ट घटना ॥ १ ॥

४७९

(राग–भीमपलास, ताल-त्रिताल, चाल-'कवन गये'.)

गमते सदा मजला। द्वारका वंद्य। प्रभुच्या पदांबुजें जगीं जो होत
धन्य ॥ ध्रु० ॥ भासती ती मूर्ती बघतां। हा त्यजोनी।
स्वर्गीचे जणं सिंहासन। प्रभराज। अवतरला ॥ १ ॥

४८०

(राग–नंद, ताल-झपताल, चाल-'धुंडाबान')

धन्य तूचि कांता। गमसी करिता क्षमा कांता ॥ ध्रु० ॥
नवजन्म घेतां। त्वदीय सहवास लाभो। दुजी न वांछा ॥ १ ॥

४८१

(राग–लोहरची पहाडी, ताल-केरवा, चाल–'मोदन करत')

धावत येई सख्या। यदुराया ॥ नातरी महिमा जाईल विलया ॥ ध्रु० ॥
वध आचरिला। धर्म जगी मी। शिकविलासी जो।
तूचि कास ा ॥ १ ॥ जरि शासन मज। लाज तुला ती।
बीद राख नेज। समयी अशा या ॥ २ ॥

४८२

(राग–मालकंस, ताल–त्रिताल)

प्रगत भयो भगवान। प्रभुजी। नंदाजीके घर नौबत बाजे।
टाल मृदंग और तान। प्रभुजी ॥ १ ॥ सबही राजे मिलन आये।
छांड दिये अभिमान ॥ २ ॥ मीरा के प्रभु गिरिधर नागर।
निशिदिनी धरि जे ध्यान ॥ ३ ॥

४८३

(राग–बागेश्री ताल–एकताल, चाल–'कमल कोमला')

धवल लौकिका। मलिन करित मम जनता ॥ धृ० ॥
विमला मम कांता। जी जगता दे शुचिता। पतियश नाशिल ती का ॥१॥

४८४

(राग–जैजे वन्ती, ताल–त्रिताल, चाल–'सबर नहीं')

लहरी अतां। सखाच्या। करिती तनू रोमांचिता ॥ धृ० ॥
सदनी येतां। जिवलग सखया। रमणि मनी ये। हीच प्रफुल्लता ॥१॥

४८५

(राग–भैरवी, ताल–त्रिताल, चाल–'कान कुंवर')

हो समज तव कुटिल चतुराई। विदित झाली। आज नाथा । धृ० ॥
मजसी अबोला। धरुनी लटका। मनधरणी मीच ती करावी।
ह्रा तव हेतु। उचित नच आतां ॥ १ ॥

४८६

(अडाणा–ताल–त्रिताल, चाल–'आई करकरा')

कांता वंचिता निज पतिला संसारी। कठिण खड्ग न्याय करिल।
अजि करि धरित । धृ० ॥ सदनीं काय वैन्यांना।
देई ठाव कुलांगन ॥ कुलांगारिणी ती पतिता ॥ १ ॥

## प्रल्हाद केशव अत्रे

### उद्याचा संसार

४८७

वेड लावी ती जिवाला बालिका,
उरि शलाका टोंचते ती, तारका।
अप्सरा ती गोड ग.णीं
गात नेई मज विमानीं,
स्वर्गिचा लागे रुपेरी उंबरा,
तोंच मारी मस्तकी ती, ठोकरा !

४८८

जगाचे बंध कोणाला। जगाचा बांधला त्याला।
मला जो थांबवी ऐसा, जगीं निर्बंध ये कैसा ?
जगाने देह हा केला, जगाने वाहिले त्याला,
हाणा मारा, खुडा तोडा, परी आता मला सोडा !
न कीर्तीला न प्रेमाला, न सौख्याला, विलासाला,
न विघ्नाला न मृत्यूला, मला ये आडवायाला
पुरे संबंध प्रेमाचा, नको हा खेळ प्रेम.च',
मिळे ज्या प्रितीचा त्याला, विषारी तो असा मेला।

४८९

लग्नाची बेडी

ती पाहताच बाला। कलिजा खलास झाला।
छातीत इष्क भाला, कीं आरपार गेला।
स्वर्गातल्या पऱ्यांना की वस्त्रगाळ करुनी
कमनीय देह विधिने, रचिला तिचा छबेला।
लावण्य काय सारे, उकळोनि वा पिळोनी
त्या मस्त अत्तराव', भरला गमेचि बुधला।
डौलांत चालता ती, हत्ती वनांत झुरती
रस्त्यात गुंड जमती, तिज अन पहावय.ला।

४९०

चकोरा, मीच तुझी चंद्रिका
धरितोस मग का, बोल कुशंका ?
नाच पाखरा मिजासखोरा !
पसरुनि तुझा पिसारा !
भुळवि जिवाला नाजुक नखरा !
होय तुज्याविण जीव घाबरा !
टोचति या मनि विरहशलाका !

४९१

प्रिय न कवण तुजसमान !
असशी ना तूच प्राण !
प्रणयगंध करित धुंद !
भुलवित या जिवाला !
तूच दिव्य बाला !

४९२

भाग्यसूर्य नाशुनि तिमिरा !
गमत उदयाला आला !
सकल कामना सफला !
मनिच्या या होति पूर्ण !
भ्रमनिरास झाला !

---

वंदेमातरम

४९३

बाजे नभीं चौघडा ! धडधडा।
गगनीं तिरंगी फडकत झेंडा ॥ ध्रु. ॥
समरसमय हा वाजत डंका
मायदेश तुज मारित हांका
झुलत आघाडीस हा जरिपटका ॥१॥

## जग काय म्हणेल

२३-३-१९४६

४९४

हासरा चंद्रमा ।
उधळित मधु स्मितचंद्रिका वाटे
नयनि या तारका ।
वेधिती जिव हा सारखा ।
फुलतसे वदनि मनोहर काय मोगरा

४९५

ललना देवता जगाची, भूषवि संसाराला !
नभी जशी चंद्रिका हासरी तारका
स्त्री तेवि जगताला !

---

## पाणिग्रहण

११-१०-१९४८

४९६

उगवला चंद्र पुनवेचा ।
मम हृदयी दरिया । उसळला प्रीतिचा ॥
दाहि दिशा कशा खुलल्या
वनीं वनीं कुमुदिनि फुलल्या
नववधू अधिर मनीं जाहल्या
प्रणयरस हा चहुंकडे वितळला स्वर्गिचा ॥

---

३-१-१९७१

४९७

किती पांडुरंगा वाहूं, संसाराचा भार ?
लक्ष चौऱ्याऐंशीची नको आता येरझार
लोखंडाचे गुणदोष, बघे का परिस
लेंकराची कासावीस, माहीत आईस ?
पाण्यामाझी तूंच देवा, तारिले पाषाण,
ब्रीद तुझें दीननाथा, पतितपावन !
कठीण तो मायापाश, सुटेना कोणास,
कपाळीचा टळेनाही; कोणा वनवास !
अनाथाचा नाथ, तुला बोलतात संत
'तुका' म्हणे माझा । श्रीकृष्ण विसावा
वाटे न करावा । परता जीवा ॥ ४ ॥

४९८

देह देवाचें मंदिर । आंत आत्मा परमेश्वर ।
देव देहांत देहांत । काहो जातां देवळांत ?
जशी उसात साखर । तैसा देहांत ईश्वर ।
जैसें दुधामध्यें लोणी । तसा देहीं वसे चक्रपाणी !
तुका सांगे मुढ जना । देहीं देव का पहा ना ।

४९९

कृष्ण माझी माता । कृष्ण माझा पिता
बहिण बंधु चुलता । कृष्ण माझा ॥१॥
कृष्ण माझा गुरु । कृष्ण माझा तारूं
उतरी पैलपारू । भवनदीची ॥ २ ॥
कृष्ण माझें मन । कृष्ण माझें जन
सोयरा सज्जन । कृष्ण माझा ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा । श्रीकृष्ण विसावा
वाटे न करावा । परता जीवा ॥ ४ ॥

---★---

## श्रीधर विनायक वर्तक

### आंधळ्याची शाळा

१-७-१९३३

५००

तू माझी अन् तुझा मीच ही खातर ना जोंवरी
प्रीतिची हूल फुकट ना तरी
गालाला पडते खळी मला पाहुनी
ही नजर पाहाते धरणी न्याहाळुनी
भयभीत प्रीत थरकते लीन लोचनी
ओठांची थरथर पाकळी बोल गडे झडकरी
प्रीतिची हूल फुकट ना तरी
जिवाजिवांची अभंग जडली जोड असे ही जरी
भीति मग कोणाची अंतरी
ही गाठ भिडेची तात गळ्या लाविल
हिरव्याची पिवळी पाने ती होतिल
प्रीतिच्या फुलांचा वास उडूनि जाइल
फसाल पुरत्या बसाल गाळित घळघळ अश्रुझरी
प्रीतिची हूल फुकट ना तरी ॥

५०१

एकलेपणाची आग लागली हृदया
घनदाट दाटली विषण्णतेची छाया
तडफडे जिवाचे पाखरू केविलवाणे
होत ना सहन त्या एकलकोंडे जगणे
जोडीस शोधिते उदात्त अमुल्यावाणी
प्रतिशब्द जिवाचा न दिला अजुनी कोणी
गुम्फीत कल्पनाजाला गुणगे
गुरफटुनि त्यात जिवाला टाकणे
रंगीत स्वप्नसृष्टीला उठविणे
ही स्वप्नसृष्टी पटतसे जिवाला वेड्या
ही सुवर्णलंका दिपवित अवघी हृदया
जरी इंद्रजाल हे जाल कधी विरुनिया
एकलेपणाची आग लागते हृदया

## विश्वनाथ चिंतामण बेडेकर

### ब्रह्मकुमारी

१५-६-१९३३

५०२

मधु मीलनात । या । विलोपले । स्मर भाव काय विलोल हे ? ॥धृ०॥ सखि बोल जी हो कामना करु सार्थ त्यासह यौवना । प्रणयान्विता । दे अन्यता ॥१॥

★
★★
★★★



स. अ. शुक्ल



वसंत शांताराम देसाई



आचाय अत्रे



मो. ग. रांगणेकर



विद्याधर गोखले



पुरुषोत्तम दारव्हेकर



वसंत कानेटकर



भास्करबुवा बखले



रामकृष्णबुवा वझे



वसंत देसाई




जितेंद्र अभिषेकी



हिराबाई बडोदेकर



सरस्वती राणे



मीनाक्षी



सुहासिनी मुळगावकर



अनंत दामले–'सुवर्ण तुला' (नारद)



'मदनाची मंजिरी' मध्ये प्रकाश घांग्रेकर आणि कान्होपात्रा.

## मोतीराम गजानन रांगणेकर

### कुलवधू

२२-८-१९४२

५०३

क्षण आला भाग्याचा । आला सौख्याचा ॥ हांसत मोदें
नाचत नादे, हे मन माझें ॥ मंगल दिन हा ॥धृ०॥
प्रेममया जीवनिया । जरी राहिलें रंगुनिया ॥
आला । उदयाला । बहराला । मंगल दिन हा ॥१॥

५०४

मन रमणा । मधुसूदना । मुखि राहो माझ्या प्रभो । हे नाम सदा ॥धृ०॥
आठविता रे गोकुळीच्या । बाळ लीला । आनंदे नटला जीव हा ।
येईल कारे काळ ऐसा । दिव्यतेचा । द्याया सौख्य पुन्हा ॥१॥

५०५

बोला । अमृत । बोला । शुभसमयाला गोड गोड ॥धृ०॥
दिपले पाहुनिया देवही हर्ष भरे
ढाळुनिया सुमनें वदती । धन्य धन्य धन्य ॥१॥

### अलंकार

२३-१-१९४४

५०६

मधुर वचना मी मुकलें कां जगी ॥
सुखमय जीवन न कळे कधि का ।
येईल भाळी ॥ धृ० ॥
अखिल जन्म शिणवुनि ही काया ।
मधुर बोल श्रवणी नच येती ।
केवि अभागी ललनाजाती ॥

५०७

अधनाही शोभेना ऐसी दीन
भावना । विटले मन वघुनिया
मलिन हृदया ॥ धृ० ॥
जरि ना वैभव लाभे मनुजा ।
अर्पियली विधीनें हृदयीची संपदा ।
लाजविल जी भूपतीला ॥ १॥

## वहिनी

२४-१२-१९४५

५०८

पांखरा । जा । त्यजुनिया प्रेमळ शीतळ छाया ॥
पसरले विश्व अपार पहा ॥ धृ० ॥
भेदुनि गगनाला । बघुनि ये देव लोक सारा ।
पिउनि अमृत, घेउनि संचित । परतुनि ये घरा ॥१॥

५०९

ललना कुसुम कोमला । होई अकारण हृदयी व्याकुल
साहिल कधि का ऐशा कृतिला ॥धृ०॥
जन्मजन्मांतरीं धरुनि ही आस अंतरी ।
जीवन कटू हें मधुर मानिते । मातृहृदय ना तुला ॥१॥

## तुझं नी माझं जमेना

५१०

रुसली राधा, रुसला माधव, रुसलें गोकुळ सारें ।
कुंजवनीं लतिकाही रुसल्या, तरुवरि जणुं अनुरागें ॥धृ०॥
किति काळ असा धरुनि अबोला
कोणी वदावें आधीं नकळें ! रुसलें गोकुळ० ॥१॥

## एक होता म्हातारा

५-९-१९४८

### ५११

ये झणी ये रे। येरे। येरे। माघारी ॥
क्षणभर वळुनि, बघ मम नयनीं, मूर्ति अपुली।
कुठवर एकली वाट पाहू। तुजविण राहू।
विसरुनि जाशिलही।
नवथर प्रीत खुली।
जा घेउनिया संगती रे हे मन वेडें ॥ धृ० ॥
तळमळले नयन तुझे जरि मजला कधी पहाया।
सुखविन तुजला। नकळत रे राया। येउनिया
स्वप्नी तुझ्या सखया ॥ १ ॥

### ५१२

छंद तुझा मजला। कां मुकुंदा लावियला ॥
अशी कशी रे मी। भुललें सांग तुला ॥
संसारी माझ्या। माझ्या ॥
येउनि कां ऐसा। ऐसा।
केला घात पुरा पुरा। पुरा पुरा।
कां असा रे घननीळा ॥ धृ० ॥
कशासि झाले सासुरवाशिण।
उठता बसता तुझेच चिंतन।
कुणा म्हणू रे मम स्वामी। मम स्वामी।
नकळे मी। जों वरी तू मनि माझ्या ॥ १ ॥

### ५१३

नाच हृदया आनंदे। मिरवित अपुले भाग्य हें ॥
शुभदिन मंगल हा।
उधळित आला। अमर सुखाला।
दशदिशा पहा फुलल्या ॥ धृ० ॥
उडूनिया देव लोकी। जाउनी सांगा सकलानां
भाग्यवती जरि आज कोण कोण मज ऐशी। सांगा।
त्रिभुवनी देवा ॥ १ ॥

५१४

हांस, हांस रे । हृदया, तुज केंवि हांसवू ? ॥
गाऊ कुणा संगीत मी ।
हांसू अतां कुणा सवें मी ।
तुज आता कसें आळवू ? ॥ धृ० ॥
सरलें सुख काय आज रे । प्राक्तनि अपुल्या ॥
उधळलि पूजा माझी । प्रीतिची कुणी रे ।
नकळे तुज केंवि शांतवू ? ॥ १ ॥

## कोणे एके काळी

१४-१-५०

५१५

दे मज देवा, जन्म हा ।
भासे जरी मी पतिता कुणा ॥ धृ० ॥
असुनी कलंकित अंतरी आपुल्या ।
मिरविती कां हें व्यर्थचि कुलशीला ॥ १ ॥

५१६

कां रे ऐसी माया । कान्हा लाविली मला ॥
क्षणभरी सोडूनि दूर तुला ।
राहिना कसा जीव पहा । का रे सांग राजसा ॥ धृ० ॥
किती समयी जरी झाला अबोला ।
जडतो का तरी छंद तुला हा ।
ना जाणे कशी वेल्हाळा । झाली वेडी राधिका ॥ १ ॥

# नागेश जोशी

## देवमाणूस

२५-८-१९४४

५१७

सुखवीत या संसारा, जगती मेळ जिवाचां प्यारा ।
हृदय ना जरी मिळतां हृदया, जात खचित प्रीति विलया ॥

५१८

छळी जीवा दैवगती अती ॥ धृ० ॥
शिरीं घाली घाव कुठार ती
शशि-सूर्य गगनिं प्रकाशती
परि राहु-केतु त्यां ग्रासती
जन जगी तशीं, दुःख साहती ॥ १ ॥

५१९

चांद माझा हा हांसरा, नाचवी कसा प्रेमसागरा
प्रीतलहरी ये भरा ॥ धृ० ॥
गुण कनकाच्या नव कोंदणीं गे
शोभसी सखे, तूं हिरा ॥ १ ॥

५०२

दिलरुबा मधुर हा दिलाचा
छेडित राग गोड प्रीतिचा ॥ धृ० ॥
करित साथ, संसार-संगीता
नाद सुखद तव हृदयाचा ॥ १ ॥

## ह. वि. देसाई

### अर्ध्या वाटेवर

५-५-१९४५

५२१

रंग उधळले, खेळ खेळले
मनिचे भाव रंगले हृदयीं दीप उजळले
क्षणभरी विश्व नाचलें
परि दे काय जाहलें
नकळे सांगू मी कुणा, कुणा, कुणा
फुलला चोर नभी तेजाळ हंसत मनी
लज्जित रजनी उभी निजरुपा ती बघुनी
तेजगुणी, चंद्रमणी, उजळी दिशा मोहवी वसुधा ही
निशा अशी अधिर मन बावरे पुन्हा पुन्हा

५२२

मानसींच्या या मंदिरी लाविल्या ज्योती
उधळित कोणी सांग ही सुमनांची रास !
मंद मंद दिपविल हा प्रणयाचा दीप
चालू आम्ही पथ हांसत नाचत
घालुनि प्रेमे हात गळा
राहू दे दुनिया मागे, जाऊ चल ग पुढे
गाठुंया तें शिखर आमुचे वेगे वेगे !

## गो. ल. आपटे

### सं. देहू रोड

१९४०

५२३

सखि भावगीत माझे तुजसाठीं गायिले
तू नाहि ऐकियेले !
हृदयांत वेदनांची सरिता अखंड वाहे ।
तीरीं तिच्या बसोनी तुजसाठी गुंफियेले
तू नाहि ऐकियेले ।
सौंदर्य नाटकांचे नव तेज चंद्रिकेचे ।
उकलोनि मृदुकरांनी तुजसाठीं दावियेले
तू नाहि ऐकियेले ।
गेले सखे विरोनी ते गीत अंतराळी
परि त्याचिया स्मृतीने होतात नेत्र ओले
तू नाहि पाहियेले ॥

५२४

गातो नाचतो आनंदे
वेडा झालो मी तव छंदे
गाई ओविया पंढरिचा देव
आमुचा तो जीव पांडुरंग
आतां दृष्टीपुढें ऐसऐसाचि तू राहे
जो मी तुज पाहे पांडुरंग ॥
तुका म्हणे माझा सखा पाडुरंग
गाउं गाऊं गोड हरिचे गीत ॥

# विद्याधर गोखले

## सुवर्णतुला

१०-१०-१९६४

५२५

उजळित जग मंगलमय अरुणबिंब आलें
सोनेरी किरणांनी भू-मंडळ न्हालें ॥ धृ० ॥
देव हा प्रकाशमान
त्यास देति मुनिहि मान
अर्घ्यदान मंत्रगान करुनि शांत झाले ॥ १ ॥
नलिनी-दल-आलिंगन
त्यजुनि भृंग करि गुंजन
कुंज कुंज मोहरले वन-विहंग बोले ॥ २ ॥
रविराया पूजाया
काय फुलें होउनियां
गगनीचे तारां-गण धरणीवर आले ? ॥ ३ ॥

५२६

पारिजात फुलला ! अंगणीं पारिजात फुलला
बहर तयाला काय माझिया प्रीतीचा आला ॥ धृ० ॥
धुंद मधुर हा गंध पसरला
गमलें मजला मुकुंद हंसला
सहवासातुर मदिय मनाचा कणकण मोहरला ॥ १ ॥

५२७

रागिणी-मुखचंद्रमा
उजळि हृदयीं पूर्णिमा ॥
कोपतां खुलतो कसा
वदन-शशिचा लालिमा । ! ॥
रूप बघुनी लज्जिता
होति पूर्वा-पश्चिमा ॥

## ५२८

येतिल कधिं यदुवीर—सखये !
मानस होत अधीर ॥ धृ० ॥
कटु वदलें मी, रुसवा केला
म्हणुनि जिवाचा जिवलग गेला
सोडूनि हें मंदिर ॥ १ ॥
विरहाचा वैशाख तापला
शांत सुशीतल चंद्र लोपला
कोठें धीर समीर ? ॥ २ ॥

## ५२९

तुजला वंचियलें श्रीहरिनें ।
कपट तयाचें नाहि उमगलें ॥ धृ० ॥
लटकी माया, प्रेमहि लटकें ।
साच तुला तें मृगजळ गमलें ॥ १ ॥

## ५३०

रतिहुन सुंदर मदन–मंजिरी ! मदनाचें वरदान तुला ॥ धृ० ॥
ललित कोमला तव सुंदरता लाजविते मंदार–फुला !
बघुनि तुला गगनांत खंगते कले कलेनें चंद्रकला
कळे न मजला, वृथा फुलाचा, नाद कशाला हवा तुला ॥ १ ॥

## ५३१

गगनमणि सूर्य हा
रजनीपति चंद्र तो
एक निमिषांतरी
सहज तो निर्मितो
तोचि विश्वंभर । विश्वाचा आधार
करि दैन्य दूर । नारायण
देव नारायण । दयेचा सागर
होतसे साकार । भक्तांसाठी ॥
देतसे भक्तिला । मुक्तीचा सोहळा
भावाचा भुकेला । भगवंत ॥

## ५३२

फुलला मनीं वसंत बहार
मुनिवर्याच्या कृपा प्रसादे नुरला चिंता भार ॥ धृ० ॥
उदासवाणा शिशिर संपला
वासंतिक मधु गंध पसरला
धुंद निनादे चैतन्याचा मनिं पंचम झंकार ॥ १ ॥

## ५३३

नारायण । नारायण ।
नाम तुझे अति पावन ॥ धृ० ॥
कमलपति कलम नयन
भयहारण – भवतारण — नारायण
तूं धरती तूच गगन
तूच आप तेज पवन
तू स्थिति लय–रजनी–दिन
तूच कार्य तू कारण – नारायण ॥ १ ॥

## ५३४

धीर धर भामिनी । ठेव श्रद्धा मनीं ॥ धृ० ॥
सत्वरी भेटेल श्रीरंग यदुमणि
सफल मन कामना करिल गुण – शालिनी
प्रकट होईल गे सौख्य मंदाकिनी ॥ १ ॥

—★—

# पंडितराज जगन्नाथ

## ५३५

सावन–घन गरजे; बजायें
मधुर मधुर 'मल्हार' ! ॥ धृ० ॥
चमचम नाचे उसकी सजनी
छेल छबेली नार. . . !
इंद्र– धनुषका मोर– मुकुट सिर
सावन– घन घन– शाम चढायें ।
गोरी गोरी बिजली गोपी
अपना सुंदर रुप दिखायें ।
शहनाई बन– पवन बजायें,
करे मयूर पुकार ! . . .
हरियाला सावन मन– भावन्
बरसे अमृत– धार !. . .

५३६

मदनाची मंजिरी ॥ धृ० ॥
साजिरी । उषाच हंसरी ॥
चंद्रिकाच कोंवळी । काय ही नाजुक चांफेकळी ? ॥ . . .
गुलाब या गालीं, केतकी कांतिमान भालीं ।
रुप-यौवनानें बहरली बाग वसंतांतली ! ॥
रसिक मनोहारिणी घटीं या रसिक-चित्त भरुनी--।
कुरंग- नयना कुठें आजला गज-गमना चालली ? ॥ . . .
उरोज कुंभापरी रम्य हा कुंभ शोभतो शिरीं ।
सुधा-कुंभ घेउनी येई का रंभा वसुधातलीं ? ॥ . . .

५३७

नयन तुझे जादुगार ॥ धृ० ॥
हरिणीचा हरिती नूर ।
त्यांत सुंदरी कशास
काजळ हें घातलेंस ? ॥
साधाही नयन-बाण
विंधितसे काळजास ।
मग त्याला कां उगाच
कालकूट माखतेस ? ॥

५३८

जय गंगे भागीरथी ! हर गंगे भागीरथी ॥ धृ० ॥
जयजयकारें तुझ्या मंगले !
दुमदुमलें अंबर-धरती ! . . .
उदक नव्हे, तव उदारताची
अखंड वाहे या जगतीं ! . . .
परम दयाळे ! महन्मंगले !
देई भक्ताला मुक्ती ! . . .
जय गंगे भागीरथी ! जय गंगे भागीरथी !

## ५३९

## मंदारमाला

अहीर भैरव– त्रिताल

जय शंकरा ! गंगाधरा !
गिरिजावरा, गौरीहरा !
विपदा हरा, शशिशेखरा
विष प्राशुनी जगतास या
दिधली सुधा करुणाकरा ॥

## ५४०

(देसकार – त्रिताल)

जयोऽस्तुते हे उषा-देवते !
देवि दयावति महन्मंगले !
रुचिर–यौवना रुप सुंदरा
जगन्मोहिनी अरुण रंजिते !

## ५४१

(तोडी– एकताल)

'सोऽहम' हर–डमरु बाजे
उसके सुर तोलों के
सुखकारक झूले पर
झूम रहे सरिता-सर
भुवन-त्रय साजे . . .
डमरु–ओंकार नाद
परमेसरका प्रसाद
उसकेही महिमास
गिरि-कंदर गाजे . .



'कट्यार काळजात घुसली' या नाटकांत वसंतराव देशपांडे, बालकराम आणि प्रसाद सावकार



'मंदार माला' नाटकांत राम मराठे आणि प्रसाद सावकार



ज्योत्स्ना भोळे



'पंडितराज जगन्नाथ' मध्ये मामा पेंडसे (शहाजहान) मंगला संझगिरी (लवंगिका) आणि भालचंद्र पेंढारकर (जगन्नाथ)



'जयजय गौरीशंकर' मध्ये भालचंद्र पेंढारकर आणि राम मराठे



'साध्वी मीराबाई' मध्ये सुरेशबाबू माने व हिराबाई बडोदेकर



▷ 'सुवर्णतुला' नाटकांत प्रसाद सावकार आणि जयमाला शिलेदार

★



'मृच्छकटिक' नाटकात छोटा गंधर्व आणि रजनी जोशी

## ५४२

[मिश्रखमाज– रुपक]

तारे नही, ये तो रातको
आतिश भरे मेरे आहूने !
हैं लिख दिया आसमां पर
तेरे सितमका माजरा ॥
ओ गुल्‌बदन् जादूनयन !
फूलोंसे नाजुक तन् तेरा !
फिरभी तेरे नयनोंने क्यौ
घायल् किया जियरा मोरा ? ॥
ओ गुलबदन् जादूनयन् !
कभि कहके कुछ पछताये हम
कभि रहते चुप पछताये हम ।
इकही नतीजा ये हुवा–
उलझनसे मेरा दिल भरा ॥
ओ गुलबदन, जादूनयन !
तुझे क्या खबर हैं ओ बेवफा
आँखो कि हो तुम रोशनी ।
लग जा गले से नाजनीं
दिलभी तो रोशन् कर जरा ॥
. . .ओ गुलबदन जादूनयन ।

## ५४३

[सिंध भैरवी केदार]

'बुझावो दीप ऐ सजनी ।'
यही है प्यारका पैगाम ॥
जलनवाले चिरागोंका ।
सुहाने रातमे क्या काम ? ॥
सजनी, आज मिलनकी रात ॥ धृ० ॥
एक चंद्रमा गगनमें चमके
एक हमारे साथ ।
करत नैन मदभरे तुम्हारे
अमृतकी बरसात ॥
गुंज रही है मनकि कोयलिया
मीठी मीठी बाते !!
" फिर न कभी आयोगी ऐसी
मधुर सुहानी रात ! " ॥

५४४

[बसंतबहार–एकताल]

बसंतकी बहार आयी
तरुबर, बन–बेलरियाँ
फूल रही डालरियाँ
मोर बोले, ' कोयलिया
ना–बहार छाई '
कलियनसे भंवरा सेले
घुंघटका पट खोले
कली कली मुसकाई
रंग रंग सुख पायी !

५४५

[मिश्रपिलु – केहेरवा]

हरी मोरे जीवत प्राण – अधार
और आसरा नाही तुमबिन तीनो लोक मजार
आपनिना मोसे कछु न सुहावे निरख्यो सब संसार
मीरा कहे मैं दासी बावरी दीज्यौ मती बिसार

५४६

[जोगकंस – त्रिताल]

कोण असासि तू नकळे मजला ।
तू गंगेची अथांग शुचिता
की जननीची माता ममता ?
कोण असासि तू नकळे मजला ॥
भाविकतेची मंगलगाथा
उदार चरिता अमर देवता
नवा जन्म तू मजला दिधला
काय वदू तुज नकळे मजला ॥

५४७

[ हिंडोल – त्रिताल ]

तारिल हा तुज गिरिजा शंकर ।।
भव चिंता हर मदन–गर्व हर
चंद्र कलाधर नट–राजेश्वर
करील विजयी तुला महेश्वर

## मदनाची मंजिरी

५४८

मजला कुठे न थारा मजला नसे निवारा ।
करिते क्षणा क्षणाला दुर्दैव ेर मारा ।
निष्प्रेम जिविताची नौका बुडून गेली
संसार सागरी या ना सापडे किनारा
वीणेवरी मनाच्या आघात जाहलासे
मांगल्य भावनेच्या गेल्या तुटून तारा !

५४९

मानिनी । सोड तुझा अभिमान ।। धृ० ।।
रूप संपदा दो दिवसाची
यौवनासवे सरावयाची
तिने धुंद होउनी करिसी का प्रणयाचा अपमान ?
चिरंजीवनी प्रेम भावना
दूर करी जी मलिन वासना
मान लववुनी तिचा करी गे, सखये तू सन्मान

५५०

अंतारिल तुज अंबिका कशाला धरिसी मातें शंका !
शंकर मन रंजिका हरितसे भव पतक पंका !
दयावती जी सहज उद्धरी, हीन दीन रंका
कळि काळावर जिचा धडधडा झडे विजय डंका

५५१

अंग अंग तव अनंग खुलवि मदन–मंजिरी
देवदूत याचितात सुखद–संग माधुरी ।। धृ० ।।
मंद मंद हसित–लसित
वदन प्रणयरंग सदन
रूपरंग बहर तुझा कहर करी अंतरीं. . . . .
तव यौवन रंगदार
चाल तुझी डौलदार
जादुभरे नैनबाण हरिति प्राण सुंदरी. . . . .

५५२

ये मौसम रंगीन रंगीन शाम
सनम्ने दिया जो मुहब्बतसे जाम ।। धृ० ।।
जादूभरी लुत्फे मय् क्या कहूँ ?
हुये हाय तेरी नजरके गुलाम !
हमें आसमाँसे है आया पयाम
खुदा मेहरबाँ है, न सागरको थाम
ओ मीनाकुमारी ! तुझे है कसम
पिलाके भुलां दे ये दुनियाके गम
बहुत प्यास है, और जवानी है कम
जुबाँ पे है दिलदार तेराहि नाम !
सफरमे न आयेगा ऐसा मुकाम ।
करते फरिश्ते है झुकके सलाम

५५३

ऋतुराज आज मनि आला, ऋतुराज आज वनि आला ।। धृ० ।।
नव सुमनांचा, नवकलिकांचा बहर घेउनि आला !
कुंज कुंज अलि–पुंज गुंजने बघ झंकारित झाला !
सुरस रागिणी नव प्रणयाची कोकिळ छेडत आला !
नवथर सुंदर शीतल निर्झर त्यात रंगुनी गेला ।!

१४–८–६६

५५४

सप्त सूर झंकारित बोले गिरीजेची वीणा
'जय परमेश्वर, गौरीशंकर; जय गौरी–रमण ॥ धृ० ॥
भक्तिरसाची निर्मळ गंगा
वदे खळखळा धवल–तरंगा—
'जय गंगाधर ! गिरिजा–रंगा !
जय मंगल–सदना ॥
शंकर–डमरू डम बोले—
शिव–रंजिनि । गिरिबाले !
चरणीं तव नत झाले
सुरवर करिती नित भजन ॥

५५५

भरे मनांत सुंदरा तुझीच मूर्ति श्यामला ।
छंद लागला जिवास धुंद जो करी मला ॥
लाभतां तुझ्यापरी सुकांत कृष्ण–सुंदरी, ।
नको म्हणेन गौर ती अप्सरा मनोहरा ! ॥
खेद न करि श्यामले ! सांवळाच रंग खुले ।
पहा, निशाच शोभवी सतेज चंद्र हांसरा !
कोकिळेस लाभली सुरम्य गीत–माधुरी ।
गौर गाल भूषवी सुरेख तीळ साजरा !

५५६

निराकार ओंकार साकार झाला
तयें विश्वसंसार हा रंगवीला ॥ धृ० ॥
दिलें रम्य चांचल्य सौदामिनीला
दिलें रम्य मांगल्या मंदाकिनी
दिली चारुता प्रीत साऱ्या जगाला . . . .

नारायणा, रमा–रमणा ॥
मधुसूदना, मनमोहना, करुणाघना ॥
धांव अतां श्रीहरी झडकरी बलसागर गोविंदा ।
तुझिया चरणी सादर वंदन करतो परमानंदा ।
दे प्रसादा व्यंकटेशा ! जगताच्या आनंदा ॥

५५८

सावज माझं गवसलं
सावज माझं गवसलं ॥ ध्रु० ॥
अरे अरे सावजा विसरुं नको ।
उगाच गमजा करुं नको ।
तीर सरासर, माझा सुटतां ।
कुणीच नाही बचावलं ॥...
लखलख लखलख माझा बाण्
करिल् तुझी रे दाणादाण्
मदन–धनुच्या बाणालाही, जयानं चटकन् हरवलं ।...
अशी तशी मी नसे कुणी ऽ
मी वनराणी रूपखनी ऽ
रसराजांनी, नवीन यौवन, तनमन माझं सजवलं ।...
पार्वतीच्या शंकरानं
गिरिजेच्या गिरीशानं
दुर्गेच्या ग दुर्गेशानं
माझ्यावरी कृपा केली, म्हणून मजला यश आलं ! ....

५५९

छंद नसे हा भला, प्रियकरा !
छंद नसे हा भला ?
प्रणयाचा सारी पट फसवा, झटपट हा उचला ॥
दोन घडीचा डाव ऽ ऽ करील पाडाव ऽ ऽ सोडा याची हाव ।
होऊनिया निःसंग भजा श्रीरंग
नाही तर, कटेल अपुला गळा ॥....

५६०

कशि नाचे छमाछम्, मत्त मयूरी ॥ धृ० ॥
दरी दरी झंकारित करि ही मदनधनूची दोरी ॥....
निर्झर कलकल आज घुमवी पखवाज ।
गंधित हा वनवात, करी मुरलीची साथ ।
वदत महेश्वर, "अशि न पाहिली, नर्तन कुशल किशोरी

—★—

## मेघ मल्हार

१३-८-१९६७

५६१

गुलजार नार ही मधुबाला ॥ धृ० ॥
लतिकेला गेंद फुलांचे यौवन ये बहराला
गोड गोड बोलूनी खोडकर ओढ लावि हृदयाला
भ्रू-धनुवरती सज्ज करोनी नयनांची शरमाला
चंचल नैना सहज विंधिते हृदय कुरंगाला........

५६२

न संपदा न लगे मला ती
मी मानितो गुण-संपदेला
ती चंचला कमला कशाला ?
वंदीन मी त्या माधवाला........

५६३

रंग रंग उधळीत ये आजला 'छबेली'
सुजानांच्या अंतरात फुलवित फुलवेली
सुंदर मुख कांतिमान नार ही नवेली
रसिकमना वाटतसे आपली सहेली. ........

५६४

दुनियेच्या अंधेर नगरिचा न्यायच सारा उलटा
सती घळघळा रडती येथे, मजेत हसती कुलटा
चोर सोडुनि संन्याशाला सुळी चढविते जनता
इथे असली गरूड-भरारी, मान मिळतसे चिलटा........

५६५

धीर धरी धीर धरी जागृत गिरीधारी
तारितसे भाविकांस तोच चक्रधारी ॥ धृ० ॥
अढळ पदी अंबरात बसविले ध्रुवाला
संकटांत पीतांबर दिला द्रौपदीला
दिघली वैकुंठपेठ सकल गोकुळाला
ऐसा दातार थोर कुंज–बन विहारी...........
होसी का भयकंपित धरती का शंका ?
वाजतसे गाजतसे तयाचाच डंका–
'जय गोविंद जय मुकुंद जय जय सुखकारी'.......
धीर धरी धीर धरी जागृत गिरिधारी

## स्वरसम्राज्ञी

२–१२–७२

५६६

टुमदार कुणाची छान, नवती भरज्वान, पुसारे आली कुठून ?
स्वरुपाचे तुटती तारे, कडारेकड विजवा पडतिल तुटून ॥
पान खाऊन ओठ करि लाल, अंगावर शाल, झळकती चुडे
गजगती चाले हळू हळू, उरि ग जोबन् उमटले हुडे—
वय अटकर बांधा लहान
हरपले पाहून भुक–तहान
कर अर्पण पंचीप्राण–रणी ग जाऊ कटून ।
गगनात चांदणी ठळक, मारिशी झळक, उभि ग अंगणी
किती नटुन थटुन मारिशील छनाछन, नैनाच्या संगिनी
झालो घावाविण घायाळ
झोंबला विखारी व्याळ
जणुं टाहो करि कोयाळ
तूं न कळे घालशी माळ–कोणाला गे उठून ? ......

५६७

कशि केलीस माझी दैना। मला तुझ्या बिगर करमेना।
घडिभरी माझिया मना, चैन पडेना ॥ धृ० ॥
तू राघु तुझी मी मैना । माझं रूप बिलोरी ऐना।
अंगी इष्काचा आजार, करी बेजार, कमति होई ना।
तू हकीम होऊनि यावे । एकांती औषध द्यावे ।
दे चुंबन साखर पाक, मिठीचा लेप, मजसि साजणा।
अरे मनमोहना ।

५६८

गुन–सागर गंभीर दयामय
श्री गुरुदेव महान् ।
सूर–ताल–लय–तान–गान के
किमयागार सुजान् !
अनुशासन–पालनमें मन जो
उनका शैल–समान !
वही भरा है प्रेमभावसें
कोमल फूल–समान !!

५६९

एकलीच दीप–कळी मी अभागिनी
स्नेहाविण केवि जगू विजन–काननी ?
माझिया न संगतीस या इथे कुणी
प्रेमास्तव तळमळते मी वियोगिनी !
देवा ! मी ओवाळू प्रीतिने कुणा ?
कोणाला सांगावी मूक वेदना ?
काहीही अर्थ नुरे रुक्ष जीवनीं........!

५७०

रे तुझ्यावाचून काही येथले अडणार नाही ।
रे तुझ्यावाचून दुनिया दीन ही होणार नाही ॥
गर्व तव हा व्यर्थ, मी केलें असे, केले तसे
चोंच देई पाखरांना, तोच चारा देतसे
एकही घरटे तुझ्याविण मोडुनी पडणार नाही !.......
तानसेनावाचुनी, किंवा सदारंगाविणा
काय मैफल या जगाची रंगली केव्हाच ना ?
कोण तूं ? तुजवीण वीणाबंदही होणार नाही !---  .

# चमकला ध्रुवाचा तारा

१५-११-१९६८

५७१

कोपलास कां दया सागरा । का झाला अन्यायी
रडवितोस कां तुझ्या लेकुरा, जगती ठायी ठायीं
का तव माया ममता सरली
कृपा तुझी का ओसरली ?
म्हणूनच का रे दैव कसाई काळिज तोडुन खाई

५७२

उधळित प्रलयाचा अंगार
तयाला कोण रोखु शकणार !
सुखवायाते सूड भावना
करावयाते रिपु–बल–हनना !
गहन कानना चेतवून मी
होम आज करणार !

५७३

" " ओम् नमो भगवते वासुदेवाय ते
मंत्र जपतांचि हा दुरित तम भंगते
जेथ ना हीनता, मलिनता ना जिथें
दिव्य लोकी अशा अढळ पद लाभतें !

## वसंत शंकर कानेटकर

### मत्स्यगंधा

१–५–१९६४

५७४

देवाघरचे ज्ञात कुणाला विचित्र नेमानेम ?
कुणी रखडती धुळीत आणिक कुणास लाभे हेम
मी निष्कांचन, निर्धन साधक
वैराग्याचा एक उपासक
हिमालयाचा मी तो यात्रिक
मनांत माझ्या का उपजावे संसाराचें प्रेम ? ॥

५७५

गुंतता हृदय हे कमलदलाच्या पाशी
हा प्रणयगंध परिमळे तुझ्या अंगाशी ॥ धृ० ॥
या इथे जाहला संगम दो सरितांचा
प्राक्तनी आपुल्या योग तिथे प्रीतीचा
अद्वैत आपुले घडता या तीर्थाशी ॥ १ ॥
दुर्दैवे आपण दुरावलो या देही
सहवास संपता, डागळले ऋण तेही
स्मर एकच तेव्हा सखये निज हृदयाशी ॥ २ ॥

५७६

साद देती हिमशिखरे शुभ्र पर्वताची
क्रमिन वाट एकाकी ब्रम्ह साधनेची
कैलासाचा कळस ध्वजा कौपिनाची
अढळ त्या ध्रुवावरती दृष्टी यात्रिकाची
मला नाही उरली आता ओढ प्रपंचाची ॥ १ ॥
स्वप्न रंगले रात्री धुंद प्रेमिकांचे,
वाटते आता होते पतन या मनांचे
मृगजळात का भागे तृषा तृषार्ताची ? ॥ २ ॥

नको विसरू संकेत मीलनाचा
तृषित आहे मी तुझ्या दर्शनाचा
दिवस मावळता धाव किनाऱ्याशी ?
तुझे चिंतन मी करीन तो मनाशी !

५७८

तव भास अंतरा झाला मन रमणा मोहना
हांसती फुले भंवताली
मधुर ये फळावर लाली
स्मित साम्य तुझ्या अधरीचे मन दिपवती लोचना
॥ तव भास० ॥
वाहत ये झुळझुळ वारा
दरवळला परीमळ सारा
तव हृदयपुष्पगंधाची अनुभविते कल्पना
॥ तव भास० ॥

५७९

गर्द सभोंती रान साजणी तू तर चाफेकळी
काय हरवले सांग शोधिसी या यमुनेच्या जळी ?
ती वनमाला म्हणे, "नृपाळा हे तर माझे घर
पाहत बसते मी तर येथे जललहरी सुन्दर !
हरिणी माझी तिला आवडे फारच माझा गळा
मैना माझी गोड बोलते तिजला माझा लळा"
त्यावर राजा काय म्हणाला आहे ठाउक ? राजा म्हणाला—
"रात्रीची वनदेवी पाहुनी भुलतील रमणी तुला
तू वनराणी दिसे न भुवनी तुझिया रूपा तुला
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसली कसली तरी ?
तव नयनी या प्रेमदेवता धार विखारी भरी
अर्धस्मित तव मंद मोहने पसरे गालावरी
भुलले तुजला हृदय साजणी ये चल माझ्या घरी !"

### ५८०

अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा
धर्म, न्याय नीति सारा खेळ कल्पनेचा ॥
ध्यास एक हृदयीं धरूनी स्वप्न रंगवावे
वीज त्यावरी ती पडुनी शिल्प कोसळावे
सर्वनाश एकच दिसतो नियम हा जगाचा ॥
दैव ज्यास लाभे त्याला लाभ वैभवाचा
दैव कोप येतां भाळीं सर्वनाश त्याचा
वाहणें प्रवाहावरती धर्म एक याचा !

---

## मीरा मधुरा

६–५–१९६८

### ५८१

अशी सखी सहचरी प्रणयिनी । शिवसुंदर मोहिनी
वरिन मी तीच जन्म जोगिणी
वीज कडाडे नयनी एका
दिठीत दुसऱ्या शरदचंद्रिका
सूर जिचे मज जाळित जाती आणि फुले कमलिनी ॥
बिल्वपत्र राउळात
रातराणी काळजात
गीत मंदिर पर भाव मधुरतर, अशी दिव्य योगिनी

### ५८२

चंद्र हवा धनविहिन मला
शाम घनांकित होता तो शूल
व्यथेचा गगनास ॥ धृ० ॥
विमल तव देई सहवास
जीवनात कल्पलता बहरण्यास

५८३

स्वप्नांत पाहिले जे ते राहू देत स्वप्नीं
ते सत्य सप्तरंगी मी ऐकिले सुरांनी
मी पाहिले दिठीने लावण्य एक दैवी
त्या शामसुंदराला जी धुंद करिल देवी
परि आस या मनाची हा एक ध्यास देवा
माझे मला मिळावे माझे मला मिळावे
लावण्य हेच दैवी माझे मला मिळावे
स्वप्नात पाहिले जे सत्यात मूर्त व्हावे

५८४

आनंद सुधा बरसे, झाली धुंद अमृत घनबरसात
चरणी पावन फुले स्वर्ग या विजनात
रसमय मंजुळ गीत गात मानस भरे
कमलदली जशी पुनव रात..............

—★—

# पुरुषोत्तम दारव्हेकर

## घनशाम नयनी आला

१–१०–१९६८

५८५

सुखवितो मधुमास हा
मज दावितो नव आस हा ॥ धृ० ॥
दाह होता विफलतेचा
गूढ माझ्या अंतरी
यामिनीच्या तम विनाशा
लाभते सौदामिनी
काय दैव विलास हा

५८६

ही कोण कनकांगी कोण ललना
सौंदर्याचे हे आवाहन चित्राची प्रेरणा ॥ धृ० ॥
भ्रमर मनाचा स्मृतिसुमनी रत
मानसमूर्ती करी चित्रांकित
शांत कमल नयना–॥ १ ॥ ही कनकांगी

---

## कटयार काळजात घुसली

२४–१२–६७

५८७

तेजोनिधि लोहगोल भास्कर हे गगनराज
दिव्य तुझ्या तेजाने झगमगले भुवन आज
हे दिनमणि व्योमराज भास्कर हे गगनराज ॥ धृ० ॥
कोटि कोटि किरण तुझे अनलशरां उधळिती
अमृतकण परि होउन अणुरेणू उजळती
तेजातच जनन मरण तेजातच नविन साज
हे दिनमणि व्योमराज ॥ १ ॥
ज्योतिर्मय मूर्ति तुझी ग्रहमंडळ दिव्य सभा
दाहक परि संजीवक तरुणारुण किरणप्रभा
देई प्रभो नवप्रकाश होवो जीवनविकास
वसुधेची राख लाज हे दिनमणि व्योमराज ॥ २ ॥

५८८

या भवनातिल कवन पुराणे
या भवनातिल गीत पुराणे
मवाळ, हळवे सूर
जाऊ द्या आज येथुनी दूर ॥ धृ० ॥
भावभक्तिची भावुक गाथा
पराभूत हो नमविल नाथा
नवे गीत अन् नवे तराणे
हवा नवा तो नूर ॥ १ ॥

५८९

घेई छंद मकरंद प्रिय हा मिलिंद
मधुसेवनानंद स्वच्छंद धुंद ॥ धृ० ॥
मिटतां कमल दल होई बंदी भृंग
तरि सोडिना ध्यास, गुजनांत दंग ॥
बिसे-तंतु मृदु होति जणुं वज्रबंध
स्वरब्रम्ह आनंद ! स्वर हो सुगंध ॥ १ ॥
घेई छंद मकरंद-प्रिय हा मिलिंद
मधुसेवनानंद स्वच्छंद धुंद ॥ २ ॥

५९०

! मिश्रबीलावल-धुमाळी !

दिन गेले भजनाविण सारे ॥ धृ० ॥
बालपणा रमण्यात गमविला यौवनात धन लौकिक प्यारे ॥ १ ॥
मोहापायी मूळ हरपले अजुनी शमेना तृष्णा कां रे ॥ २ ॥
म्हणे कबीर, साधुजन ऐका भक्त प्रभूचे तरले सारे ॥ ३ ॥

## ५९१

हे नंदलाल
मुरलीधर श्याम ।। धृ० ।।
तूच गुरू, तू एकच माता
संगीताचा तूं उद्गाता
तारक तव शुभनाम ।। १ ।।
तूच स्वरेश्वर
तू लयभास्कर
कलासाधका तूच विधाता
प्रतिभेचे सुखधाम ।। २ ।।

## ५९२

सुरत पियाकी छिन बिसराये ।
हर हरदम उनकी याद आये ।। धृ० ।।
नैनन और न कोऊ समाये
तरपत हूं बिलखत रेन निभाये
आखियाँ नीर असुबन झर लाये ।। १ ।।
साजनं बिन मोहे कछुना सुहाये
इस बिगरो को कौन बनाये
हसन रंग अस जी बहलाये ।। २ ।।

## विष्णु वामन शिरवाडकर

### ययाति देवयानी

२०-८-१९६६

५९३

यतिमन मम मानित त्या
एकल्या नृपाला
आदि अंत ज्यास नसे
त्या सनातनाला ॥
गगनधरा ज्या निवास
बंधन भय नाही त्यास
समिर करिल काय नमन
सधन सागराला ॥

५९४

मी मानापमाना
नच मानतो
ना मना तो मोह आता
गौरव निंदा समान त्याला
ज्यास सदाशिव त्राता ॥

५९५

प्रेम वरदान
स्मर सदा
असे भवा हाचि भगवान ॥
स्नेह सुगंधित करि संसारा
दाहि गरल वैर अभिमान

५९६

सर्वात्मका सर्वेश्वरा
गंगाधरा शिवसुंदरा ।
जे जे जगी जगते तया
माझे म्हणा करुणाकरा ॥
आदित्य या तिमिरात व्हा
ऋग्वेद या हृदयात व्हा
सुजनत्व द्या द्या आर्यता
अनुदारता दुरितां हरा

५९७

तम निशेचा सरला सरला
अरुण कमल प्राचीवर फुलले
प्रकाश परिमल गगनी भरला
पावन मंगल जीवन झाले
शिवदयेचा दीप या भवि दिसला

# बाळ कोल्हटकर

## दुरिताचे तिमिर जावो

३१-३-१९५७

५९८

आई तुझी आठवण येते
सुखद स्मृतींच्या कल्लोळांनीं काळिज कालवतें ॥ धृ० ॥
वात्सल्याचा कुठें उमाळा, तव हातांचा नसे जिव्हाळा।
हृदयाचें मम होऊन पाणी, नयनीं दाटून येते ॥ १ ॥
तुजवीण आई जगीं एकटा, पोरकाच मज म्हणती करंटा।
व्यथा मनींची कुणास सांगूं, काळीज तिळतिळ तुटतें ॥ २ ॥
हांक मारतों आई आई, चुके लेकरूं सुन्या दिशाही।
तव बाळाची हांक माउली, का नच कानीं येते ॥ ३ ॥
सुकल्या नयनीं नुरलें पाणी, सुकल्या कंठीं उमटे वाणी।
मुकें पांखरूं पहा मनाचें, जागीं तडफड करतें ॥ ४ ॥
नको जीव हा नकोच जगणें, आईवांचुन जीवनमरणें।
एकदांच मज घेई जवळीं, पुसुनी लोचनें माते ॥ ५ ॥

५९९

तूं जपून टाक पाऊल जरा। जीवनातल्या मुशाफिरा ॥ धृ० ॥
हवें तुला तें नच तुजपाशीं। मिळे न तें का व्यर्थ धुंडिशी
गांठ अखेरिस यमाबरोबर। भुलूं नको हा मंत्र बरा ॥ १ ॥
पापपुण्य जें करशील जगतीं। चित्रगुप्त मागेल पावतीं।
पापाइतुकें माप ओतुनी। जें केलें तें तसें भरा ॥ २ ॥
जीवन सुखदुःखाची जाळी। त्यांत लटकले मानव-कोळी
एकानें दुसऱ्यास गिळावें। हाच जगाचा न्याय खरा ॥ ३ ॥
अथांग सागर अवतीं भवतीं। सौख्य शोक दो तीरावरती
तुला हवें जें तया दिशेनें। उचल टाक पाऊल जरा ॥ ४ ॥
चौऱ्यांशींच्या पडण्यागांठीं। बालक होतील जरठ शेवटीं
तारुण्याच्या उन्मादानें। विसरतोस का तुझी जरा ॥ ५ ॥
हवास तोंवर तुला जवळतील। गरज संपतां दूर लोटतील
ओळखून ही रीत जगाची। रहा जवळ लांबून जरा ॥ ६ ॥
दानव जगा मानव झाला। देवाचाही दगड बनवला
कोण कोठला तूं तर पामर। चुकून तुझा करतील चुरा ॥ ७ ॥
निरोप जेव्हां येईल वरचा। तेव्हां होशिल सर्वाघरचा
तोंवर तूं या रिपू जगाचा। चुकवुनि मुख दे तोंड जरा ॥ ८ ॥
मृगजळ सगळें तुझिया पुढती। तहानेला तूं मागुती
पाण्यांतच तूं पाण्यावांचून। व्याकुळ रे होशिल पुरा ॥ ९ ॥

—★—

## देव दीनाघरी धावला

६००

ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गांठी ।
भेटीत रुष्टता मोठी ॥
त्या कातरवेळा थरथरती कधीं अधरीं ।
त्या तिन्हीसांजा त्या आठवणी त्या प्रहरी ॥
कितिदां आलों---
गेलों---
जमलों---
रुसण्यावांचुनि परस्परांच्या कधीं न घडल्या गोष्टी ।
भेटीत रुष्टता मोठी ॥
कधीं तिनें मनोरम रुसणे। रुसण्यांत उगीच ते हंसणे ॥
म्हणून तें मनोहर रुसणें । हसणें रुसणें-रुसणें-हंसणें ॥
हंसण्यावरती रुसण्यासाठीं । जन्मजन्मींच्या गांठी ॥
भेटीत रुष्टता मोठी ॥
कधी जवळ सुखाने बसलों ।
दुःखांत सुखाला हंसलों । कधीं गहिवरलों---
कधीं घुसफुसलों---सागरतीरीं आठवणींनीं---
वाळूंत मारल्या रेघा । जन्मासाठीं जन्म जन्मलों ।
जन्मांत जन्मली न गट्टी । भेटींत रुष्टता मोठी ॥

---

## वाहातो ही दुर्वांची जुडी

६०१

निघालें आज तिकडच्या घरीं !
एकवांच मज कुशींत घेई
पुसून लोचनें आई,
तुझी लाडकी लेक आपुले
घरकुल सोडूनि जाई !
तव मायेचा स्पर्श मागते अनंत जन्मांतरीं ॥ १ ॥ निघालें आज०
पडतें पाया तुमच्या बाबा
काय मागणें मागूं
तुम्ही मला आधार केवढा
कसें कुणाला सांगूं !
या छत्राच्या छायेखालून सात पावलों करो ॥ २ ॥
येतें भाऊ विसर आजवर
जें कांहीं बोललें,
नव्हती आई तरिही थोडी
रागावून वागलें !
थकलें अपुले बाबा आतां एकच चिंता उरीं ॥ ३ ॥

## चिं. य. मराठे

### होनाजी बाळा

६०२

श्रीरंगा कमलाकांता हरी पदरातें सोड ॥ धृ० ॥
आम्ही वृजवासी नारी । जात असों कीं बाजारीं
अहो कान्हा मुरारी । अडवितां कां कंशारी ।
मथुरेच्या बाजारीं । पाहूं मजा हो गिरीधारी ।
विकुन नवनीत दधी गोड । श्रीरंगा ॥ १ ॥
ऐका लवलाही गृहीं गांजिती सासुबाई ।
परतुनिया पाही । येऊं आम्ही ईश्वर ग्वाही ।
या न देऊन कांहीं । मग जाऊ आपले ठाई ।
पती भयानें देहरोड । श्रीरंगा ॥ २ ॥
विनवुनी कृष्णासी । शरणागत झाल्या दासी ।
आणल्या गोपी महालासी । होनाजी रायासी ।
अती आगळी कविरायाची । घोंडी सदाशिव जोड श्रीरंगा ॥ ३ ॥

## गोपाळ कृष्ण भोबे

### धन्य ते गायनी कळा

१६-११-१९६८

६०३

हे करुणाकरा, ईश्वरा । कृपादान मज देई ।
तुजविण कोण निवारी संकट । वृथता ही तव पायी ॥ धृ० ॥
तूही आदि अनंत । तूही दुस्तर भवनिधि तारक
तानसेन प्रभु तुम्हो उद्धरा ॥ १ ॥

६०४

दान करी रे गुरुधन पावन ।
श्रेयभाग जाण हा कुठुनि तुजसी लाभला ॥ धृ० ॥
देत हात तोच घेत । सांगतसे तानसेन
ज्ञात न शिव विलयाला ॥ १ ॥

६०५

चिरंजीव राहो जगी नाम रामा
जोवरि रविशशि पाव सुखधामा ॥ धृ० ॥
नाद-सिद्धि सकळ वरदान देओ
अचल राहो तुम्हा स्नेह अभि रामा ॥ १ ॥

# योगिनी जोगळेकर

## रंगात रंगला श्रीरंग

४-१-१९७०

६०६

मधुर स्वर लहरी या रुचिरा ।
धुंद रंगते जीवन धारा ॥ धृ० ॥
मध्यम पंचम षड्ज् गुंफता
रागरागिणी गुंजत येता
जिवा शिवाच्या जुळती तारा ॥ १ ॥

६०७

हे सागरा नीलांबरा
रत्नाकरा सुखकारा ॥ धृ० ॥
तूच रुद्र तूच भद्र
शिव तांडव तूच आद्य
हे लय भास्करा गंभिरा ॥ १ ॥

—★—

## रणजित देसाई

### हे बंध रेशमाचे

६०८

छेडियल्या तारा । ते गीत येइना जुळून
फुलते ना फूल तोच । जाय पाकळी गळून ॥ धृ० ॥
आकारून येत काही । विरते निमिषांत ते हि
स्वप्न चित्र पुसुनी जाय । रंग रंग ओघळून ॥ १ ॥
क्षितिजाच्या पार दूर । मृगजळास येइ पूर
लसलसते अंकुर हे । येथ चालले जळून ॥ २ ॥

६०९

आज सुगंध आला लहरत
येइ उपवनि माधवी
मी तेवि धुंद !
मधुमासातील सूर नवे तैसा
हा वाहे आनंद माझा

६१०

विकल मन आज झुरत असहाय
नाहि मज चैन क्षण क्षण झुरति नयन
कोणा सांगू ?
ही चांदरात नीज नच त्यात
विरह सखि मी कुठवर साहू ?

## ६११

का धरिला परदेश ?
सजणा का धरला परदेश !
श्रावण वैरी बरसे झिरमिर
चैन पडेना जीवा क्षणभर
राहू कोठे ? राहू कैसी ? घेऊ जोगिण वेष ?
रंग न उरला गाली ओठी
भरती आसू काजळ काठी
शृंगाराचा साज उतरला मुक्त विखुरले केश !

## ६१२

काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी
मज फूलही रुतावे हा दैव योग आहे !
सांगू कशी कुणाला कळ आतल्या जिवाची
चिरदाह वेदनेचा मज शाप हाच आहे
काही करू पाहतो रुजतो अनर्थ तेथे
माझे अबोलणेही विपरीत होत आहे !
हा स्नेह वंचिता की काहीच आकळेना
आयुष्य ओघळोनी मी रिक्त हस्त आहे.

## ६१३

पंथ, जात, धर्म किंवा नातेहि ज्या न ठावे
ते जाणतात एक प्रेमास प्रेम द्यावे
हृदयात जागणाऱ्या अतिगूढ संभ्रमाचे
तुटतील ना कधी.ही हे बंध रेशमाचे
विसरूनी जाय जेव्हा माणूस माणसाला
जाळीत ये जगाला विक्राळ एक ज्वाला
पुसतील डाग तेही धर्मांध आक्रमाचे
तुटतील ना कधीही हे बंध रेशमाचे
हे बंध रेशमाचे ठेवी जपून जीवा
धागा अतूट हाच प्राणात गुंतवावा
बळ हेच दुर्बळाना देतो पराक्रमाचे
तुटतील ना कधीहि हे बंध रेशमाचे

## ६१४

संगीत रस सुरस मम जीवनाधार
सूर, ताल, लय, धूत,
नटला विविध रंगी स्वरूप ओंकार !
आनंद घन असा बरसे नभातून
ह्या वेद श्रुतिस मान सुखसार !
संगीत रस सुरस मम जीवनाधार !

## ६१५

दैव किती अविचारी !
ऊधो ! जीवनगति हो न्यारी ॥ धृ० ॥
शुभ्र वर्ण बगळ्यात दिला तू
कोकिळ तनु अंधारी
कृष्ण लोचन सुंदर हरिणे
वनि वनि भ्रमति बिचारी ! ॥ १ ॥
मूर्ख भोगितो राज वैभवा
पंडित फिरत भिकारी
सूरदास विनवितो प्रभुला
क्षण क्षण हो जडभारी

# ऋणनिर्देश

अनंत दामले

विद्याधर गोखले

चित्रकार द. ग. गोडसे

मुंबई मराठी साहित्य संघ

माधव पळणीटकर

सचिव, समाजकल्याण आणि सांस्कृतिक खाते.

भाऊराव टेंबे

शांता शेळके

सौ. आशा सुतार

वसंत कानेटकर

मामा वरेरकर

नीलकंठ खाडिलकर

पुरुषोत्तम दारव्हेकर

मो. ग. रांगणेकर

वि. वा. शिरवाडकर

व. शां. देसाई

शिरीष पै

ना. सी. फडके

REFBK-0021772

REFBK-0021772

८३११ काव्य
२१८८२

## बाळ सामंत

बहुसंख्य मराठी वाचक श्री. बाळ सामंत ह्यांना एक लोकप्रिय ललित लेखक नि नामांकित विनोदकार म्हणून ओळखतात. पण फारच थोड्यांना हे ठाऊक असेल कीं हा रसिक विनोदकार स्वतःच्या मनोविनोदनासाठी साहित्यापेक्षा संगीतांत–विशेषतः नाट्य–संगीतांत–त्यांतहि गंधर्व संगीतांत तासन्‌तास रममाण होतो ! बाळ सामंतांचा बाळपणीचा काळहि संगीत-सेवनाने सुखाचा झाला आहे; नाट्यगीतांच्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा संग्रह करण्याचा त्यांना छंद जडला आहे. बालगंधर्व, गंगाधरपंत लोंढे, बापू पेंढारकर, मास्तर कृष्णा इत्यादींच्या सुरेल सहवासांत त्यांची विद्यार्थीदशा कोणे एकेकाळी रंगून गेली आहे ! आजहि एका व्यापारी संस्थेत उच्चपदाची जबाबदारी सांभाळत असतांनाहि त्यांनी आपला नाटकांचा अन् नाट्य–संगीताचा शौक सोडलेला नाही.

अशा या रसिक 'कानसेना'ने, १०१ अभिजात संगीत नाटकांतील सुमारे ६१४ निवडक पदांचा **'मराठी नाट्य संगीत'** हा ग्रंथ कुशलतेने संपादित करून, संगीत नाटकांच्या शौकिनांना उपकृत केले आहे. केवळ शौकिनांनाच नव्हे तर अभ्यासकांनाहि हा ग्रंथ बहुमोल वाटेल. कारण हा ग्रंथ म्हणजे 'गोड गोड नाट्यगीतें,' ह्या जातीची मामुली पद्यावलि नव्हे ! पदांची चोखंदळ निवड करूनच बाळ सामंत थांबले नाहीत, तर नाट्य–संगीताची जडण–घडण नि सुमारे सव्वाशे वर्षांची वाटचालहि त्यांनी व्यासंगपूर्ण प्रदीर्घ प्रस्तावनेत कथन केली आहे; ध्वनिमुद्रित गीतांची नि गायक–गायिकांची त्यांनी कष्टपूर्वक सादर केलेली सूचीहि अभ्यासूंना फार उपयुक्त ठरणारी आहे.

असा हा रसिकतेने नि जाणकारीने पेश केलेला मराठी नाट्य–गीतांचा खजिना; संगीत रंगशारदेचे हे नित्यनूतन रत्नभांडार ! तें बाळ सामंतांसारख्या साक्षेपी रसिकाकडून संपादित करून घेऊन, देखण्या स्वरूपांत अन् तरीहि अल्प किंमतीत प्रकाशित केल्याबद्दल मुंबई महापालिकेच्या 'संगीत सभे'चे आभार मानावेत तेवढे थोडेच.

**संगीत सर्व परिचे कीं वस्त्रगाळ करूनी**
**रमणीय देह विधिने रचिला हिचा छबेला**

ही उक्ति सार्थ करणाऱ्या ह्या नाट्य–संगीत सुंदरीचे रसिक महाराष्ट्र हार्दिक स्वागत करील, ह्यात शंका नाही.

**— विद्याधर गोखले**
(अध्यक्ष, मराठी नाट्य परिषद)